**लेखकाचा प्रास्ताविक खुलासा**

या पुस्तकात व्यक्त झालेल्या विचारांचे बीजारोपण २९ वर्षांपूर्वी देवास (मध्य हिन्दूस्तान ) येथील व्हिक्टोरिया हायस्कूल मध्ये मी मॅट्रिकचा अभ्यास करताना झालेले आहे. त्यावेळी माझे परमपूज्या गुरुवर्य़ कै. गंगाधर नारायण शास्त्री (पण्डया) एम्.ए. 'शाळा सुपरदंट' हे आमचा इंग्लीश क्लास घेत असत. यांची शिक्षणपध्दती परिणामकारक, चित्तप्रबोधक आणि व्यापक असे. विषय चिकित्सापूर्वक समजावून देण्याची यांची हातोटी मला आज सुध्दा अनन्य अशीच वाटते. 'कॅरेक्टर ऑफ दी हॅपी वॉरियर' आणि गोल्ड स्मिथची 'ट्रॅव्हलर' व 'डेझर्टेड विलेज' ही काव्ये शास्त्रीबुवा सबंध वर्षभर दररोज नियमित शिकवीत असत. त्यांचे व्याख्यान सुरु झाले की बारिकसारिक मुद्‌देसुध्दा स्पष्ट सिध्द करण्यासाठी अनेक संदर्भ ग्रंथांच्या राशीच्या राशी टेबलावर येउन पडायच्या. इतिहास तत्वज्ञान काव्य समाजशास्त्र थिऑसफी, कसलाही संदर्भ विवेचनात येताच, त्याची शहानिशा स्पष्ट झाल्याशिवाय शास्त्री बुवांचे पाऊल पुढे पडत नसे. इतकेच नव्हे, तर 'डेझर्टेड विलेज' मधला Sweet was the sound, when oft at evening's close Up yonder hill the village murmur rode; 'As some tall cliff that lifts its aweful form.' या काव्यामधले वर्णन प्रात्याक्षिकाने पटवण्यसाठी शास्त्रीबुवा आम्हा विद्‌यार्थ्यांना बरोबर घेऊन एका खेड्‌यातही दो-यावर गेले होते. ट्रॅव्हलर मधल्या 'As some tall cliff that lifts its aweful form.' या चारच ओळीवर शास्त्रीबुवा तब्बल आठवडाभर प्रवचन करीत असताना, त्यांची एकतान झालेली तल्लीन वृत्ती आजही माझ्या नजरेपुढे स्पष्ट दिसत आहे. माझ्या विचार-उच्चार-आजारांची पिण्डप्रकृती महाराष्ट्राला आज बरी वाईट परिचित आहे, तिच्या कमावणीच्या श्रेयाचा बराचसा भाग मी कै. शास्त्रीबुवांच्या स्मृतीसमाधीवर गंगेच्या पाण्याने गंगेची पूजा म्हणून आज जाहीर रीतीने समर्पण करीत आहे. मुंबईच्या चालू संपाच्या कान्तीयुगात गिरणी कामगारांच्या प्रत्येक झोपडीत उपासमारीची अवदसा भयंकर धुमाकूळ घालीत आहे. सावकारी पिण्डाच्या माझ्या अनेक मित्रानी कायदेवीजीच्या चापात माझ्या उमल्या लोकसेवेची ठेचणी करुन,मलाही या गिरणबाबूंच्या उपासमरीचा आणि कफल्लक राहणीचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची सुसंधी दिल्यामुळे, त्यांच्या वेदनांशी आणि भावनांशी तद्‌रुप आणि तल्लीन होणे कठीण गेले नाही.

प्रस्तुत पुस्तकाच्या कल्पनेचा जन्म गिरणीत जाणा-या पण बेरोजगारीने उपाशी तळमळणा-या एका कोकण्या बाईच्या स्फुंदनात झालेली आहे. करुणेलाही करुणेचा पाझर फोडणारे तिचे चित्र पाहून मी क्षणभर दिङ्‌मूढ होउन, तसाच, रस्त्यावर उभा राहिलो. एका क्षणात लाख विचारांचा सिनेमा मस्तकात खेळला. इतक्यात एका मोटारबाईने कर्णभेदी कर्णा पुंकून राजरस्त्यावर उभे राहणे मूर्खपणाचे आहे, असे माझे कान उपटले. फूटपाथवरुन मी घरचा (घर कसले? भाडोत्री बि-हाडाचे खुराडे!) मार्ग धरताच, डेझर्टेड व्हिलेज मधल्या खालच्या ओळी–२९ वर्षांपूर्वी शाळेत पाठ केलेल्या ओळी–आपोआप बिनचूक माझ्या तोंडून बाहेर पडू लागल्या. Ah, turn thine eyes, Where the poor houseless shivering female lies. She once, perhaps, in village plenty blest, Has wept at tales of innocence distrest; Her modest looks the cottage might adorn. Sweet as the primrose peeps beneath the thorn; Now lost to all her friends, her virtue fled. Near her betrayer's door she lays her head; And, pinched with cold, and shrinking from the shower. With heavy heart deplores that luckless hour When idly first, ambitious of the town, She left her wheel and robes of country brown. लागलीच शास्त्रीबुवांच्या

प्रवचनाची आठवण जागी झाली. याच ओळी समजावून सांगताना, उध्वस्त खेड्यातून शहरी भांडवलशाहीच्या जाळ्यात येऊन अडकलेल्या तरुणीच्या कर्महाणीचे हृदयद्रावक वर्णन तल्लीनतेने चालले असताना, शास्त्रीबुवा मधूनमधून आपले डोळे उपरण्याने कसे पुशीत, त्याचेही स्मृतिचित्र मला दिसू लागले. बि-हाडी खुराट्यात येताच डेझर्टेड व्हिलेजचे पुस्तक बाहेर काढले. त्याचे सह्रदयतेने वाचन केले आणि मनावर जे जें विचार-तरंग उठले त्याची टिपणे तयार केली.

महाराष्ट्रातल्या शहरी मजूर आपल्या पिढीजात नांगराची उपासना करणारा खेड्यातला स्वावलंबी शेतकरी बनल्याशिवाय, आज सर्वत्र भडकलेल्या पोटाच्या बंडाला पायबंद लागणार नाही, ही गोल्डस्मिथची विवंचना माझ्या विचारांशी प्रथम एकतान झाली आणि त्यावरचे सर्व विचार उत्कान्त होत असे, त्यांचे पर्यवसान आज शेतक-यांचे स्वराज्य या आजच्या स्वप्नसृष्टीत पण उद्याच्या सत्यसृष्टीत झाले आहे. ऑलिव्हर गोल्डस्मिथने आपले उध्वस्त खेडे काव्य प्रसिध्द केले तेव्हा त्यात गोविलेली तत्त्वे खरी का काल्पनिक यावर तत्कालीन आंग्ल विद्वानात मोठी चर्चा चालू झाली. कोणी म्हणे हे काव्य सूचनात्मक आहे, कोणी म्हणे हा इंग्लण्डला एक इषारा आहे, तिसरा म्हणे ही वाङ्मयाची नुसती सेवा आहे, आणि शेवटी वादाचा समारोप करण्यासाठी कविवर्य ग्रे याने अभिप्राय दिला कीं " This man is a poet"(हा मनुष्य कवि आहे.) हिंदुस्तानाच्या शेतकीचा आज जसा विंध्वंस झाला आहे, तसा गोल्डस्मिथच्या किंवा कोणाच्याही काळी इंग्लण्डने कधीच अनुभवलेला नसल्यामुळे, प्रस्तुत काव्यातल्या विचारांना कवि-कल्पनेपेक्षा अधिक महती कोण देणार? आणि आपल्या राष्ट्रभूषण कवीने वर्णन केलेली परिस्थिती आपल्याच राष्ट्राच्या सम्राटछत्राखाली एका प्रचण्ड देशात, पुढे लवकरच यथाक्षर घडणार आहे, याची या आंग्ल पंडितांना काम कल्पना असणार? गोल्डस्मिथेचे 'उध्वस्त खेढे' इंग्रजांना इंग्लण्डात कधीच दिसले नाही, तरी ते इंग्रजी कदरीखाळी कण्हत कुंथत पडलेल्या हिन्दुस्तानात आज पंचखंड दुनिया उघड्या डोळ्यांनी पहात आहे. क्षेत्रफळ आणि लेकसंख्येच्या मानाने इंग्लण्ड म्हणजे हिन्दुस्तानापुढे एक तालुका. पण आज तोच हिन्दुस्तान म्हणजे गोल्डस्मिथचे उध्वस्त खेडे होऊन बसला आहे.

हिन्दुस्तानच्या भवितव्याचा कळकळीने विचार करणारीनी या काव्याचा नव्या दृष्टीने अभ्यास करणे अगत्याचे आहे. अनेक आंग्ल काव्यांचे तर्जुमे देशी व मराठी भाषेत करणारे कवि झाले. पण एकाही जातिवंताला या काव्याचे रुपांतर करण्याची प्रेरणा होऊ नये, याचे कारण आधुनिक कवींच्या आत्म्याची संवेदनाच शेतकीप्रमाणे उध्वस्त झालेली आहे. गुलामांच्या शारदेने लव्हाळ्याची लकतेरच धूत बसावी! दादर ( मुंबई१४ )मंगळवार श्रावण, श्रीकृष्ण गोपाल जन्मष्टमी शके १८५९.ता. २७ ऑगस्ट सन १९२९ इसवी. राजर्षी कै. छत्रपती शाहू महाराज "ज्यांना राजकारणांत भाग घ्यावयाचा असेल त्यांना इतर देश प्रमाणें याहि देशांत प्रत्येक मनुष्याला मनुष्यत्वाचे सर्व अधिकार दिले पाहिजेत; नाहितर आमच्या हातून मुळीच देशसेवा होणार नाहीं." शेतक-यांचे स्वराज्य प्रकरण १ ले परिस्थितीचे सिंहावलोकन इंग्लण्डचा सुप्रसिध्द स्पष्टवक्ता कविराज ऑलिव्हर गोल्डस्मिथ याने आपल्या 'डेझर्टेड विलेज' ( उध्वस्त खेडे ) नामक अजरामर काव्यात वरील उद्गार काढले आहेत. त्यांचा भावार्थ असा :-- " ज्या देशांत गडगंज संपत्ति नुसती कोठारात अडकून पडते,( म्हणजे काही मूठभर लोकच तेवढे अलोट संपत्तीचे कोठावळे बनतात ) आणि सारी जनता भिकेला लागते, त्या देशात लवकरच सत्यानाश होणार, ही खूणगाठ बांधावी. राजे महाराजे सरदार श्रीमंत इत्यादी झब्बू लोक भरभराटले काय अथवा घरघराटले काय, जगाला त्याचे सुहेर सुतक बाळगण्याचे कारण नाही. कारण, जनतेच्या अनुकूल

प्रकिकूल अभि–यावरच त्यांचे जनन मरण ठरलेले असते.( लोक मानताता. म्हणून हे झब्बू रोजे किंवा सरदार बनतात. जनतेने नन्नाची मुंडी हालविली तर, कोट्याधीश असूनहि त्यांच्या राजेपणाला किंवा सरदारीला कुत्रा सुध्दा धूप घालणार नाही.) पण, अवघ्या देशाच्या अभिमानाचा केवळ पाठकणा असा जो अभयाने श्रमणारा शेतकरी वर्ग, तो जर नष्ट झाला, तर मात्र त्यांनी जागा कशाने कधीहि भरुन निघणे शक्य नाही.” हिन्दुस्तान पूर्वी कसा होता, किती श्रीमंत होता, त्यातून सोन्याचा धूर निघत होता तो जाड होता की बारीक होता, इत्यादी ऐदी प्रश्नांवर डोकी खाजवण्याची आज जरुर नाही. हिन्दुस्तान ही धर्मभूमि का कर्मभूमी, आमची संस्कृती श्रेष्ठ का पाश्चिमात्यांची श्रेष्ठ, वेदान्ताचा कासोटा धरुन आम्ही स्वर्गाला जाणार, का धादान्ताच्या एरोप्लेनमधून पाटलोणे सुरपियन स्वर्गपाताळ एक करणार, चरख्याने स्वराज्य मिळणार, का टिळकांची देवळे गावोगाव थापून तेथे घण्टा बडविल्याने स्वराज्याचा मेवा अलगज आमच्या घशात घुसणार, असल्या बाष्काळ बायकी बडबडीनाहि विचारांत घेण्याची आज फुरसद नाही. राजकीय चळवळ बरी, का सामाजिक चळवळ खरी, या वादाच्या किसक्या मसणात गेल्या तरी आज पुरवल्या. केवळ तोण्डपाटीलकीने आणि नॅशनल कॉंग्रेसच्या नाटकी थैमानाने प्राप्त होणारे स्वराज्य हिंदूंचे का ब्रिटीश राजवटीत दरसाल रावसाहेब खानबहादूर सर-वगैरे महात्म्यांची पैदास गेली शंभर वर्षे शेकड्यांनी होत आली आहे. हिन्दी जनतेने किती सरांची सरकी आजवर मान्य केलेली आहे? मुसलमानांचे, ढोमिनियन स्टेटस बरे का कंप्लीट इंडिपेंडन्स बरे, या चर्चेला आज फुटक्या कवडीचेहि महत्त्व उरलेले नाही.

आजचा हिन्दुस्तान भाकरीला मातोद झाला आहे. उपाशी पोटावर तत्वज्ञानाचा लेप काय कामाचा? पोटात पेटका आणि पाठीला चटका । जखम जोक्याला आणि मलमपट्टी पायाला । अशी आजच्या हिन्दुस्थानची स्थिति होऊन बसली आहे. विचार उच्चार आणि आचाराच्या क्षेत्रात कान्तीकारक कल्पनांचा थैथयाट कितीहि आकाण्डताण्डवी चालू असला, तरी रोगाचे प्रत्यक्ष निधानच निश्चित न ठरल्यामुळे, वैद्य डागदारांच्या मतवैचित्र्याच्या शिमग्यात रोग्यांची होळी होऊन, जनतेला प्राणान्तीचा शंख करण्याचा प्रसंग येऊन बितला आहे. गेल्या ५० वर्षाच्या राष्ट्रीय चळवळींची फलश्रुति आणि ब्रिटीशांच्या शंभर वर्षे राज्यकर्तृत्वाची पुण्याई काय? तर उभा हिन्दुस्तान भणंग बनला! अन्नासाठी दाही दिशा । आम्हा फिरविशी जगदीशा । म्हणून देशाच्या नावाने पांचजन्य करण्यापुरतीहि हातातोंडाची गाठ घालायला उजगद नाही. कारण पूर्वी दहाहि दिशा फिरवून तरी भक्ताच्या पोटात भाकरीचा तुकडा ढकलणा-या जगदीशाला आज दहाहि दिशा शून्. झाल्यामुळे, आकरावी दिशा कोठे निर्माण करावी, या विवचनेत तो सुध्दा बुळा बावळा आणि खुळा होऊन बसला आहे. देवाच्याच अकलेचे तेरावे पडल्यामुळे, भक्तांच्या पोटाचे बण्ड वर्तमान परिस्थितीचे तीनतेरा करण्यासाठी लालबुंद कान्तीच्या प्रयोगशाळेत धुमाकूळ घालायला सिध्द झाल्यास, त्यात आश्चर्य मानण्याचे मुळीच कारण नाही. हिन्दुस्थानात क्रान्तीचा धुमाकूळ सुरू झाला, म्हणून नाटकी आश्चर्याने पाटलोणीची पार्सले धोबीघाटावर रवाना करण्याच्या फार्साने हिंदी जनतेला चकविणा-या सर्वसमर्थ ब्रिटिश सरकारला या क्रांतीच्या आदिअंताची अगदीच काही अटकळ नसंल, असे मानणारा माणूस हिंदु तरी असावा किंवा मूर्ख तरी असावा. हिंदुस्तान ही क्रांतीभूमी आहे. हिला क्रांतीचा संन्यास शिकवून, शांतीचा हव्यास धरायला लावणारे लोक एकतर पागल असले पाहिजेत, अगर जिवाला कंटाळलेले आततायी असले पाहिजेत; मग ते ब्रिटिश असोत, त्यांचे राजनिष्ठ हिंदी पोशिंदे असोत, अगर काणीहि असोत. हिंदुस्तानाने क्रांतीचाहि महिमा अनुभविला आहे आणि गेल्या शंबर वर्षे शांतीचीहि कसोटी अजमावली आहे. हिंदुस्तानचा आत्मा जर क्रांतीकर्मा नसता तर, ग्रीक आणि रोमन साम्राज्याच्या धुळीतून डोके वर

काढणा-या रानटी ब्रिटन लोकांच्या आंगाचा विदुषक रंग आणि पांगरलेली जनावरांची कातडी आजसुध्दा कायम राहून, त्याना न्यू कॅसलच्या काळशावर आपली दोन प्रहर साजरी करावी लागती.

क्रांतीला रामराम ठोकून जर आपले सर्व दरवाजे शांतीच्या अडसराने हिंदुस्थान घट्ट बंद करील तर अवघ्या २४ तासात हिंदुस्थानेतर सर्व जगाच्या भपक्याचे डोळे पांढरे होतील. शिकंदराच्या स्वरीपासून तो मोगल बादशाहीचा अंत होई पर्यत असंख्य परचक्राचे क्रांतिकारक धुमाकूळ या देशाने आपल्या हृदयावर सहज लीलेने खेळविले आहेत.दिल्लीच्या क्रान्तिकारक तक्तावर अनेक चक्रावर्तींच्या रियासती गाजल्या आणि ' मी चिरंजीव, मी अमर ' अशा वल्गना करता करताच, यथा काळ यथावकाश कान्तिचक्ताच्या भोव-यात गडप झाल्या. ब्रिटिशांच्या आगमनापूर्वीचा परचक्राचा इतिहास म्हणजे लुटालुटींचा बेबंदशाहीचा काळ, असे पुष्कळ बावळटाना वाटते. त्यावेळी हिन्दी लोकांचे जीवीत रात्रंदिवस धोक्यात असे, तरी राष्ट्रीय प्रगतीचा मार्ग आताप्रमाणे कधीच कोंदाटलेला नव्हता. लुटालुटीच्या नित्य दंगलीने व्यापाराचा प्रवाह डोंगराळ प्रदेशातून वाहणा-या नदीप्रमाणे चालत होता, तरी आर्थिक भरभराटीला आताप्रमाणे ऊर्ध्व वायूचा घरघराट कधीच लागलेला नव्हता. तो काळ पूर्ण कान्तिमय असल्यामुळे, प्रत्येक हिंदी स्त्रीपुरूषाचे मनगट आणि पाठकणा हव्या त्या परिस्थितीशी टक्कर देण्याइतका मजबूत आणि खंबीर होता. आसेतूहिमाचल रात्रंदिवस लढाईचे मामले अखंड चालू असता, वेळी एखाद्या सैन्याने शेतांतल्या उभ्या पिकाची कापणी करुन लुटली, तरी नगाला नग आणि डोळ्याला डोळ्याचा सूड उगविण्याइतका हिन्दी शेतकरी नांगरबहाद्दर आणि तलवारबहाद्दर असे पुरूषांचीच गोष्ट कशाला? पुरूष घरात नसता, दरवडे आणि परचक्रांची झाप हिंदी बायकानीहि परत फिरविल्याचे पराक्रम इतिहासात रेळचेळ आढळतात. रोजेची बाईल परका मनुष्य दृष्टीसमोर पळवून नेत असता, त्या अधमाचा जागच्या जागी मुर्दा न पाडता, आजूहाजूचे चार ' संभावूत साक्षीदार ' घेऊन पालिस ठेचणात ( Station ) कागदी फिर्यादी देणारे महात्म्ये त्या क्रांतीच्या काळात लोकांच्या स्वप्नी सुध्दा नव्हते; मग पाहयला कोठून मिळणार? असली नामर्दाची अवलाद शांतीच्या स्मशानयुगातच कशी पैदा होत असते, याचे दाखले चालू राजवटीत दररोज मुबलक दिसून येतात. हिन्दुस्थानने सम्राट अशोकाचा अखिल राष्ट्रीय शस्त्र-संन्यासहि पाहिलेला आहे आणि पानपतची घनघोर महायुध्देहि अनुभवली आहेत.

येथे शेकडो परकीयानी स्वा-या केल्या, कल्पनातीत रक्तपात केले, राज्यक्रान्त्यांचा धुमाकूळ उडविला, लुटारू धाडश्यानी संपत्तीची घवाडेच्या घवाडे काबूल कंदाहारकडे पळवून नेली, पण त्या वेळी सुध्दा हिन्दुस्तान आजच्याइतका जगायला नालायक आणि अन्नाला मोताद झाला नव्हता. औरंगजेबाची कारकीर्द भयंकर रंगात रंगविण्याचा मोह न आवरणा-या वृहस्पतीना सुध्दा हे कबूल करावे लागेल की त्या काळी सुध्दा भेदरट हिन्दु आणि आचरट मुसलमान उभ्या हिन्दुस्तानात सापडणे मुष्किलीचे असे. आजच्या शांतीप्रिय कमजोर दृष्टीला भयंकर वाटणा-या त्या क्रान्तीला काळात, हिन्दुस्तानची शेती ओसाड पडली नाहीं आणि तांदळाच्या चार दाण्याला शेतकरीहि कधी मोताद झाला नाही. कारागीर भिकेला लागला नाही आणि ज्ञानी पंडितालाहि उपासमार भोगण्याचे शांतिसौख्य अनुभवावे लागले नाही. क्रान्तीच्या या रक्तपाती लालबुंद युगात हिन्दी आदमी निसर्ग-निर्मित मिठाच्या खड्याला मुकला नव्हता, किंवा टीचभर चाकू सुरीला पारखा झाला नव्हता. कान्तीचा धुमाकूळ तुफानी झाजावाताप्रमाणे त्यांच्याभोवती अखंड घडामोडी घडवीत असतानाहि, हिन्दी मनुष्य सांसारीक आणि राष्ट्रीय झगड्यांच्या क्षेत्रात सवसारखा मर्द म्हणूनच सतत उभा असे. राजा कलस्य कारणम्. यथा राजा तथा प्रजा. या

म्हणी पुष्कळांना तोंडपाठ येतात. पूर्वीच्या कान्तीयुगात हिन्दुस्थान मर्द होता आणि आजच्या शान्तियुगात तो मुर्दा बनला. याची अनेक कारणे असली, तरी राजकारण हे मुख्य कारण आहे. म्हणूनत ब-याच एकाक्ष हिन्दी पुढा-यांचा राजकारणी काथ्याकुटावर बराच जोर असतो. ब्रिटिशपूर्व क्रान्तीकारक विजयी जेत्यानी दिल्लीच्या राजधानीत अनेक रियासतींच्या उलटापालटी केल्या; राजकिय सत्तेच्या जोरावर हिन्दुस्थानच्या सामाजिक धार्मिक आणि आर्थिक जीवनात त्यानी विलक्षण क्रान्ति केली आणि आपापल्या विशिष्ट संस्कारांची रयतेवर कायमची छापहि पाडली; पण त्यानी या देशाची आतडी कातडी धुवून आपापल्या देशाची घरे भरली नाहीत.

हिन्दुस्थानाला भणंग भिकारी बनवून, आपल्या देशाच्या वैभवाचे मनोरे उभारले नाहीत. हिन्दुस्थानची कामगिरी ठार आणि कारागीर उपाशी मारून, त्यानी आपल्या देशातल्या व्यापा-यांच्या गंगाअळी भरल्या नाहीत. देशी शेतक-यांच्या पाठकण्याचे मणके करांच्या करवतीने कापून, त्याना धान्याच्या राशीपुढे उपाशी मारले नाही. प्रत्येक विजयी जेत्याने दिल्लीचे सार्वभौम तत्क काबीज करताच, हिन्दुस्थानालाच आपला मायदेश मानून, येथेच कायमचे वास्तव्य केले. मोगल बादशाही तर हिन्दी जीवनात इतकी समरस होऊन गेली कीं, दिल्लीच्या तक्तावर बसलेल्या बारा बादशाहांपैकी सहा बादशाहांच्या माता हिन्दु होत्या. हिन्दुस्थानात वंश जाति धर्म क्तीहि भेद अस्तित्वात असले तरी मोगल रियासतीच्या अमदानीत, हिन्दु आणि मुसलमान दिल्लीकडे पाहताना एकदम एकजिनशी अभेदभावी बनत असत, ही मुद्याची गोष्ट आज हिंदु-मुसलमान-द्वैताची धुळवड शेणवड खेळणा-या हिंदी पुढा-यांच्या भ्रष्ट मनोवृत्तीत घुसत नाही. यथावकाश कान्तिचकाची गति बदलली आणि कान्तिप्रधान मोगल दिल्ला खतम् होऊन, त्या जागेवर सान्तिप्रधान ब्रिटिश दिल्ली चमकू लागली, तिच्या शांतिमय शंभर वर्षांच्या अमदानीत हिंदी शेतकरी किती उन्नत झाला, हिंदी कारागिराची केवढी भरभराट झाली, हिन्दी लोकांची इतिहासप्रसिध्द मर्दुमकी किती वाढली आणि या देशाची सांपत्तिक शक्ति किती वर्धमान झाली, याची चिकित्सा करणे, हे सुध्दा सध्याच्या शांतिप्रधान आणि कायदेबाज राजवटीत एक भयंकर महापाप होऊन बसले आहे.

पूर्वीच्या कान्तियुगात हिन्दी आदमी आणि विशेषतः शेतकरी मूठभर साठ आणि पोटभर भाकरीला तरी मुकलेला नव्हता; पण आजच्या शांतिप्रधान ब्रिटिश सुवर्णयुगात मोठमोठ्या विद्वान पंडीतानाहि भीक मागून पसाभर धान्य मिळवण्याची पंचाईत पडली आहे. सन १८५७ साली अखिल भरतखंडाने राजकारणी स्वातंत्र्यासाठी निर्वाणीच्या तगड्या झाडल्या; पण आज राजकारणाचा प्रश्न मागे पडून, भाकरीच्या सुक्या ओल्या तुकड्यासाठी आपंडित अनाड्याना हातापायाना आचके देण्याचा प्रसंग येऊन ठेपला आहे. ब्रिटिश राजवटीने आमच्या मेंदूची आणि जिभेची वाढ भरंसाट केली, पण पोटाच्या पापाकडे पाठ फिरविली. जगाचा एकूण एक व्यवहार पोटासाठी. ब्रिटिशानी हिन्दुस्थान घशात टाकले पोटासाठी. क्रांतीची भस्मासुरी भूक आणि शांतीची तृष्णा प्रथम पोटालाच लागते. इतिहालाची पृष्ठे मानवी रक्ताच्या लालभडक रंगाने रंगविणारी महायुध्दे आजपर्यंत या पोटानेच घडवून आणली. राजकीय वर्चस्वाची भावना, जित आणि जेते, कारखानदार आणि कामगार, किंवा मालक आणि नोकर हे भेद पोटाच्या पोटीच जन्मलेले आहेत. सावाचा चोर, सज्जनाचा दुर्जन, मित्राचा शत्रू, राजनिष्ठाचा राज्यक्रांतिकार बनविण्यांच्या कामी पोटांच्या तिडकाची वकिली किंवा याचनाच कारण होते. मानो मनुष्याच्या मानाची मान कापण्याचा कुपराक्रम, आणि स्वदेशाच्या उदरभरणासाठी परदेशाच्या स्वातंत्र्यावर कारस्थानचे जळजळीत निखारे ओतण्याची राक्षसीवृत्ति पोटानेच आजवर चेतविली. एक

पोट नसते, तर या जगाला मसणवटीचे रुप आले असते. मसणवटीत गुरे वावरतात, आणि तीहि म्हणे पोटासाठीच! तेव्हा मसणवटीची उपमाहि शोभणार नाही. पोट नसते तर जगच जगले नसते, किंबहुना ते अस्तित्वातच आले नसते. सगळी बंडे पत्कतली, पण पोटाचे बंड पत्करत नाही. राजकारणी कान्त्यांची बंडे आपल्याला मोठी भयंकर वाटतात.

कांतिचक्राचा थैमान सुरू झाला की त्यात पडणा-या माणसांच्या आहुती पाहून किंवा ऐकून आपले मन चर्र होते. परंतु त्या बंडांना किंवा मानवांच्या कत्तलीना कारण आपले पोटच आहे; अर्थात् ते किती भयंकर असले पाहिजे, याचा मात्र सहसा कोणी विचार करीत नाही. याचे कारण पोटाचा आपलेपणा किंवा आप्पलपोटेपणा. इंग्लडच्या ब्रेडबटरसाठी तांदळाच्या पेजेला गुकलेल्या हिन्दी शेतक-याची दैन्यावस्था पाहून आमचे ब्रिटिश सरकार सुध्दा जाड जाड रिपोर्टभरअश्रूंचा धबधबा गाळते. पण दैन्याला कारण आपल्या इंग्लण्डचेच पोट, ही नेमकी गोष्ट त्या धबधब्यात बिनचूक वाहून जाते व बेपत्ता होते. शेतकरी मेला कीं देश भिकेला लागला, ही गोल्डस्मिथची निर्वाणाची किंकाळी इंग्लण्डने धिःकारल्यामुळे त्याला व्यापाराच्या सबबीखाली स्वतःच्या पोचासाठी ब्रिटिश साम्राज्यवृध्दीचा आठारेटा करण्याची पाळी आली. हा अनुभव दृष्टीसमोर असताहि, स्वतःला पेज आणि इंग्लण्डला भात चारणा-या हिंदी शेतक-याचा -हास साम्राज्य-सत्ता-वाजीच्या मदात त्यानी उघड्या डोळ्यांनी पहात स्वस्थ बसावे हा मोठा क्रांतिकारक देखावा नव्हे काय? शेतक-याची शेतकी मेल्यामुळे तो कर्मचारी होऊन देशोधडीला पोटासाठीहवी ती मजुरी करुन जगण्याची धडपड करीत आहे. याचा परिणाम शहरी लोकावर होऊन; त्यांचीही उपासमार सुरु झाली आहे. म्हणजे पोटाच्या बण्डाचा धिंगाणा आता सर्व हिन्दुस्थानभर संचार करु लागला आहे. श्रमजीवी शेतकरी आणि वुध्यपजीवि शहरी वा दोघांच्याहि दुःखाना तीव्र एकजूनसीपणा आल्यावर, कान्तीच्या स्फोटाचा भाजी परिणाम यथातथ्थ वर्णम करण्याची कामगिरी भविष्य काळालाच चांगली साधेल. पोटाचे बण्ड आज सा-या जगावर धुमाकूळ घालीत आहे. रशियांतील राज्यकांति पोटानेच केली आणि झारला सहकुटुंब सहपरिवार कुत्र्याच्या मोतानें ठार मारला पोहि या पोटानेच.

जर्मनीसारखे बलाढ्य राष्ट्र, पण या टीचभर पोटाच्या आगीने त्याच्या सर्व शस्त्रास्त्र संपत्तीची राखरांगोळी करुन त्याला गायीपेक्षाहि हीन दीन केले. पोटाच्या बण्डानेच इंग्लण्डात मजूरपक्ष निर्माण झाला आणि चालू घटकेला ब्रिटिश साम्राज्याची सुत्रे याच पोटार्यी पार्थिवांच्या हाती दुस-यांदा आलेली आहेत. सर्व जगात पोटाने मारलेले जर कोणते राष्ट्र असेल तर ते हिन्दुस्थानच होय. जगाच्या पोटाच्या बण्डाची आग विझवण्यासाठी हिन्दुस्थानाने आजपर्यंत आपली चामडी सोलवटून घेतली. पण आज त्याच्या चमढीके झोपजीमे आग लागली असून, ‘बुझानेवाला कौन है?’ या त्याच्या किंकाळीला जगाकडून सक्रीय उत्तर मिळेनासे झाले आहे. पोटाचे भयंकर बण्ड येथे आज कित्येत अहोरात्र बिनअटकात व बिनउपाय चालू आहे. प.वा. दादाभाई नवरोजी, रमेशचंद्र दत्त प्रभृती अर्थशास्त्रपटूनी वाढत्या हिन्दवी दारि-याची आरोळी ५० वर्षापूर्वीच मारली. राजकिय बंडाच्या उपक्रमाचा नुसता खरा खोटा बास येताच त्याच्या पाळ्या मुळ्या उखडताना जे ‘व्यापारी’ इंग्रेज सरकार सुक्या ओल्याचीहि लवमात्र क्षिती बाळगीत नाहीं, त्याला एतद्‌देशीय पोटाच्या बण्डाची मात्र दखल करण्याची बुद्‌धी होत नाही. इंग्रेजी साम्राज्याचा जगढ्व्याळ वेलविस्तार वाढविला आणि अखेर आज त्याच इंग्लण्डचे तेच पोट-मजूरपक्षाच्या रुपाने-प्रबळ बण्डखोर बनून त्याच साम्राज्याचे कर्णधार व सूत्रधार होऊन बसले आहे. पोट काय करणार नाही? --नव्हे, करवणार नाही? पोटानेच हिन्दी नागरिकाना आणि शेतकरी मजुराना

फिजी केन्याचे काळे पाणी दाखविले आणि पोटाच्या बण्डामुळे तेथे उपरे आलेले गोरे लोक बण्डखोर आणि मस्तवाल बनले. पोटाच्या पोटी पुण्याच्या काय काय खाणी आहेत, याचा ठावठिकाण जरी अद्याप कोणास लागलेला नाही, तरी पोटाची पापे आज सा-या जगभर दिवसाढवळ्या मोकाट वावरत आहेत, यात मुळीच संशय नाही. 'ना विष्णूः पृथिवीपति' या अजागाळ भावनेने राजा आणि राज्यकारभारी यांच्या तोंडाकडे पाहून, आपल्या सर्वांगीण जीवनाच्या उत्क्रान्ति अपक्रान्तीची सट्टेबाजी खेळण्यास सवकलेल्या हिन्दी लोकाना न झाल्यामुळे, वर्तमान दैन्याचे खापर ते ब्रिटिशांवर फोडतात. पण ही चूक आहे.

मांजर उंदरासाठी, कोल्हा कोंबजासाठी, पठाण-मारवाडी, व्याज्यासाठी, भट दक्षणेसाठी, भांडवल्या नफेबाजीसाठी, कायस्थ प्रभु कारकुनीसाठी, मराठा-क्षत्रियत्वाच्या कोरड्या ऐटीसाठी, झब्बू मानपानासाठी, पारशी दारू-ताडीच्या मक्त्यासाठी, मद्राशी पोट भरण्यासाठी, आणि ऐदी श्रीमंत कोणशीलदारीसाठी जसे जीव टाकतात, तसा इंग्रेज प्राणी व्यापारसाठी जगाच्या पाठीवर हवा तेथे जीवाचे रान करीत भटकत फिरेल. व्यापार म्हणजे इंग्रजाचा देव. तोच त्याचा धर्म आणि तेच त्याचे वर्म. या वर्माच्या मर्माला जरा मुंगी चावली की इंग्रजाचा प्राण तेव्हाच कासावीस होतो. इंग्रजानी हिन्दुस्थान देश पादाक्रान्त केला, तो हिन्दी लोकाना माणुसकी देण्यासाठी, त्याना सुधारण्यासाठी, वगैरे गप्पा, भाषा-सौदर्याचे मासले आहेत. शिकंदर तार्तर मोगलाप्रमाणें इंग्रेज जर जात्या शुध्द राजकारणी देश-जेते असते, तर हातात तागड्या घेऊन सा-या जगाच्या ज्ञात अज्ञात भागांत त्यानी आपली तंगडतोड केलीच असती कशाला? जशी गूळ तेथे माशी आणि व्हेकन्सी तेथे मद्राशी तसा जेथे व्यापार तेथे इंग्रज , हा सनातन सिद्धान्त समतावा. व्यापारापलीकडे तसा इंग्रजाजवळ राजकारण नाही, समाजकारण नाही, धर्म नाही आणि नीतीहि नाही. व्यापार नसेल तेशे इंग्रज श्वास सोडायलाही पळभर राहणार नाही. इंग्रेजी व्यापारीचू पकड राजकारणाच्या आटारेट्याशिवाय जर कायमची शाबूत टिकत असेल, तर इंग्रेज लोक राजकारणाच्या फंदात पडायला मुळीच तयार नाहीत. मात्र व्यापारी पकडीची मांड जर राजकारणी वचकाशिवाय किंचितहि ढिली पडण्याची त्याना शंका असेल, तर तेवढ्यासाठी राजकारणच काय, हवे ते नवे कारणसुद्धा हाताळायला इंग्रेज लोक मागेपुढे पाहणारे नव्हत. हिन्दुस्थानाच्या एकमुखी एकसुत्री सम्राटपदाची दिल्लीची किल्ली इंग्रेजानी केवळ व्यापाराच्या आचद्रार्क अमरपट्ट्यासाठीच हस्तगत केली आहे. त्यात त्याना राजकारण साधावयाचे नाही किंवा राजनीतिशास्त्रावर नवीन शोध लावायचे नाहीत. बोलून चालून इंग्लंड हे 'शॉपकीपर्स नेशन' ( दुकानदारीचे राष्ट्र ). त्याना मोगल बादशाहीप्रमाणे चक्रवर्तिपदाचे बेगडी ऐश्वर्य मिरवून आणि हिन्दी लोकांच्या आत्म्यात आत्मा मिसळून करायचे काय ? केवळ व्यापाराच्या वृध्दीसाठी नाइलाजाने त्या बिचा-याना या भरतखंडाच्या सम्राटपदाची उलाढाल करणे भागच पडले.

राजकारण म्हणजे इंग्रेज प्राण्यंचे साध्य नसून साधन आहे. अशा प्राण्याशी राजकारणी झगडा देऊन स्व-राज्. प्राप्तीच्या दंगली करणारे हिन्दी लोक मुर्ख नव्हत तर कोण ? इंग्लंड बोलून चालून बलियांचे राष्ट्र. बनियेगिरी हाच प्रत्येक इंग्रेजाचा पिंड. राजकारण असो नाहीतर धर्मकारण असो, इंग्रेज आदमीं त्याला व्यापारी धोरणानेच हाताळीत असतो. अशा बनिया वृत्तीच्या आणि भांडवली पिण्डाच्या इंग्रजानी शुद्ध तत्वज्ञानी हिन्दुस्थान घशात उतरून, आज ते या महाखण्डाचे धनि होऊन बसले. इंग्रजानी हिन्दुस्थान कसे पाजाक्रान्त केले, कां केले, वगैरे ऐदी प्रश्नंची चिकित्सा आज फुकट आहे. इंग्रेज आज हिन्दुस्थानाचे जेते मालक आहेत आणि हिंदी लोक आज त्यांचे जित गुलाम आहेत. ' स्वराज्य माझा

जन्मसिद्ध हक्क आहे ' असल्या आरेळ्या ठोकणा-या बृहस्पतीनी, इंग्रेज बनियांच्या पचनी पजणा-या आपल्या बापजाद्यांचा गाढवपणाबद्दल, चुकून सुद्धा एकदा निषेधाचा फूत्कार काढल्याचे कधी कोणी ऐकले आहे काय ? बळी तो कान पिळी आणि ज्याच्या हाती शिकार तो पारधी हा व्यवहाराचा निसर्ग धर्म दृष्टीआढ करून, इंग्रेजी सत्तेविरुद्ध सिव्यागाळीची नुसती आदळ आपट करणे, एवढेच बडे राजकारण हिन्दुस्थानातील बडे राजकारणी झब्बू गेली ३०-३५ वर्षे अहमदभिकेने खेळत बसले आहेत. पक्षभेद पंथभेद धर्मभेद जातिभेद वगैरे भेदांचे भिन्न भिन्न विदुषकी पोशाख घालून जरी हे झब्बू आपल्या वाणकोटी नाचांची कमाल रात्रंदिवस करीत असले, तरी इंग्रेजी सत्तेला नुसत्या बायकी शिव्या देण्यापलिकडे एकाहि गाढवाची मजल गेलेली दिसत नाही.

नॅसनल कॉंग्रेस घ्या, वृत्तपत्रे पहा, सामाजिक परिषदा अभ्यासा, यूथलीगा तपासा, किंवा रस्तोरस्ती गल्लोगल्ली नित्य उफलणारे हिंदुमहासभेच्या तोडपाटलिकीचे सुरनळे पहा, जिकडे पहाल तिकडे शहरी झब्बूंचा गाढवांचा गोंधळ आणि लाथांचा सुकाळ ! निरनिराळ्या चळवळीचा धुमाकूळ सर्वत्र अखंड माजल्यामुळे, ब-याच बावळढाना स्वराज्याचा चांदोबा डोक्यापासून दीड बोटावर आल्याचा भास होतो. पण राष्ट्रीय स्वातंत्र्याचे आकाश चुटकीसरसे चाटण्यासाठी हात हातभर जिभा बाहेत काढणारांना आपल्या पायाखालची जमीन खचत चाचली आहे आणि आजूबाजूला कसली आग भजकली आहे, याची मुळीच दाद नाही. इंग्रेजी सत्तेचा फास ज्या ज्या वळणानी, गाठीनी आणि पेचानी हिन्दुस्थानाच्या गळ्याभोवती बसत गेला आणि अखेर ब्रम्हगाठीने कायम घट्ट झाला, ती वळणे त्या गाठी आणि ते पेच, ब्रम्हगाठीकडून उलट सुरूवात करून सोडविल्याशिवाय हा फास सुटणे शक्य नाही.

**प्रकरण २ रे**

पोटाच्या पापाचा व्याप बेदरकार आणि बिनकाळजाच्या भांडवलशाहीचा व्याप बाढला, श्रीमंतांच्या चैनबाजीच्या भस्मासुरी भुकेचा वणवा चोहीकडे भडकला, देशातली संपत्ति काही थोड्या धनाढ्यांच्या तिजो-यात अडकून, जनता अनन्य दशेला येऊम मिळाली आणि शेतक-याच्या शेत-जमिनीवर श्रीमंत भांडवल्यांचे वाडे आणि कारखाने बसले की त्या देशाचा -हास होत चालला, असा सिद्धांत गोल्डस्मिथ कवीने आपल्या ' उध्वस्त खेडे ' काव्यात सन १७७० साली व्यक्त केला. आज या सिद्धान्ताला २६० वर्षे होत आली. विषयाच्या प्रतिपादनासाठी कवीने इंग्लण्ड देश घेऊन त्याच्या -हासाचे चित्र रंगविले आहे. शेती बुडविल्यामुळे इंग्लण्डचा -हास झाला, असे कवीने म्हटले आहे, ते कितपत खरे खोटे किंवा कल्पनामय काव्य, हा प्रश्न बाजूला ठेवला, तरी इंग्लण्ड शब्दाच्या जागी इंडिया शब्द घातला तर आपल्या जातभाईच्या अमदानीत हिन्दुस्थानची अवस्था कशी होणार आहे, याचेच भाकीत गोल्डस्मिथने करून ठेवले, असे म्हणावयास हरकत नाही. भांडवलशाही नंगा नाच सुरू होण्यापूर्वी, इंग्लण्डची स्थिती कशी होती ? कवि म्हणतो - A time there was, era England's griefs began, When every rood of ground maintained its man; For him light labour spread her wholesome store; Just gave what life required, but gave no more; His beat companions, innocence and health; And his best riches.ignorance of wealth. [भावार्थ - इंग्लण्ड देशावर दुर्दैवाचा पगडा पडण्यापूर्वी असा एक काळ होता की, त्या वेळी जमिनीचा एकूण एक तुकडा प्रत्येक मनुष्याला पोटभर भाकर देत असे. थोडेसे श्रम केले की धट्ट्याकट्ट्या जीवनाला लागणा-या अन्नवस्त्रादि सर्व आवश्यक गोष्टी त्याला गरजेपुरत्या सहज मिळत असत. बाजवीपेक्षा फाजील पुरवठा होत नसे आणि त्याची जरुरहि नसे. सर्व लोक सुखी संतुष्टचित्त आणि निरोगी असत. जवळ जे काही

असेल त्यातच समाधान मानून, द्रव्य साठवून ठेवण्याची आसुरी लालसा त्यांना कधीच शिवली नाही.] ब्रिटिशांच्या आगमनापूर्वी माती मळून सोने काढणारा हिन्दी शेतकरी याच समाधानी वृत्तीचा आणि स्थितीचा नव्हता काय ? पण इंग्लण्डातल्या पोटाच्या बंडाने बोकार बनलेल्या लोकांच्या माध्यान्हीची सोय लावण्यासाठी, जेव्हा इंग्रेजादि युरपियन बनियांच्या तागड्यांच्या तंगड्या हिन्दुस्थानाला भिडल्या आणि राजकारणाबरोबरच सुधारणेच्या नावाखाली भांडवलशाहीचा व्यापारी नंगा नाच येथे सुरु झाला, तेव्हा हिंदी शेतकरी बसल्या जागी शेतीच्या मातीत कसा मळला मिसळला गेला, याचे शब्दचित्र किंवा भविष्य गोल्डस्मिथ कसे थोडक्यात रंगवितो ते पहा :- But times are altered; trade's unfeeling train Usurp the land, and dlspossess the swain; Along the lawn, where scattered hamlets rose, Unwiedly wealth and cumbrous pomp repose, And every want to luxury allied, And every pang that folly pays to pride. [भावार्थ :- पण तो सुखाचा काळ गेला । व्यापारावर आपल्या तुंबड्या भरण्यास लालचटलेल्या पाषाणहृदयी लोकांनी सगळ्या शेतजमिनी गिळंकृत करुन, शेतक-याला देशोधडीला हाकून लावले. ज्या भूमीवर पूर्वी शेतक-यांची झोपड्यांची खेडी तुरळक तुरळक सर्व वसलेली असत, त्याच समृद्ध भूमीवर श्रीमंतांच्या डोईजड ऐश्वर्याचे टोलेजंग वाडे वसले. येथे धनाडय ----- लोक आपल्या चैनवाजीच्या कृत्रीम सुखास्वादात मग्न असतात. या चैनवाजीत तरी त्यांना ख-या सुखाची प्राप्ती होते काय ? मुळीच नाही.

चैनबाजीच्या पोटी निपजणा-या अनेक दुःखांचे पोट, श्रीमंतीच्या घमेंडीचा मूर्खपणा सावरण्यासाठी त्याना घशाखाली लोटावेच लागतात. ] प्रस्तुत वर्णन किती यथार्थ आहे, याची शिफारस करण्याची जरुरी नाही. देशी उद्योगधंद्याच्या वाढीच्या गोंडस सबबीखाली, एकट्या मुंबई इलाख्यातील काही जिल्हातल्या खेड्यात थाटलेले भांडवलशाही कारखाने पहा म्हणजे खात्री पटेल. शेकडो शेतक-यांच्या हजारो एक– पिकाळ जमिनी या कारखान्यांच्या पायात गडप होऊन, तेच स्वावलंबी शेतकरी त्याच कारखान्यात मिळेल त्या रोजाने पडेल ती मजुरी करीत आहेत. दारिद्र्याचा वणवा सर्वत्र भडकल्यामुळे रोख रोजदारीला चटावलेला शेतकरी सुद्धा, नांगरणी पेरणी कापणीच्या यातायातीला रामराम ठोकून, या कारखान्यात मजूर म्हणून घुसला आहे. हातशी शेतीचे काम करणारे मदतगार भाईबंध खेड्यातून उठून गिरण्याकारखान्यात गेल्यामुळे, उरल्यासुरल्या शेतक-यांना शेकडो एकर जमीन नापिक टाकून, एकट्या दुकट्याला बनेल तेवढ्याच तुकड्यांची मशागत करुन जगण्याचा प्रसंग आला आहे. बरे, हे कारखाने तरी देशी कसे म्हणावे ? विलायतचा कच्चा माल आणून त्यावर हे देशीब्रूब कामगिरीची पैदास करणारे, विलायती व्यापा-यांचे आश्रयदाते एजण्ट ! लोखंडी नांगराचेच कपूर-किर्लोस्करी कारखाने घ्या. एकजात शेतकरी शेती ओसाड टाकून, किंवा ती असल्या कारखान्यांच्या भक्ष्यस्थानी घालून, शुद्ध पोटार्थी मजूर बनल्यावर, किंवा बनविल्यावर, हे विलायती बिडाचे लोखंडी नांगर कोणाच्या उरावर चालविणार ? जुना पुराणा लाकडी नांगर चालविण्यासहि जेथे शेतकरी शिल्लक नाही, तेथे लोखंडी नांगरांची अकरमाशी पैदास, भांडवल्या हृदयाची ठेवण कशी उलटी आहे.

इतके मात्र स्पष्ट दाखविते. तात्पर्य, उद्योग धंद्याच्या वृद्धीच्या सफेत सबबीवर निघालेले हे असले कारखाने, गिरण्याप्रमाणेच, शेतक-यांच्या शेतीच्या मुळावर आलेली मूळनक्षत्रेच होत, यात मुळीच शंका नाही. कारणे काहीहि आणि कितीहि असोत, आज हिन्दुस्थानात शेती आणि शेतकरी हे शब्दच काय ते शिल्लक आहेत. बाकी, एकजात पूर्वीच्या पिढीजात शेतक-यांचा वंशज आज पोटासाठी हवा तो रोजगार करणारा निर्भेळ मजूर बनून, आपल्या बापजात्यांच्या जन्म-कर्म-भूमीला ( उध्वस्त खेड्याला ) रामराम

ठेकून, मुंबईसारख्या गिरणाळू शहरात येऊन पडला आहे. इंग्रेज सरकारच्या शेतकी आक्टातले स्वार्थ साधण्यासाठी ‘ मी शेतकरी, मी शेतकरी ’ म्हणून पंचांगबहाद्दर भटापासून तो शेमलेबहाद्दर मराठ्या झब्बूपर्यंत सर्व वीरपीर कोर्टत हजर होतात. पण भाडभीक सोडून चौकशी केली तर पूर्वीच्या शेतक-यापैकी जेमतेम शेकडो पाच नांगरावर टिकून असतील नसतील ! बाकी सगळे पोटाच्या पापाच्या व्यापाने ‘ जिकडे भरला दरा, तो गाव बरा ’ असे देशोधडीला लागून उध्वस्त झाले आहेत. पोटाच्या पापाचे उत्तम प्रदर्शन म्हणजे मुंबई. हिन्दुस्थानाच्या अवाढव्य पोटच्या खास तिडका मुंबईस केन्द्रित झालेल्या आहेत. भरतखण्डाच्या पोटाच्या माप मुंबईच्या ताजव्यात खुशाल बुनचूक मोजून घ्यावे. मुंबई आणि पोट या दोन शब्दांची सांगड इतकी निकटची पडलेली आहे की मुंबईकडे धाव घेणारा प्रत्येक माणूस- मग तो महाराष्ट्रीय असो, नाहींतर यण्डुगुण्डु मद्राशी असो- पोटासाठी वाटेल ती खटपट करणाराच असतो. पोट जसे टीचभर पण त्याचा व्याप जगभर, तशी मुंबई टीचभर पण तिचा पोटाचा आटारेटा जगभर, पोटाच्या पापाने नाडलेला प्रत्येक प्राणी अखेर निर्वाणीला मुंबईची कास धरतो.

व्यापार, उद्यागधंदा, शास्त्रें, कलाकौशल्य, विद्या वगैरे सर्वच बाबतीत मुंबईने पहिला नम्बर पटकविलेला पाहून, सत्कृद्दर्शनी तिच्या बाह्य झकाकीने प्रेक्षक अगदीं थक्क होतो. चोवीस तास अहोरात्र चैतन्यपूर्ण असलेल्या या नगरभवानी ( Queen of cities ) च्या इन्द्रधनुतुल्य सौन्दर्याने तो मोहित होतो. परन्तु या सर्व बाह्य लकलकाटाच्या मुळात पोटाच्या पापाचे खत पडत आहे, हे मात्र त्याच्या कल्पनाचक्षूला गोचर होत नाही. विद्युत्प्रकाशाचा लखलखाट. खण्डोगणति गिरण्यांचा धडधडात, मोटार टामरेलीचा खडखडाट आणि मुंग्यांच्या वारुळालाही लाजविणारा रस्तोरस्ती व गल्लोगल्ली असणारा पोटार्थी पाप्यांचा सुळसुळाट पाहून क्षणभर कौतुक वाटते. पण–अरेरे ! पण या सर्व धडपडाटाची लखाकी कितीअमानुष तत्वावर चाललेली आहे ! गिरण्या व तत्सम इतर कारखाने पाहिले की आम्ही औद्योगिक मोक्षाच्या मन्दिराकडे झपाट्याने चाललो आहो, असा भास होतो खरा. परन्तु या मोक्षसाधनाच्या तपश्चर्येत आम्ही कोणकोणाची आणि किती आहुति देत आहो, याची खुद्द तापस्यांनाच जर कल्पना होत नाही, तर इतराना कशी व्हावी ? किती तरण्याबाण्ड जवानांच्या शरीराची माती या गिरण्यात पडत असते ? किती ? जवान स्त्रियांच्या अब्रूचे धिण्डवडे रात्रन्दिवस उडत असतात ?किती महत्त्वाकांक्षी माणसांच्या आयुष्याच्या दो-या या गिरण्यानी व कारखान्यानी तोडल्या आहेत ? किती लहान बचड्याना अगदी लहानपणापासूनच ‘ तू मजूर आहेस, तुझा जन्म या गिरण्यामध्ये राबण्याकरिताच झालेला आहे ’ असे प्रत्यक्ष शिक्षण या औद्योगिक कारखान्यनी दिले आहे ? गिरण्या कारखाने फॅक्ट-या वगैरे संस्था, पोट भरण्याच्या जागा आहेत, या भावनेने आपले घरदार गणगोत शेतवाडी व पुष्कळ प्रसंगी पोटची पोरे टाकून मुंबई व तत्सम गिरगाळू, ठिकाणी धावत आलेल्या किती पोटार्थ्यांचे पोट आजपर्यंत भरले आहे ? चामडीच्या झोपड्याना लागलेल्या आगी आजपर्यंत कितीशा बुझालेल्या आहेत ? उप्पर तो और बनी, अन्दरकी बात खुदा जाने ! इतर ठिकाणची गोष्ट सोडून द्या. फक्त एकट्या मुंबईतील गिरणी कामगारांचीच स्थिती पहा.

त्यांची रहाण्याची ती खुराडी, त्यांची अन्नानदशा, त्यांच्या शरिरावरच्या त्या चिन्ध्या, रात्रंदिवस अक्षरक्षः काबाडकष्ट करुन त्यांच्या चेह-यावर आलेली ती प्रेतकला, कुटुम्बात राहूनहि त्याविषयी वृद्धिंगत होणारा निराशाजन्य एक प्रकारचा तिटकारा, जीवित म्हणजे एक पाण्याचा बुडबुडा किंवा गिरणीवाल्या शेट्याची गुलामगिरी करण्यासाठी देवाने दिलेला एक काळ, या कल्पनेमुळे व्यसनांचा झालेला अतिरेक आणि दिवसाचे चोवीस तास जीवन-कलहानी तोंडगिळवणी करता करता मोटाकुटीला

आलेली ती त्रासदायक चिडखोर वृत्ति, हे चित्र पहाणा-याच्या तोंडून अखेर हाच उद्‌गार निघेल की ‘ नरक जर पृथ्वीवर कोठे असेल तर तो येथेच येथेच येथेच ’ ! सारांश, गिरण्या कारखाने व फॅक्ट-या म्हणजे जिवन्तपणीच माणसाना मरणाचा अनुभव दाखविणा-या आणि माणसे असताहि त्यांची जनावरे बनविणा-या नरकाच्या खाणीच हाटल्या तरी चालतील. या खाणी कोणी उत्पन्न केल्या ? या खाणी पोटाने निर्माण केल्या. होय. पण असे हे पोट तरी कसले कीं, त्याची खाच बुझविण्यासाठी कोट्यावधि माणसें जिवन्तपणी प्रेतासमान होतात ? असे हे राक्षसी पोट तरी कोणाचे की ज्याच्या शान्तवनासाठी लाखो लोकांच्या पोटातली आतडी पिळून निघावी ? त्यांच्या रक्ताचे झालेले पाणी सुद्‌धा त्यांच्या शरीरात उतरू नये ? औद्‌योगिक प्रगतीच्या नावाखाली अखिल राष्ट्राच्या शारिरीक प्रगतीचे होळकुकडे करण्यास उद्‌युक्त झालेले आणि भुकेने पेटलेली पोटे ‘ दया करा, थोडी अधिक भाकर द्‌या ’ म्हणून किंकाळ्या मारीत असतचाना, ज्या पोटाच्या वीत दीडवितीवरच असलेल्या कानांची भोके साफ हुजून जातात, असे हे पोट तरी कोणते ? आणि केणाचे ? हजारो लाखो पोटांच्या तिडकांवरच ज्याची डूक भागविली जाते असे ते पोट म्हणजे प्रदर्शनात ठेवण्यासारखी एखादी वस्तू असेल काय ? नाही. पोटासारखेच पोट ; पण त्याच्या भुकेची आग आणि खाद मात्र फार भसंकर. हे पोट दुसरे तिसरे कोणाचे नसून गिरणीवाले कारखानदार यांचे होय.

जगातल्या पोटांच्या पापावर या बड्‌या पोटांची खाज शृगांरली जात असते. कारखानदार आणि कामगार यांच्यामध्ये श्रीमन्तीचे एक भले जाडजूड फिल्टर लटकले असल्यामुळे, कामगारांच्या लक्षावधि पोटांच्या तिडका त्यात शिरताक्षणीच त्याचे पौष्टिक खाद्‌यात रूपान्तर होते. या फिल्टरमुळे मजुराच्या पोटाच्या किंकाळ्या कारखानदाराना मुळीच ऐकू न येता, त्या ऐवजी त्यांच्या श्रीमन्ती वैभावाला झिलईची झकाकी चढविणा-या स्तुतिस्तोत्राच्या मंजुळ गायनात त्या किंकाळ्याचे परावर्तन होते. पोटाच्या पापाचे निर्माण केलेल्या श्रीमंत आणि गरीब या भेदाने जगात आजपर्यंत जितके अत्याचार केलेले आहेत, तितके महायुद्‌धानी राज्यक्रांत्यानी किंवा ठगांच्या दरोड्‌यानीहि केलेले नाही. पोटाच्या पापातून श्रीमन्ती जन्माला आली असल्यामुळे माणसाची जनावरे बनविणे आणि पशुक्षाहि जडमुढाना माणुसकीता मुलामा चढविणे, या गोष्टी तिच्या सहडलीला होऊन बसल्या आहेत. श्रीमन्तीचे आवरण जर खेचून झुगारून दिले तर तिच्या अतरंगाच्या मसाल्यांच सा-या जगाच्या पातकाचा सफडा नरक ओतप्रोत भग्लेला आढळेल. इतकेच नव्हे तर शेकडा ९८-९९ श्रीमंत फक्त श्रीमंतीच्या प्रसादानेच माणसात मोडतात, नाही तर त्याना टोणग्या डुकरापेक्षा अधिक कसलीहि किंमत नाहीं, हेच अखेर प्रत्ययाला येते. शहरी शहाणे जिला सुधारणा सुधारणा म्हणतात, ती भांडवल्यांच्या श्रीमंतीची आणि चेनबाजीची बुरखी सबब आहे. कारखाने व गिरण्या या सबबीची हत्यारे असून, त्यानी शहरी जीवनात इलायट्रीची कितीहि भपकेबाज दिवाळी केलेली असली, तरी त्यानी खेड्‌यातला शेतकरी पोटाच्या पापाने पामर बनबून भिकेला लावला, ही गोष्ट सहसा कोणाच्या लक्ष्यात येत नाही.

सुधारणेच्या नावाखाली मुंबईसारखी शहरे पृथ्वीवरील स्वर्ग बनली, तरी त्या स्वर्गाने सर्व खेडी उध्वस्त करुन शेतक-याच्या शेतीचा नरक बनविलेला असतो, हे पाहावयाला शहरी शहाण्याना दृष्टीच उरलेली नसते. सुधारणेला सुखाची माता मानणा-याना गोल्डस्मिथ म्हणतो :- Ye friends to truth. Ye statesmen who survey The rich man’s power increase, the poor’s decay, ’Tis yours to judge, how wide the limits stand Between a splendid and a happy land. “गोरगरीबांच्या -हासावर श्रीमंतांची सत्ता वाढत चालली आहे, हे स्पष्ट पहाणा-या, अहो सत्याच्या

भोक्त्यानो, अहो मुत्सद्यानो, ढामडौली दिमाखाचे राष्ट्र म्हणजे सुखी राष्ट्र नव्हे, हे तुमच्या जितके लवकर लक्ष्यात येईल तितके बरे.” कारखानदार श्रीमंत हजारो रुपये किंमतीच्या मोटारी उडवीत आपल्या धनकनकसंपन्नतेचे प्रदर्सन करीत असतात. पण, ही मोटारदौड आपण पोटार्थी गरीबांच्या पोटावरच करीत असतो, हे त्यांच्या लक्ष्यात येत नाही. गिरणीवाल्या शेट्यांच्या मोटारी जिवंत माणसांच्या ताज्या तिखट कष्टाळू रक्ताच्या पेट्रोलवर दौडा मारीत असतात. गोरगरीबांच्या आंगातून थबथब निथळणा-या घामाच्या पाटाचे वंगण या ऐदी श्रीमंत घेलाशेटांच्या मोटारीत पडत असते. लाखो स्त्री पुरुष आणि मुले यांच्या शरीराची हाडे न् हाडे पिचतात, तेव्हा या नफेबाज घनाड्यांच्या माड्यांची बहाले आणि मोटारींचे सांगाडे सज्ज होतात. शेतीला मुकून अन्नान्न झालेल्या स्त्री पुरूष मजुरांच्या ऐन उमेदी जीविताच्या राखरांगोळीवर या लाखाधिशाना पुरुषोत्तमत्वाचा अधिकार प्राप्त होतो आणि सामाजिक क्षेत्रात यांच्या मोठेपणाच्या टिमक्या वाजतात.

पोट पैशासाठीं पापाचा परवल पत्करते, पण पैसा मात्र असा हरामखोर आहे कीं तो वाटेल तसल्या पापावर पुण्याचे पांघरूण पांघरतो. आजच्या जगात श्रीमंत व गरीब, मजूर व कारखानदार, ऋणको व धनको, आणि गुलाम व धनी, हे जे भेद माजले आहेत, त्याला मूळ कारण चमडीके झोपडीमे लगी हुई आग हे जरी असले, तरी तिच्या ज्वाळा अव्याहत भडकत ठेवण्यावरच श्रीमंतांच्या श्रीमंतीची भरती असल्यामुळे, श्रीमंतीच्या न शमणा-या भुकेनेच हे भेद दिवस न् दिवस अधिकाधिक तीव्र होत चालले आहेत. सगळी पोटे पत्करली, पण श्रीमंतीची भूक लागलेल्या भांडवलशाहीच्या पोटाची आग परवडत नाही. सामाजिक समतोलपणाचा कल भांडवलशाहीच्या राक्षसी पोटाकडे कलंडल्यामुळे आज पोटार्थी गरीबांचे हे हाल, किंवा त्यांच्या पोटाचे बण्ड कसे थांबवावे, हा प्रश्न सध्या महत्त्वाचा आहे.

**प्रकरण ३ रे**

बाण्डगुळ्या मध्यम वर्ग गेली ५० वर्षे इंग्रेजी विद्या, विलायती सुधारणा, व्यापाराची वाढ इत्यादी थाटामाटाच्या पचनी पडलेल्या आणि त्यावरच आपले बाण्डगुळी जीवन ऐषआरामात घालविणा-या मध्यम पांढरपेश्या वर्गाला स्वर्ग अगदी दोन वोटे उरलेला होता. त्यांचे जीवन बोलून चालून अक्षरशः बाण्डगुळेच असल्यामुळे, अन्नदात्या पल्लवप्रसारा पलिकडे आणखी जग असल्याची भावना त्याना कल्पनाच नव्हती. त्यांची सारी सृष्टी म्हणजे मुंबई. तिच्यावरुन हे जगाच्या परिस्थितीची अटकळ बांधणारे उंटावरचे शहाणे. मध्यम वर्ग ही एक हिन्दुस्थानातील समाजशास्त्राची नवीन कमाई आहे. ब्रिटिश जुन्या राजवटीत असल्या बाण्डगुळ्या वर्गाचा हिंदी समाजरचनेत मागमूलही लागत नाही. हिंदुस्थानेतर कोणत्याही देशांत या मासल्याचा आणि मसाल्याचा वर्ग आजही आढळून येणार नाही. श्रीमंत आणि मजूर, मालक आणि चाकर, असे दोन ठळक भेद सर्वत्र आहेत आणि ते असणारच. पण या दोन भेदांच्या मध्यें, आगगाडीच्या बफर प्रमाणे असणारा, परंतु श्रीमंत भांडवल्ये मालक आणि राज्याधिकारी यांच्या कृपेच्या खोडाला बाण्डगुळा प्रमाणे चिकटलेला, मध्यम वर्द फक्त हिन्दुस्थानातच आढळतो. या वर्गात निरनिराळ्या जातीचे लोक असले, तरी त्यांच्या व्यवसायाची आणि मनोवृत्तीची माती एकाच खाणीची असते. या खाणीचा शोध करता असे आढळून येते कीं हा बाण्डगुळ्या मध्यम वर्ग म्हणजे प्राचीन प्रतिष्ठित श्रीमंतशाहीचा कोलमडून पडलेला -----सडका ढलपा होय. श्रीमंतीचा वटवृक्ष उभा सुकून त्याची पाळीमुळे जरी क्रान्तीच्या वणव्यात जळून खाक झाली, तरी यद्दच्छेने वाचलेल्या या ढलप्याची प्रतिष्ठितपणाची गाठ अझून बरीच ताठ आहे. याचा डामडौल आणि झोकनोक पहावा तर सरदारी श्रीमंतीचा, पण वस्तुस्थिति मात्र कंगाली.भिका-यापेक्षा भिकारी आणि मजूरा

असूनहि, या पांढरपेश्या वाण्डगुळ्यांना धनीपणाची श्रीमंती मिरवण्याची हातोटी उत्तम साधलेली आहे. गोरगरीबाच्या थर्ड क्लासात प्रवास करावा तर यांच्या प्रतिष्ठेचे पाणी पाणचट पडते आणि सेकंड क्लासच्या दिडक्या खर्च करायला याना तोंडच नसते. स्वतःच्या उदरंभरणा पलीकडे अधिक अक्कल जवळ नसली, तरी ब्रम्हदेवाने अकलेची सारी वखार आपल्याच हवाली केली आहे. अशा आढ्यतेने राजकारण समाजकारण धर्म नीति हव्या त्या विषयावर यांची वाचाळपंचविशी म्हणजे मुल्कमैदानची मावसबहीण.हे लोक मोठे सव्यासाची दिसतात.

एकाच तोंडाने राज्यनिष्ठेची आणि जननिष्ठेची गरम सर्द हवा सोडणे यांच्या बत्तीशीची सहजलीला. एकीकडे सरकारी नोक-यांत राबत असतात, किंवा परदेशी गो-या व्यापा-यांच्या आणि असहकारवादाच्या चळवळीला फुंकर मारतात. उपजीविकेसाठी हा पांढरपेश्या वर्ग राज्यकर्ते, श्रीमंत, भांडवले वगैरेच्या तैनातीत बाण्डगुळा प्रमाणे अखंड चिकटलेला असल्यामुळे, मागासलेल्या पद-दलित मजूर शेतक-यांच्या वा-यालाहि हा कधी उभा रहात नाही किंवा त्यांच्या दुर्दशेचा याला कधि घाम फुटला नाही. तथापि मागासलेल्या जनतेच्या चळवळीत फुकट दोन शब्द खर्च करून जर याच्या पगडीवर लोकमान्यतेचा तुरा चढण्याचा संभव असेल, तर तेवढ्यापुरती व्याख्यानबाजी किंवा लेखनबाजी करायला हा मुळीच माघार घेणार नाही. ‘ नृपति जनपदानां दुर्लभः कार्यकर्ता ’ ही प्राचीन विचारवंतांची विचारसरणी या बाण्डगुळ्या लोकांनी ब्रिटिश राजवटीत अक्षरशः खोटी ठरवली आहे. चक्रनेमिक्रमाने हिन्दुस्थानात होणा-या क्रान्तीच्या उलथापालथीचा अंदाज बांधून, गो-या टोपकर बनियानी जेव्हा मुंबई मद्रास कलकत्ता येथे आपल्या वखारी उघडल्या आणि व्यापाराच्या पांघरूणाखाली राजकारणी सट्टेबाजी सुरू केली, तेव्हा त्याना कारकून कामगार आणि कूली या तीन ककारांची जरूरच पडली. रोख रोजदारीच्या आणि मासिक तनख्याच्या आशेने, खेड्याना आणि शेतीला रामराम ठोकून, कामगार आणि कूली जसे या शहरांकडे धावत धावत सुटले, तसे जुन्या ऐदी श्रीमंतीला पोटजड झालाले हजारो वुध्युपजीवी पांढरपेशीसुद्दा कारकुनीच्या कलमबहाद्दरीवर आपल्या दैवावरचा पाचोळा झाडण्याच्या उमेदीने खेडी गावे सोडून मुंबईत घुसले. आनुवंशिक संस्काराने बुद्धीची चलाखी जिंवत राहिल्यामुळे, त्यांनी आपल्या परदेशी मालकांची परकी भाषा तेव्हाच जिव्हगत आणि कलमागत करून टाकली; आणि स्वामिनिष्टाचे सफेदे फासून कारकून, हिशोब्ये (अकौटण्ट्स), मध्यस्थ (इंटरप्रीटर्स), गुमास्ते (एजण्टस) आणि वकील (ॲम्बासडर्स) इत्यादि अनेक भूमिका ‘राजीखुषीने अक्कलहुषारीने’ नटवून, ब्रिटिशाना हिंदुस्थान मिळवून दिले. ‘परस्पर पावणे तेरा’ ही व्यापारी धोरणातली ‘ग्येनबाची मेख’ ब्रिटाशांजवळून शिकून घ्यावी. त्यानी इंग्रेजी विद्येची हॉटेले शहरोशहरी उघडली, म्हणून पूर्वी त्यांचे पोवाडे गाणारे शाहिर (आणि तेहि हे बाण्डगुळे पांढरपेश्येच!) शहरोशहरी उफलले होते. इंग्रेज लोक आणि इंग्रेजी विद्या म्हणजे स्वर्गातून कोसळणारा अमृताचा वर्षाव, अशा टिमक्या त्यावेळी मनमुराद ठणठणल्या.

परंतु, हा उपद्व्याप इंग्रेजांनी हिन्दुस्थानाच्या खास कल्याणासाठी थोडाच केला ? त्यांच्या व्यापारी राज्याची गिरणी सुरळीत आणि बिनधोक चालावी, यासाठी त्याना छोट्या मोठ्या कारकुण्ड्या यंत्रांची जरुर अनिवार्यच होती. ती यंत्रे या शिक्षणाने पैदा करुनच त्यानी आपला राज्यकारभार आणि व्यापार पूर्वी केला आणि आज करीत आहेत. हिन्दी मातीच्या मडक्याना आंग्लाईची झिलई बेमालूम चढल्यावर, त्या मडक्यानी आपल्या मूळ मातीच्या जातीला विसरल्याशिवाय गत्यंतरच नव्हते. इंग्रेजी विद्येला वाघिणीच्या दुधाची उपमा देण्याचा प्रघात आहे. पण बाण्डगुळ्या वर्गाच्या आजपर्यंतच्या चरित्रावरून इंग्रेजी विद्या म्हणजे बेचव बेवडा हाच सिद्धांत काढणे प्राप्त आहे. निदान, ज्या बाण्डगुळ्या मध्यम

वर्गाने इंग्रेजी शिक्षण घेऊन, इंग्रेज सरकारच्या आणि व्यापा-यांच्या भल्या बु-या उलाढाली लढविण्यात केवळ आपल्या पोटोबाच्या पुजेची सोय पाहिली, त्यानी या वाघिणीच्या दुधाचा बेवड्याप्रमाणेच उपयोग केला, यात तिळमात्र शंका नाही. हिन्दुस्थानचा इतिहास सकाहि उलट सुलट तपासा, त्यात एकच मुद्याची गोष्ट स्पष्ट दिसून येईल की इंग्रेजी राज्याची प्राणप्रतिष्ठा इंग्रेजी सैन्य किंवा इंग्रेजी दगलबाजी ( Diplomacy ) ने केलेली नसून, याच बाण्डगुळ्या हिन्दी पोटार्थी पार्थिवांच्या दगाबाजाने झालेली आहे. त्यानी ब्रिटिशाना त्यांची व्यापारी-राजकारणी( Politico-commercial ) सत्तेची पकड या देशाच्या नरड्याला भिडवण्यास कायावाचामने मदत केली आणि आपल्या मायदेशाची व देशबांधवाची खरी खोटी गुह्ये इंग्रेज परक्याना दाखवून, त्यांच्या मेहरबानीवर स्वतःच्या कारकुण्ड्या ऐश्वर्याचे महाल सजविले. यांचे मुख्य भांडवल म्हणजे राजनिष्ठा उर्फ स्वामीनिष्ठा. या निष्ठेला सद्गुणांचे पाणी चढवून तिची बाजारी किंमत त्यांनी कितीहि वाढवली तरी या बाण्डगुळयांची राजनिष्ठा म्हणजे कुत्र्याची स्वामीनिष्ठा यापेक्षा अधिक काही नाही.

ज्याची भाकरी त्याची चाकरी, इतकेच जीवनाचे ध्येय बनल्यामुळे, या कारकून मध्यस्थ गुमास्ते वकील आणि कंपनीने आपल्या मायदेशाच्या भवितव्याकडे सपशल पाठ फिरविली. स्वतःच्या पोटाचा दरा भरण्यासाठी स्व-देशाच्या नरड्यावर सुरा फिरवायलाही यांची मनोवृत्ती वूर्वी कधी बाचकली नाही, आणि आज शरमत नाही. आत्मप्रतिष्ठा, स्वदेशाभिमान, स्वातंत्र्य, राष्ट्रीयत्व इत्यादी सर्व गुणांचे गुळवेल सत्व म्हणजे यांची राजनिष्ठा ! मग तो राजा कोणीही असो. ठिकाणावार असो वा नसो. स्वार्थाच्या बाबतीत ते पूर्ण आप्पलपोटे असले तरी राजनिष्ठेच्या क्षेत्रात आपपर भेद त्यांच्या हृदयाला आजवर कधीच शिवला नाही. असल्या लक्षवेधी बाण्डगुळांच्या स्वदेशद्रोही वृत्तीच्या मदतीनेच इंग्रेज व्यापा-यांनी, बंदुकीचा एक बारहि न उडविता, उभा हिन्दुस्थान आपल्या पचनी पाडला. हिन्दुस्थानातल्या ब्रिटिश साम्राज्याचा पाया बाच बाण्डगुळया महात्म्यांच्या एकनिष्ठ घामावर उभारलेला असल्यामुळे, राज्यकारभाराची सर्व लहानमोठी सुत्रे याच सव्यसाची अर्जुनांच्या हाती दयाळू मायळू आणि पायाळू इंग्रेज सरकारने ठेवलेली आहेत. दिल्लीच्या सेक्रेटरियेट पासून तो पेट्यातल्या महालकरी कारकूनापर्यंत याच मध्यम वर्गाचे हिंदी रथी महारथी इंग्रेजांचा राज्यकारभार खास आंग्रेजी कदरीने चालवीत आहेत. शोभेसाठी थोडे मूठभर गोरे अधिकारी असतात. सत्ता त्यांची असली, तरी मत्ता मात्र पांढरपेश्या चाणक्यांचीच असते. इलाख्याचा गव्हर्नर असो, किंवा जिल्ह्याचा कलेक्टर असो, चिटणीशी कुवडा खास हिन्दुस्थानमा बनेला मालच असते. गो-या परदेशी भांडवलावर उभारलेल्या आगबोट आगगाड्यांच्या जगड्व्याळ व्यापारापासून तो थेट हजामतीचे वस्तरे विकणा-या विलायती वखारीचा कारभार हेच खलबत्ते राजकारणी धोरणाची मलमे घोटीत असतात, आणि गुप्तपोलीस खात्यात यांचीच अक्कल अक्कल काढ्याच्या भट्ट्या रात्रदिवस चढवीत उतरीत असते.

“माझा स्वयंपाक मीच करीन” ही टिळकांची उक्तीच जर स्वराज्याच्या सर्व अटींची समर्पत मानली, तर आज स्वराज्याच्या हाकटीत वास्तविक मुळीच काही अर्थ नाही, असे स्पष्ट कबूल करणे भाग आहे. कारण, आज हिन्दी राज्यकारभार एकजात हिन्दी बाण्डगुळे शहाणेच चालवीत असून, गोरे अधिकारी निवळ कुंकवाचे आधार म्हणूनच या देशात वावरत आहेत. इंग्रेजी राजकारणाचा फास हिन्दुस्थानाच्या गळ्याला जर विशेष घट्ट बसून, त्याला जीवहि नकोसा झाला असेल, तर त्याला कारण ब्रिटिश लोक नसून, हिन्दी बाण्डगुळयेच मुख्यतः होत, हे शेकडो पुराव्यानी सिद्ध होण्यासारखे आहे. परकीय सरकारच्या आणि भांडवल्यांच्या प्रत्यक्षा वगलेत वसून, राजनिष्ठा आणि लोकनिष्ठा या दोनहि

धोंड्यावर हात ठेवून मध्यस्थीची नाटकी कसरत करणारा हा मध्यम पांढरपेश्या हिन्दी वर्ग म्हणजे या राष्ट्राच्या भवितव्याच्या मार्गातील एक चमत्कारिक अडचणच होय. गेल्या २०-२५ वर्षांत हा बाण्डगुळ्या वर्ग ब-याच निराळ्या वळणाने धडपड करू लागला आहे. एकाद्या झाडाला बाण्डगूळ चिकटले की त्या झाडाचा रस कायम असेपर्यंत ते टवटवीत राहते. पण रस नाहीसा झाला कीं स्वतः बाण्डगुळ तर सुकतेच सुकते, पण त्या झाडाचेहि सुकेठाक खोड बनविते. अलिकडे स्वराज्यप्राप्तीच्या बहुरंगी आणि बहुरूपी चळवळी जोराने चालू झाल्या आहेत. जनता लोकमत लोकशाही वगैरे शब्दांचे हापट बार फोडणा-या वृत्तपत्रांताहि मनस्वी सुळसुळाट उडाला आहे. व्याख्यानांचा तोफखाना नाकोनाकी गावोगाव अष्टौप्रहर धडेबाजी करीत आहे. ब्रिटिश नोकरशाहीच्या उच्चाटणाची भाषा सर्वत्र बेफिकीर बोलली जात आहे, आणि आजच्या प्राप्त गुलामगिरीचे बंद तोडण्याची तयारी सर्व देशात सारखी करण्याचे प्रयत्न जोराने चालले आहेत. आश्चर्याची गोष्ट म्हणजे या चळवळींच्या अग्रभागी मध्यमवर्ग्ये बाण्डगुळ्येच उभे असलेले दृष्टीस पडतात.

पिढ्यान् पिढ्या ज्यांचा जन्म परसेवेने उद्रंभरण करण्यात गेला, त्याच वर्गातल्या काही थोड्या व्यक्ती एकदम अशा उलट्या पावलानी चालू लागाव्या हे आश्चर्य अक्षरशः क्रान्तिद्योतक नव्हे काय ? ही क्रान्ति कशाने झाली ? मुख्य झाडावर हे बाण्डगूळ आता कां उलटले ? अर्थात् झाडच रसहीन झाल्याशिवाय ही धडपड चाललेली खास नाही. परोपजीवि समाज पोटपुजेच्या संकल्पात फार पटाईत असतो. त्याच्या पोटाला चवलीएवढीसुद्धा रिकामी जागा सहन होत नाही..स्वतःचे पोट भरले कीं तिकडे जगाला जरी आग लागली, तरी तो बाण्डगुळ्या चुकून सुद्धा नुसती विचारपूस करावयाचा नाही, तोच आज बहुजनसमाजाच्या दारिद्यावर संतापाचे आकांडतांडव करू लागला आहे, या कोड्याचा उलगडा षण्मासिचा वायदा घेऊन कोणीतरी केलाच पाहिजे. हा जनतेचा अस्सल कळवळा कीं या बाण्डगुळ्यांच्या उपाशी पोटाच्या कळा ? परकीय राज्यकर्त्यांच्या नेहेरबानीचा सरस आपल्या भाग्याला चोपडून, त्याच्या जोरावर महालकरी, मामलतदार, मुनसफ, रजिस्टर, पोलिसइन्स्पेक्टरादि, गोरगरीब जनतेच्या अज्ञानावर मनमुराद चरणारे, राजमान्य आणि लोकमान्य महात्मेच पैदा करण्याचा ज्या वर्गांचा कुसवा, त्याच कुसव्यातून गरीब रयतेच्या पोटाच्या बंडासाठी बण्ड करणारे तांबडे निळे निळे पिवळे वीरपीर फटाफट निजपू लागले, हा एक मोठा चमत्कार आहे. कायदेबाजीच्या घवघवीत मळजटाने, न्याय अन्यायाच्या डोळस निवढीच्या सबबीखाली भिकारी शेतक-यापासून तो थेट भांडवल्या झब्बूपर्यंत सर्वांना कज्जेबाजीचे व्यसन लावणा-या आणि त्यावर आपल्या संसाराचे उखळ पांढरे करणा-या वकीलांचे इरसाल बाण्डगुळे ताण्डेंच्या ताण्डे आज ब्रिटिश नोकरशाही विरूद्ध लोकशाहीचे झेंडे नाचवीत आहेत.

या अकल्प्य घटनेच्या पोटात कोणाच्या पोटाच्या पापाचा व्याप हा एवढा उपदव्याप करीत आहे, याची चिकित्सा करणे अगत्याचे आहे. ब्रिटिश राज्यकर्तांनी इंग्रेजी बिद्येचे भाण्डार फोडून, शहरी बाण्डगुळ्या झब्बूना आंग्लकळा आणल्यामुळे, हिंदुस्थानातील शहरांचे स्वरूप जीवन आणि विचार बाह्यात्कारी पुष्कळ बदलले आहेत. सुधारणेची सर्व बेगड मुंबई कलकत्त्या सारख्या व्यापारी शहरांतच विशेष चमकते. इंग्रेजी विद्येचा यसफ्यस चवचालपणा आणि जीवनक्रांतीचा अप टु डेट हॅट पाटलूणपणा फक्त शहरांतच वागडतो. मूठभर शहाण्या शिक्षित चळवळ्यांच्या विचारक्रान्तीचा उच्चार उमटवून, त्यांचे घसे मोकळे करणारे छापखाने आणि वृत्तपत्रे यांचा सुळसुळाट फक्त शहरातच. अर्थाच् प्राप्त विद्येच्या घटपठादि खटपटी आणि त्यावर पोटापाण्याचा प्रश्न चबचवीत वंगण्यावर अध्यपायासाने सोडविण्याच्या धडपडी करणा-या खास शहरी शहाण्याना खेड्यातील शेतकरी जनतेच्या स्थितीकडे सक्ष्य पुरवण्याची

मुळी दृष्टीच उरलेली नाही. आजच्या हिन्दी चळवळ्या पाश्चिमात्य कल्पना-कोंबडीचे पिल्लू आहे. त्याच्या जन्म जीवन आणि मृत्यूच्या त्रयाची सांगड शहरी खुराड्यांशीच पडल्यामुळे, त्याला मुंबई मद्रास कलकत्तासारखी शहरे म्हणजे सारे हिन्दुस्थान वाटते. स्वतःच्या उत्क्रांत विचारावरून तो अवघ्या हिन्दुस्थानाच्या विचार-परिणतीचे प्रमाण गृहित धरून, आचारक्रान्तीची लगबग करीत असतो. शहरांतील शिक्षणप्रसाराच्या रामरगाड्यावरून तो सर्व हिन्दुस्थानाच्या साक्षरतेची कल्पना ठरवीत असतो, दृष्टीच्या आरपार बदलामुळे सारी सृष्टी त्याला शहरी मसाल्याची दिसते आणि त्या मालमसाल्यावर तो उभ्या हुन्दुस्थानाच्या जीवनात क्रान्तीची फोडणी घालण्याचा चंग नित्य मारीत असतो. शहरी आकर्षक जीवनाच्या कोळ्याच्या जाळ्यात सापडलेल्या या आंग्लविद्या-विभूषित माशा हिन्दी खेड्यांच्या आणि अफाट शेतकरी जनतेच्या हिताहितांच्या प्रश्नाला पारख्याच बनल्यामुळे, त्यानी अखिल देशाच्या क्रान्तिकार्याच्या ठोकलेल्या प्रातिनिधीक आरोळ्या किती फोलकट आणि कमजोर आहेत. याची त्याना स्वतःला जाणीव नसली, तरी ती दीर्घदृष्टी ब्रिटिश नोकरशाहीला खास आहे. नॅशनल कॉंग्रेसचा इतिहास म्हणजे या बाण्डगुळ्या वर्गतील विशेष शिष्टांच्या शहरी धडपडींचा इतिहासच होय. सुरूवातीला कॉंग्रेस ही रावसाहेब रावबहादुरादि ब्रिटिश-निर्मित हिन्दी लॉर्डांची एक वार्षिक मजलस असे. या मजसलीत जहालमवाळ-भेदांच्या भेदिक लावण्यात रंगली. तरी सुद्धा तींत देशभक्तीत तू मोठा की मी मोठा ? हाच कॉंग्रेसी चळवळीचा भररंग असे. एकाहि देशभक्ताला दारिद्यग्रस्त शेतक-याचा आणि पोटासाठी खेडी उध्वस्त टाकून शहरांच्या गिरण्या कारखान्यात घुसलेल्या मजूरांचा चुकून सुद्धा घाम फुटला नाहीं, कीं कोणाला त्यांची आठवण आली नाहीं.

एवढे मोठे लोकमान्य बनविलेले टिळक ! पण त्यांचहि तीच गति. त्यांच्या चळवळीहि शहरी आणि भगतहि शहरीच. चिरोल केसचा फास गळ्याला बसला, तेव्हा गोरगरीब शेतक-यांच्या घासातला घास काढायला, शुद्ध भिक्षुकी थाटाने टिळकांचा जो मोटारदौडी नाटकी स्वराज्यदौरा खेड्यापाड्यांतून झाला, तेवढाच काय तो त्यांच्या आणि खेडवळ जनतेचा, तन्मातला पहिला आणि शेवटला प्रसंग । तत्पूर्वी या लोकमान्य प्राण्याने ना कधी शेतक-यांची विचारपूस केली, ना कधी मुंबईच्या गिरणबाबूंच्या क्लेशाची चौकशी केली, किंवा ना कधी पददलित अस्पृश्यांवरील सामाजिक जुलुमावर डोके खाजविले. टिळकांच्या हिंमतीचा सारा मारा ब्रिटिश नोकरशाहीच्या चक्रव्यूहावरच विशेष. त्याना ब्रिटिशशांचे भांडवलशाही कुदळ खोरे स्पष्ट दिसे, पण बाण्डगुळ्या वर्गाची सर्वभक्षी जळूशाही मुळीच कधी दिसली नाही. सामाजिक क्रान्तीचे वावडे असणा-या टिळकांच्या हातून केवळ एकजोडी राजकारणी जी धडपड झाली, तीच आणि तितकीच पुण्याई त्यांच्या खाती जमा घरूनच, या थोर पुरूषाची स्मृति टिकणारी आहे. यानंतर कॉंग्रेसमध्ये महात्मा गांधीचे युग सुरू झाले. या युगाचा महिमा डॉक्टर रविंद्रनाथ टागोर सत्याची हाक (call of truth) मानक निबंधात मार्मिकपणे वर्णन करितात :- “स्वदेशी चळवळी नंतर अस्तित्वाच आलेल्या प्रस्तुतच्या खळबळीचा व्याप दांडगा असून, तिचा प्रभाव सर्व हिन्दुस्थानभऱ पसरलेला आहे. पूर्वी आमच्या राडकारणी पुढा-यांची दृष्टी आंग्रेजी जाननेवाल्या लोकांपलिक़े गेलीच नव्हती. कारण, इंग्लिश लोकांनी लिहिलेल्या इतिहास ग्रंथातील पुस्तकी चित्रांपलिकडे त्यांची स्वदेशाची कल्पनाच कधी गेली नाही. स्वदेशाची ही कल्पनाच म्हणजे बर्फ आणि ग्लॅडस्टन, माझिनी आणि ग्यारीवाल्डी, यांच्या पुसकट वाफ-यांनी निर्माण झालेली मृगजळाची सृष्टी होय. स्वार्थत्याग म्हणजे काय आणि आपल्या देशबांधवांबद्दलची खरीखरी कळकळ म्हणजे काय, याची त्या काळच्या राजकारणी पुढा-याना अटकळच झाली नाही म्हणावयास काही हरकत नाही.

अशा प्रसंगी, महात्मा गांधी एकदम पुढे सरसावले. त्यानी आपल्या कोट्यावधि झोपड्यात प्रत्यक्ष प्रवेश केला आणि त्यांच्या विचारविनीमयाचा नवीनच उपक्रम सुरू केला. पुस्तकी चर्पटपंजरीचा अवतार गांधीना प्राप्त झालेल्या महात्मा पदवीने त्यांचा गौरव केला असे म्हणण्यापेक्षा, महात्मा गांधी असे त्यांचे खरेखुरे नावच व्यक्त झाले, असे म्हटले पाहिजे. हिन्दुस्थानातील एवढी मोठी अफाट जनता माझ्याच हाडरक्तामासाची आहे असे समजणारा कोणचा मायेचा पूत दुसरा होऊन गेला बरें ? सत्याचा स्पर्श होताच कोंदाटलेल्या आत्म्याच्या शक्ती खाडकन् आपल्या बंधनातून *तोण्डाळ टिळक भगतानो, ऐका ऐका, रविंद्रनाथाची ही कटु स्पष्टोक्ति, ही नम्र सत्याची हाक ऐका. मुक्त झाल्या. हिन्दुस्थानच्या दरवाजावर शुद्ध प्रेमाने टिचकी मारताच तो प्रचण्ड दरवाजा उघडला, विकल्प नाहीसा झाला आणि नामर्दाईने तोंड काळे केले. सत्याचे प्रबोधन सत्यानेच केले" [ प्रबोधन पाक्षिक, १ डिसेंबर १९२१ ] महात्मा गांधीच्या पूर्वी ६० वर्षे, मागासलेल्या शेतकरी जनतेच्या बौद्धिक आणि आर्थिक प्रबोधनाचा पहिला कसोशीचा प्रयत्न कै. ज्योतिबा फुले यानी केली. फुले स्वतःच मागासलेल्या कष्टाळू शेतकरी समाजातले असल्यामुळे, जोडा कोठे चावतो, हे त्याना बिनचूक कळले आणि त्याप्रमाणे त्यानी अखिल शेतकरी वर्गाच्या गुलामगिरी चा पहिला टाहो फोडला. इंग्रेजांच्या गुलामगिरीची त्याना जाणीव होती, तरीहि त्यापेक्षा विशेष निकटच्या आणि रात्रंदिवस रक्त शोधून निस्सत्व करणा-या बाण्डगुळ्यांच्या मखमली जुलुमांची त्याना फार काळजी होती. परदेशी शत्रूला घरात घेऊन त्याच्या पायतणपुजेवर स्वतःच्या पोटपुजेची सोय पहाणा-या शहरी शहाण्याच्या घाशीरामीला टक्कर देण्याचा ज्योतिबबाने अचाट प्रयत्न केला. त्याची स्थिती एकांड्या शिलेदाराची होती. जात्या खेडवळ. ज्या खेडवळ्याच्या जागृतीसाठी तो झटत होता ते सारे अनाडी आणि खुळसट. जगता मरता भटांच्या तोंडाकडे पहाणारे.

एकीकडे केवळ व्यापारी तुंबडीबाजीची पर्वा करणारे परके इंग्रेज सरकार, आणि दुसरीकडे अनाडी रयतेच्या अज्ञानावर चरण्यास सवकलेला धोरणी बाण्डगुळ्या भटवर्ग. अशा तिरंगी सामन्याला तोंड देउन, ज्योताबाला जेवढे काही देशकालानुसार करता आले,तेवढे त्याने केले. पण, अखेर त्याची शेतकरी आणि कामगार वर्गाच्या जागृतीची चळवळ बाण्डगुळ्या पांढरपेश्या भटानी आणि भटेतरानी चिरडून टाकली. चालू घडीच्या राजकारणात शेतकरी आणि कामगारांचे महत्त्व क्रान्तीचे स्फोट कसकसे उडवित आहे, हे पाहिले म्हणजे ज्येतिबाच्या बाबड्या बोलाच्या खेडवळी चळवळीचे मर्म आणि महत्त्व जितके स्पष्ट होते, तितकेच चिपळूणकर टिळक प्रभृति बाण्डगुळ्या गुंडांच्या शहरी चळवळीचे नासके धोरण नागडे उघडे पडते. बाण्डगुळ्यांच्या राजकारणात मामलदार मुनसफीच्या वाढत्या जागा, कौन्सिलातल्या खुर्च्या इत्यादि बाबी कितीहि असल्या तरी घोंगड्या शेतकरी, आणि त्याची मरती शेती या बाबीना त्याच्या ओसरीवरहि जागा नसे. ज्योतिबाची चळवळ शेताच्या बांधावरची. ती या शहरी शहाण्याना क्षुद्र कां वाटू नये ? पांढरपेशांची उखळे पांढरी झाली कीं, स्वराज्याचा स्वर्ग हाती आला, एवढ्याच अनुभवाची या वाण्डगुळ्यांची परंपरा. भटांना पेशवाई मिळाली की भटभोजनातल्या खरकट्या पत्रावळींच्या उकीरड्यालाहि 'मराठी साम्राज्य' नाव द्यायला यांची तयारी. अशा मुर्दाड मनाच्या माणसानी ज्योचिबाची चळवळ पाळण्यातल्या पाळ्यात कितीही ठेचली, तरी महात्मा गांधींनी तीच चळवळ पुनरुज्जीवीत करताच, तिच्यापुढे टिळक चिपळूणकरी बडव्याना पगड्या पागोटी घासताना आपल्या नाकांच्या अणकुचीदार बोंड्याहि थबकटून घ्याव्या लागत आहेत, हा काळाचा महिमा खरोखरच रम्य आणि चिन्त्य आहे.

**प्रकरण ४ थे.**

महायुध्दापूर्वी आणि नंतर नेहमी बुध्दिवान वर्गच राष्ट्रमत व्यक्त करणारा असतो. सर्व चळवळींच्या अग्रभागी तोच उभा असतो. बहुजनसमाज (Masses) नेहमी अडाणी असल्यामुळे, त्याच्या संघशक्तीचा उपयोग राष्टोरध्दाराकडे कुशलतेने करण्याचा अधिकार बुध्दिमान वर्गाचाच असतो. हिंदी मध्यम वर्ग बुध्दिमान असल्यामुळे, राष्ट्राच्या प्रतिनिधित्वाचा मान त्याच्याकडे जाणे अगदी साहजिक आहे. परंतु, प्रतिनिधी कितीही शहाणा आणि होलका असला, तरी तो आजकालच्या धढापासरी वकीलांप्रमाणे खाटकी काळजाचा असता कामा नये. तो बहुजनसमाजाच्या सुखदु:खाशी एकजिनशी एकजीव एकतान झालेला असला पाहिजे. तो स्वत: त्याच समाजाचा जातिवंत घटकावय असून, बुध्दीच्या क्षेत्रात पुढारलेला असला पाहिजे. हिंदी मध्यम वर्ग बहुजनसमाजाशी आजपर्यंत फटकून तिटका-याने वागला. त्याला त्याच्या सुखदु:खाची यत्किंचितही कल्पना नाही आणि जाणीवही नाही. जात्याच तो बाण्डगुळ्या असल्यामुळे आणि जिकडे घुग-या तिकडे उगो उहो करुनच पोट भरण्याच्या कलेत त्याची सारी बुध्दी श्रमत असल्यामुळे, त्याच्या मुर्दाड वकीलीवर बहुजन समाजाने डोळे मिटून विश्र्वास ठेवणे अत्यंत धोक्याचे आहे. युरिपयन महायुध्दापूर्वी या बाण्डगुळ्या वर्गाला सर्वच बाबतीत अस्मान ठेंगणे झाले होते. मुंबई सारखी शहरे युरपियन व्यापा-यांच्या दुकान वखारीनी नुसती उफलून नीघाली होती. घाऊक दलालीपासून तो किरकोळ फेरीवील्यांपर्यंत आणि हॅटपाटलोणीच्या ऐंटीत 'रिप्रेझेण्टेटिव' गिरीचा दिमाख मिरवणा-या 'बिझिनेस मॅन' पासून तों थेट कारकुण्ड्यापर्यंत, एकजात सर्व बाण्डगुळ्याच्या उदरी शनि आला होता. पोटाच्या वंगणाचा पुरवठा उमाप झाल्यामुळे, शेकडो बाण्डगुळये नवीन सरदारशाईच्या संघटनेत गर्क झाले होते. पोटापलीकडे परमेश्वर नसणा-या बाण्डगुळ्यांना या शहरी भपक्यातच हिन्दुस्थानचा उध्दार झाल्याची सुखस्वप्ने खास दिवसा पडत असत. पोटापाण्याचा प्रश्न केवळ पांढरपेशेपणाच्या पुण्याईवर सहज सुटत असल्यामुळे, देशात दुर्गादेवी दुष्काळ जरी पडला, तरी मध्यम वर्गाच्या पोटाला सुरकुती पडण्याची केव्हही कसलीहि भीति नसे. पहिली तापीख आणि एक आण्याचे तिकीट एवढ्या तपश्चर्येवर लक्ष्मी बिनधोक बिनचूक त्यांना प्रसन्न होत असे.

परंपरादत्त बुध्दिकौषल्याचे कोड पुरविण्यासाठी, फावल्या वेळात, इकडे तिकडे थोडी दिवाणखानी आणि वृत्तपत्री देशहिताची चळवळ हे बाण्डगुळे करीत. त्यात मनाच्या विरंगुळ्यापेक्षा मात्र अधिक काहीहि नसे. खुंटीला काळीजे अडकवून, बदामाचे केशरी शिरे खात खात, देशातल्या दुष्काळाच्या किंवा रोगराईच्या अधीव्याधी हृदयद्रावक भाषेत नटविणारे 'जॅकेटशास्त्री' जसे बोकाळले होते, तसे शेतक-यांचे तोंड जन्मात एकदाहि न पाहिलेले बाळपंडित शेतक-यांच्या वतीनें सरकारशी तोंडपाटीलकीचा लढा लढविण्यात गर्क असत. कॉग्रेसी आणि वृत्तपत्री वादविवादाच्या मैदानावर 'राजकारण आधी का समाजकारण आधी असल्या, 'अंडे आधी का कोंबडे आधी' मासल्याच्या वादाची रणधुमाळी चालत असे. सगळ्या बाण्डगुळ्या चळवळीचा शहरी जोर ठरावांच्या रूपाने सरकारकड़े राजकीय हक्कांची भिक्षा मागण्यातच खर्ची पडत असे. भूक मागण्यापलीकडे भिक्षुकांची अक्कल थोडीच जाणार ? सगळी हयात शहरी वातावरणात गेल्यामुळे, खेड्यापाड्यांतल्या कोट्यवधि जनतेच्या वाल्या दारिद्र्याची आणि -हासाती सल्पना कोणालाहि नसे. दृश्य किंवा अदृश्य जुलुमांचा प्रतिकार अर्ज विनविण्याच्या मलमचोपडणीने होईल, का क्रान्तिकारक अत्याचाराने होईल, या प्रश्र्नावर जगात कधी एकमत होण्याचा संभव आज तरी दिसत नाही. शांतीला भुरळलेली मनोवृत्ती 'क्रान्ति' हा नुसता शब्द ऐकताच बेशुध्द पडते ! परंतु क्रन्ति का शान्ति हा वाद सुध्दा 'अंडे का कोंबडे' या सारखाच असल्यामुळे, शांतीप्रमाणेच क्रान्तीसुध्दा सृष्टीच्या जीवनक्रमाच्या उत्क्रान्तीला आवश्यक आणि अनिवार्यच असते. १८५७ च्या राजकारणी क्रान्तीपासून सुमारे ४० वर्षे शांतीचा अनुभव घेतल्यावर, जनतेच्या महिरलेल्या वृतींत

चैतन्य उत्पन्न करण्याची कामगिरी कोणीतरीं करावीच लागते. ती बरी का वाईट या प्रश्नाचे उत्तर देण्याचा अधिकार वर्तमानकाळाला नसतो. तो अधिकार भविष्य काळाचा. निसर्ग सुध्दा ठराविकाचे बेधन क्रान्तीच्या स्फोटाने तोडतो. मग मानवसृष्टी तरी एकाच ठराविक मसाल्याच्या जीवनात कायम कां रहावीं ? क्रान्तीचा मार्ग चुकलेला असो वा फसलेला असो, निश्चित तत्वावर क्रान्तिकारकाचा अत्मविश्वास किती ढिला किंवा घट्ट होता, यावरूनच भविष्यकाळ त्या क्रन्तीच्या बरे वाईटपणाचा अभिप्राय देत असतो. नोकरी दलाली किंवा वकीलीच्या मऊमऊ गाद्यांवर लोळता लोळता देशोध्दार करु पाहणा-या शांतिप्रिय शहरी बाण्डगुळ्यांच्या विचारात क्रान्तीचा पहिला स्फोट पुण्याच्या चाफेकर बंधूनी केला. परकीय सत्तेच्या जुलुमांचा प्रतिकार अर्ज विनवण्यांच्या मलमपट्ट्यांनी होत नसेल तर, दाताला दात आणि जिवाला जीव घेऊन देऊन केला पाहिजे, हा नवा विचार त्यावेळी सर्व बाण्डगुळ्याना धपणीकंपापेक्षा भयंकर वाटला.

हा वेळपावेतो गोरा आदमी—मग तो दीडदमडीचा बुटलेर असो वा कोणी असो—हिन्दी लोकाना बापाचा बाप आणि देवाचा देव वाटत असे. त्याने एकाद्याच्या तोंडात मारली तरी स्मितहास्य करून चटकन् दुसरे गालफड पुढे करणा-या येशू किस्तानी सारा हिन्दुस्थान गजबजलेला असे. खाना तयार करण्यासाठीं कलेकटराच्या आधी दौ-याच्या मुक्कामावर येऊन पोहचणा-या गो-या बुटलेरालाच कलेक्टर समजून हारतुरे मानपत्र अर्पण करणा-या रावसाहेब रावबहादुरादि बाण्डगुळ्या घेण्डांची पुष्कळ उदाहरणे महाराष्ट्राच्या परिचयाची आहेत. चाफेकरांनी ही गो-या कातडीची माया फोल ठरनिण्याचा पहिला प्रयत्न केला. चाफेकर प्रकरणाने राजकीच वातावरण क्रान्तीची पहिली ठिणगी पडली. परकीय सत्तेची शरम सर्वत्र उत्पन्न झाली. सरकारतर्फे कायदेबाजीच्या गिरणीत 'राजद्रोह' चोज घासून पुसून तयार झाली आणि कज्जेदलांच्या वखारीत घाऊक किरकोळ खपू लागली. शांतीच्या संतोषाचे युग संपून क्रान्तीच्या असंतषाची वावटळे सर्वत्र वाढू लागली. मध्यम वर्गाला आपल्या उत्पत्ति-स्थिति-लयाची आत्मसंवेदना विशेष तीव्रतेने दंश करू लागली. बंगालच्या फाळणीने तर क्रान्तीचा कल्पनातीत स्फोट करून, हिन्दुस्थान म्हणजे शांतीचा मुर्दा नसून क्रान्तीचा मर्द आहे, ही जाणीव परकीय राज्यकर्त्यांना प्रथमड विशेष जोराने करून दिली. बुध्दिमान मध्यम वर्गाच्या बाण्डगुळ्या प्रवृत्तीला या क्रान्तीचक्राने इतके जोराचे धडके दिले की तिच्या कवचाचे खडपे उडून, मध्यम वर्गातील शेकडो नवमतवादी तरुण देशाच्या स्वातंत्र्यासाठी सर्वस्वाचे बलिदान करायला मी मी म्हणून पुढे आले आणि त्यानी १९०७-०८ सालच्या क्रान्तीच्या भडकलेल्या डज्ञात आपल्या प्राणांचे बळी हासत खेळत दिले. बाण्डगुळ्या. मध्यम वर्गाच्या पोटीच ही नव्या क्रान्तीकारक स्वार्गत्याग्यांची उत्पत्ति झालेली आहे. डॉ. रविद्रनाथ टागोर 'सत्याची हाक' निबंधात या घटनेची अशी चिकित्सा करतात:- " बंगालच्या फाळणीच्या होगामाच विकारवशतेच्या उन्मादात राज्यक्रान्तीच्या जोरावर युगांतर घडवून आणण्याचा प्रयत्न काही तरुणानी करून पाहिला. त्.नी पेटविलेल्या अग्नीत पहिल्या.

प्रथम आपल्या स्वताचाच बळी देण्यात केलेल्या आत्मयज्ञाला, आपल्याच देशाने नव्हे तर इतर देशानी सुध्दा, शिरस्राण काढून मुजराच केला पाहिजे. जडसृष्टीत आलेले त्यांचे अपयश त्यांच्या स्वार्थत्यागात अंतर्भूत असलेल्या आध्यात्मिक वैभवाच्या दीप्तीनें प्रकाशमानच झाले. या नितान्त कष्टमय प्रयोगाचा पूर्ण अनुभव घेऊन, सरतेशेवटी त्यांच्या प्रचितीस आले कीं रक्तपातमय राज्यक्रान्तीचा मार्ग हा काही खरा मार्ग नव्हे. जेथे मुळातच काही राजकारण नाही, तेथे राज्यक्रान्ती घडवून आणण्याचा प्रयत्न, म्हणजे गावाचा ठावठिकाणा नसतानाच प्रवासाला निघण्यासारखे आहे; आणि चुकीचा मार्ग सुगम व

अगदी जवळचा असा जरी भासत असला, तरी त्या मार्गाने गेल्.स आपण आपल्. उद्दिष्ट स्थली तर पोहचणार नाहीच, पण उगाच पायाना मात्र शीण दिल्यासारखे होईल......'आपला देश' म्हणून जो काही निर्माण करावयाचा असतो, तो अखिल जनतेकडून निर्माण व्हवयाचा असतो; एकाददुस-या विशिष्ट पक्षातून नव्हे. 'आपला देश' जनतेच्या अंत:करणातून व संकल्प-शक्तीतून उत्पन्न होणा-या ओजस्तेजाच्या प्रकटीकरणाने निर्माण होत असते. त्यासाठी जनतेच्या सर्व शक्ती बिनतोड एकवटल्या पाहिजेत." ब्रिटीश राजसत्ता या देशात दृढमूल झाली आहे, ही गोष्ट गृहीत धरून, देशाच्या स्वातंत्र्याचा प्रश्न राजकारणानेच सुटेल, अशा दिशेने काम करणारांची संख्या येथे बरीच मोठी आहे. या मंडळींचा स्वदेशाभिमान त्यांच्या मताइतकाच जाज्वल्य होता व सध्या आहेहि. राजकीय स्वातंत्र्याच्या युध्दात– मग ते युध्द खरेखुरे लष्करी असो, कॉन्स्टिट्यूशनल कायदेबाजीचे असो, किंवा भीकमागणीचे असो– इंग्रेज नामोहरम झाला, अथवा प्रसन्न झाला, कीं सामाजिक धार्मिक आर्थिक विषमतेचे प्रश्न एका दिवसात चुटकीसरसे सुटतील; त्यासाठी वेगळी धडपड खटपट मुळीच करायला नको, या समजुतीने कै. टिळक प्रभृति राजकारणपटूनी हव्या तितक्या तंगड्या झाडल्या. पण त्यामुळे राजकारणाची ब्रम्हगाठ सुटण्याऐवजी ती आधिकाधिक घट्ट मात्र बसत गेली.

सामाजिक सुधारणावाद्यांनी आपल्या दिशेने प्रयत्न पुष्कळ केला. पण त्याना जनतेचे अज्ञान आणि टिळक प्रभृति राजकारणवाद्यांचा विरोध या दोन अवस्थेशी टकरा खात स्वस्थ बसावे लागले. शक्तियुक्तिचा सर्व जोर राजकारणावरच दिल्यामुळे, सामाजिक विषमतेचा विषवृक्ष फोफावत गेला. धर्ममार्तंडानी धर्म आणि संस्कृतीच्या पुनरुज्जीवनासाठी छातिफोड मेहनत केली, तरीहि इंग्रजांचे बूड काही हालेना. काय केले असता हिंदुस्थान स्वतंत्र स्वयंनिर्णयी होईल ? प्रश्न गेली ५० वर्षे सुटता सुटत नाहीं. यात प्रश्न सोडविणारांची नालायकी जबाबदार नसून, या प्रश्नाचा अपूक्वपणाच विशेष महत्वाचा आहे. हिंन्दुस्थानापुढे पडलेला 'जगावे का मरावे' चा प्रश्न यापूर्वी कोणत्याही राष्ट्रापुढे पडलेला नव्हता, इतका तो चमत्कारीक कोड्याचा आहे. हिंन्दुस्थानातील परकी ब्रिटीश सत्ता ही राजकारणी आहे, का समाजकारणी आहे ? धार्मिक आहे का आर्थिक आहे ? तिचे वास्तविक स्वरुप काय आहे, याचा आजपर्यंत नीटसा निर्णय न लागल्यामुळे, नानाविध प्रयत्नांचे पर्वत. टिंगणावर कळसा आणि गावाला वळसा, असे फुकट जात आहेत. डॉ. रविंद्रनाथ डागोर ( सत्याची हाक ) निबंधात म्हणतात:-- " हिन्दुस्थानातील परकीय राज्यसत्ता ही केवळ रंग बदलणा-या सरड्याप्रमाणे आहे. आज ती इंग्रेजाच्या वेषात आली आहे, उद्या दुस-या एकाद्या परस्थाच्या वेषात येईल, तर परवा, अगदी तेवढ्याच तीव्रपणाने, ती कदाचित आपल्याच देश–बांधवांच्या रूपाने प्रगट होईल ! प्राणघातक शस्त्रास्त्रांच्या योगाने या परसत्ता-पिशाचाचा पिच्छा पुरवून त्याचा नायनाट करण्याचा आपण केवढाहि दांडगा प्रयत्न केला तरी तो निष्फळ होईल. कारण, वरचेवर रंग रालटण्यात तिचा हात खेडा असल्यामुळे, तिला आपल्या हातावर तुरी दोऊन निसटून जाणे केव्हाहि अवघड नाही." "कायद्याचे प्रस्थापित केलेले राज्य !" ही दणदणीत शब्दांची धमकीवजा टिमकी अलीकडे रात्रंदिवस आमच्या कानांशी ठणाणत असते.

किती क्रॉग्रेसवाल्यांनी या सूत्राचे सूत कातले ? किती कायदेबाजांनी या 'कायद्या'चे पृथ:करण केले ? किती इरसाल कम्युनिष्टानी या शब्दांची पारख केली ? इंग्रेजांनी हिंदुस्थान जिंकले. ते तलवारीच्या जोरावर असो, बुध्दिमत्तेच्या चतुराईवर असो, नाही तर कारस्थानांच्या पुण्याईवर असो. पण ते त्यानी जिंकले. परदेश जिंकताना धोरणी जेत्याना ज्या युक्त्या जुक्त्या लढवाव्या लागतात, त्या सर्व त्यानी लढविल्या. पडले ते स्वार्थत्याग केले. आत्मयज्ञहि केले. इंग्रेजांचे हिंन्दुस्थानातील साम्राज्य म्हणजे

तेराव्याचे मंत्र म्हणून ऐदी भटाने हबकलेली दक्षिणा नव्हे ! दिल्लीच्या साम्राज्यदण्डासाठी हजारो इंग्रजानी या देशात आपल्या प्राणांचे आणि उमलत्या आयुष्याचे बळी दिले आहेत. खुद्द इंग्लंडात इंग्रेज लोकानी स्व-राज्य-नियंत्रणाची जी एक विशिष्ट यंत्ररचना उत्क्रान्त केली आहे, ती अल्लाउद्दीनाच्या जादूच्या दिव्याचा चमत्कार नव्हे. तीसुध्दा त्याना स्वदेशातल्या स्वदेशात अनंत हालअपेष्टा भोगून, अनेक राज्यक्रान्त्यांच्या ज्वालामुखीशी तोंड देऊन, आस्ते आस्ते घडवून आणावी लागलेली आहे. ब्रिटिशांचे 'व्यापारी' राजकारण त्यांच्या अनेक शतकांच्या स्वार्थत्यागी परिश्रमांचा मधुर आणि परिपक्व परिपाक आहे. आत्मसामर्थ्याच्या शिस्तवार आणि कदरबाज तपश्चर्येची फलश्रुति आहे. राष्ट्रधर्माच्या विवेकशुध्द कल्पनाक्रान्तीचा तो परिणाम आहे. गेल्. महायुध्दात जर्मनीसारख्या लष्करबाज रावणी सेस्कृतीच्या बलाड्य राष्ट्राला 'डोकोबाज' इंग्लंडने जे केवळ युक्तिच्या चुटकीने जमीनदोस्त केले, त्याचे मर्म त्याच्या राष्ट्रधर्माच्या शिस्तीतच आढळून येते. हे जे मर्म, त्यालाच इंग्रेज 'कायदा' असे नाव देतो. 'कायद्याने प्रस्थापित केलेले राज्य' म्हणजे इंग्लंडच्या उत्कान्त राष्ट्रधमाने हिन्दुस्थानाच्या अपक्रान्त आणि क्रियानिषठ राष्ट्रधर्माला जगाच्या कल्याणासाठी चझविलेली काटेरी तोंडबेडीच होय. हिंन्दुस्थान ही धर्मभूमि आहे, असा हिन्दी–आणइ विशेषत: हिन्दु–लोकांनी केवढाहि मोठा शंखध्वनि केला, तरी 'राष्ट्रधर्मा' च्या बाबतीत हिन्दुस्थानासारखा पागल आणि बेइमान देश जगाच्या पाठीवर दुसरा नाही.

हिन्दुस्थानाला राष्ट्रधर्माची शिस्त शिकविण्यासाठी इंग्लंडच्या साम्राज्यदण्डाची कदर निसर्गाला राज्यक्रान्तीच्या रुपाने येथे प्रस्थापित करणेच क्रमप्राप्त झाले. या शिस्तीत हिन्दुस्थान तरबेज होऊन, गुरुच्या तेगड्या गळ्यात अडकवीपर्यंत इंग्रेज आणि हिन्दुस्थान हा संबंध तुटणे शक्य नाही. इंग्रेजी विद्देची महाद्वारे सताड मोकळी करून, अल्पसंख्य शिक्षितांच्या विचारात क्रान्ति घडविण्याचे श्रेय ब्रिटीश राजवटीलाच देणे प्राप्त आहे. विचारक्रान्तीची मजल आज उच्चारक्रान्तीपर्यंत आली आहे. आचारक्रान्तीला अजून बराच अवकाश आहे. कारण ब्रिटीश राज्य येथे शंभरावर वर्षे नांदूनही ३० कोट प्रजेत केवळ साक्षरतेचे प्रमाण शेकडा ५ च्या वर गेलेले नसल्यामुळे, विचार–उच्चार क्रान्तीची लाट अझून बहुजनसमाजाला नुसती एकदाहि चाटून गेलेली नाही. म्हणजे सबंध हिन्दुस्थान अज्ञानाच्या अंधारात धडपडत असून, देशभर चाललेल्या स्वराज्याच्या आणि स्वातंत्र्याच्या चळवळी मूठभर शहाणे शहरी झब्बूच चालवीत आहेत, असाच निष्कर्ष काढणे प्राप्त आहे. पाश्चिमात्य विविध ज्ञानप्राप्तीमुळे या शहरी षहाण्यांची बरीच विचारक्रान्ति होऊन, आपल्या मायदेशाच्या गुलामगिरीची त्याना भयंकर चीड येत चालली आहे. राजकारणी सत्तेच्या जोरावर व्यापारी खो-याने हिन्दुस्थानाला सर्व बाजूनी दिगंबर बनविणा-या ब्रिटीश नोकरशाहीचा त्याना मनस्वी खंत येऊन, तिचा नाहीतर आपला अंत झाला तरी परवडला, रण चालू गुलामगिरीचा यापुढे एक दिवस मुलाजा राखावयाचा नाही, इतका तीव्र असंतोष आज गेली कित्येक वर्षे शहरी वातावरणात धुमसत आहे. या असंतोषाचा वणवा दिवसेंदिवस कितीहि वाढत्या प्रमाणावर असला आणि त्याच्या वणव्यात भावनावश तरुणांच्या कितीही आहुती पडत असल्या, तरी त्या वणव्याची आच नाक्षरतेमुळे विचारक्रान्तीला मुकलेल्या कोट्यावधी खेडवळ जनतेला आजपर्यंत कधीच लागली नाही. ती लागावी असा प्रयत्नच आजवर कोणी केला नाही. अर्थात् स्वारज्य आणि स्वातंत्र्याच्या चालू बोलघेवड्या चळवळी म्हणजे पृष्ठभागावरच्या लहरी आहेत.

खालच्या सर्व जलसमूह शांत आणि थंड आहे. मग आत्मसामर्थ्यांची तरी ओळख कुठली आणि शहरी चळवळ्यांच्या ढोळस धडपडींना पाठिंबा देण्याची प्रेरणा कसली ? अखिल हिंदुस्थानातील लोकसंथ्येच्या

मानाने 'दर्यामे खसखस' असणा-यां शहरांतील बोलक्या डोकोबाजानी क्रान्ति घडविण्याची चासविलेली धडपड, झब्बुशाही वृत्तपत्रांत कितीही समर्थ दिसली, तरी तिला जनतेची एकमुखी किंवा निदान मुकी सम्मति मुळीच नसल्यामुळे, सर्व चळवळीं ठावठिकाणा नसलेल्या बंदराकडे जाऊ पाहाणा-या गलबता प्रमाणे होऊन बसल्या आहेत. गेल्या युरपियन महायुध्दाने हिन्दुस्थानावर जेवढे चिरकाल टिकणारे उपकार केले, तेवढे इंग्रेजांच्या शेभर वर्।च्या षान्तिप्रधान राज्यानेहि केले नाहीत. विशेषत: बाण्डगुळ्या बुध्दिवंतांच्या अकलेवर शोधनप्रकाशाचा जोरदार झोत पाहून. त्यांच्या परोपजीवि प्रवृत्तीचा जाड्यपणा सणसणीत ठेचला.

शहरी जीवनीलीच विश्व मानून राहणा-या या शिंपल्यातल्या कीटकांची शहरी भपक्यांची धुंदी उतरली. महायुध्द सुरू होताच, परदेशी सर्व व्यापार एकदम बेद पडला, आणि लक्षावधि वाण्डगुळ्ये बेरोजगारी बनले. पोटालाच चिमटा बसल्यावर त्याना सर्व ब्रम्हांड आठवले. इंग्रेजांची राज्यसत्ता म्हणजे मासिक प्राप्तीची हुकमी कामधेनू, हा त्यांचा वेडगळ ग्रह दूर झाला. अकलेला तणावे देऊन दोनप्रहर साजरे करण्याचे सर्व यत्न फोल होऊ लागले. युनिव्हर्सिट्यांच्या पदव्या विकून बाजारात चहाचा एक कपसुध्दामिळेनासा झाला. बुध्दीच्या नाजूक धाग्यावरच पोट लोंबकळत ठेवण्याच्या वंशानुवंशाच्या, सवयीमुळे, आंगमेहनतीला हातापायात शक्तीचा अभाव. मजुरी करावी किंवा भीक मागावी, तर आजवरच्या प्रतिष्ठेची इस्तरी बिघडते. पेज पिऊन मिशीला शीत लावण्याचीहि नाटके नटविली; पण, पुढे पेजहि मिळेनाशी झाली. मजुरीला मोल आले; पण कारकुनांचे हाल झाले. शिवाय, खेड्यापाड्यांतून आणि इतर गावांतून लक्षावधि बाण्डगुळ्ये एकाच भाकरीच्या तुकड्यांवर लांडग्याप्रमाणे तुटून पडायला मुंबईमध्ये भराभर जमा झाले. पोटाच्या पापाची आग मध्यम वर्गापर्यंत जाऊन भिडली. उपासमारीच्या वेदना जरी एकजिनशी असल्या, तरी पोटाच्या पापाचे प्रकार अनेक असतात. आन्न मिळवायला मजुरीहि महाग झाली, तरी अनाडी शेतकरी झाडपाला खाऊन झोपडीतल्या झोपडीत पडेल; पण बुध्दिवान माणूस पोटासाठी हवे ते उत्पात करील. पोटासाठी गोरगरीबानी केलेल्या चो-या तेव्हाच उघडकीस येतात; पण पांढरपेश्या शहाण्यांच्या 'पोटाच्या बण्डाचे अत्याचार' त्यांच्या बुध्दिमत्तेच्या झकाकीखाली सफाईत दडले जातात.

त्यातल्या त्यात मध्यमवर्ग्या बाण्डगुळ्या जात्याच परोपजीवि प्रवृत्तीचा दास असल्यामुळे, स्वत:चा जीव वाचविण्याठी तो कोणाचा जीव घेईल, किंवा कोणाच्या मानेला कसा विळखा घालील याचा नियम नाही. जेथे रसं तेथे बाण्डगुळ ! आज श्रीमंत भांडवल्यांच्या पदरी, तर उद्या मजुरांच्या उदरी. सकाळी राजनिष्ठ तर संध्याकाळी लोकनिष्ठ. काल सरकारच्या सीएडीचा सरदार तर आज स्वराज्याच्या चळवळीचा सुभेदार. दिवसभर लोकांच्या कायदेबाजीच्या व्यसनावर मनमुराद चरणारा वकील, तर फावल्या वेळी देशभक्तीचे नाटक नटविणारा सूत्रधार. सरकार मवालले की लोकशाहीचे डोले नाचविणारा हाच, आणि सरकार जहालले की नोकरशाहीचे बूट पालीश करणारा हाच.सरकारने राजग्पोहाचे हत्यार पाजळले की बाण्डगुळ्यांच्या राजनिष्ठेच्या सनया तिता-या जोरजोरानें वाजू लागल्याच. मग मुलीचे लग्न असं, बापाचे श्राध्द असो, सुनेचे गर्भदान असो, की मयत बायकोची अविधवा नवमी असो, त्यात सुध्दा राजनिष्ठा व्यक्त करण्याचा एकादा बाण्डगुळ्या विधी साजरा करायला तो विसरायचा नाही. पगडी-पालटाच्या घालमेलीत पांडरपेश्या बाण्डगुळ्यांच्या हातून कित्येक वेळी इतकी पोरकट आणि हलकट कृत्ये घडतात, की त्यांचा नुसता विचार सुध्दा शरमेला शरम आणतो. सबंध वर्षभर संपाच्या धामधुमीमुळे लक्षावधि कामगार उपाशी मरत आहेत, पोलीसांच्या संगिनी सोटे व गोळीबाराला बळी

पडत आहेत, व्यापाराचा सर्वत्र बोर्या उडालेला, सारे लोक हवालदिल. आशीहि भयंकर अवस्थेत अमूक तारखेच्या आत ४० हजार रुपये जमवून वॅकबेवर कै. टिळकांचा पुतळा उभारलाच पाहिजे, अशा अटीतटीच्या चळवळी करणा-या बाण्डगुळ्यांची काळिजे फत्तराचीच नव्हत, तर कशाची ? लोक उपाशी मरोत ! त्यांचे सुतक या फत्तराना नाही. टिळकाचा धोंडा थापला म्हणजे सर्व काही झाले.

स्वराज्याच्या सबबीवर जमविलेले कोट कोट रुपयांचे फंड याच बाण्डगुळ्यामतील विशेष डोकेबाजांच्या पोटाच्या पापाने फस्त केले. सारांश, पोटासाठी हवे तें उलट सुलट उत्पात करणा-या मध्यम वर्गाकडून देशोध्दाराची अपेक्षा करणे, म्हणजे वेश्येकडून पातिव्रत्याची आशा करण्याइतकेच धाडसाचे आहे. विचार-क्रान्तीने बाण्डगुळ्या कितीहि देशभक्ताशला, तरी त्याचा पिण्डच गो-या सरकारच्या आणि व्यापा-यांच्या गो-या मेहेरबानीचा असल्यामुळे, त्याला गो-या कातडीचा मोह मुळीच आवरत नाही. देव्हा-यात एकादा गोरा देव आणून बसविल्.शिवाय त्याच्या देशभक्तिचा मिहमा मनाजोगता थरारत नाही. मग तो देव, विलायतेत भाकरीला मोताद झालेला समाजबहिष्कृत पोळ असो, नाहीतर बटाटेविक्या पाटीवाला असो, त्याची प्रवा नाही. तो गोरा असला म्हणजे झाले. दगडाचाहि देव बनवून त्याला नवसाला फळावयास लावणा-या हिन्दु बाण्डगुळ्यानी हव्या त्या गो-या उपटशुंभाला हिन्दी देशाभिमानाची शिंगे शेपटे चिकटवून, शृंगऋषीप्रमाणे, त्याला शृंगमानव म्हणून बापदेवाच्या जागी कां पुजू नये ? देशहिताच्या प्रत्येक चळवळीचा क्रणधारपणा एकाद्या विलायती गो-या कर्णाच्या कानात अडकवून, त्याच्या हुकमतीखाली रासलीलेचा नाच नाचण्-याने हिन्दी बाण्डगुळ्यांचे ‘राष्ट्रीय’ व्यसन जगजाहीर झालेले आहे. त्यामुळे, विलायतेत कवडीमोल असलेले शेकडो गोरे उनाजटप्पू येथे येऊन, हिन्दुस्थानाचे कैवारी म्हणून देवकळा पावले. परंतु, या गो-या कैवा-यांच्या दिन्दुस्थानच्या यात्रांचे मर्म त्यांच्या पोटाच्या नँडातच असते, हे मात्र एकाहि बाण्डगुळ्या मुत्सद्याच्या अझून लक्ष्यात येत नाही!

हिन्दुस्थानातील इंग्रेजी सत्ता धाडशी गो-या भटक्यानी आणि उनाडटप्पूनी स्थापन केली. कोणी व्यापारी, कोणी डॉक्टर, कोणी मिशनरी. कोणी निवळ मजूर, तर कोण महीतरी असे लोक येथे आले. त्यानी नाना वेषांतरे केली, नाना मतांतरे केली, पण अखेर सर्वानी मिळून हिन्दुस्थान काबीज केले. इंग्रेज माणूस आपल्या देशासाठी वाटेल ते धाडस करतो, वाटेल तेथे जातो, नोकरी धरतो, ‘टाळाचावी’ करतो, परभाषा शिकतो, परक्यांत मिसळतो, त्यांचा जानीदोस्त बनतो, त्यांचा धर्म स्वीकारतो, त्यांच्यासारखा पेहराव करतो, त्यांच्यासाठी हसतो, रडतो, मरे मरे तो काम करतो, हाल अपेष्टाहि भोगतो. पण वेळ आली की अखेर मात्र इंग्रेज तो इंग्रेज आणि हिन्दी तो हिन्दी . जातिवंत इंग्रेज आपल्या ब्रिटीश साम्राज्याशी कधीच बेइमान होणार नाही. एकादा गोरा माणूस हिन्दी लोकांशी जरा मिळून मिसळून राहू लागला की त्यांना मोठा गुळपापडीचा आनंद होतो. त्यातल्या त्यात त्याने जर मुसलमानी किंवा हिन्दु धर्माची दीक्षा घेतली, तो एकादा मौलवी, अभयानंद किंवा मसणानंद बनला, त्याने भगवी कफनी अगर खादी आंगावर चढविली, तो जरा हिन्दुस्थानाच्या वतीने लिहू बोलू लागला, इंग्रेज सरकारवर टीका टिपणी करू लागला, की बावळट हिन्दी लोकांना–विशेषत: हिन्दु लोकाना, त्यातच्या त्यात बाण्डगुळ्या भटाना आणि भाट्यांना–तो अगदी आपला बाप किंवा देवांचा देव महादेव वाटू लागतो. मग महादेवापुढचे हे भक्तगण त्या गो-या अवताराचे जे काही थेर माजवितात, त्याचे वर्णन शेषाच्याहि बापाला साधायचे नाही. स्राज्य चालविण्याचाया पात्रतेबद्दल स्वत:च्या बुध्दीच्या टिमक्या पिटणारांची इंग्रेजी वृत्तपत्रे चालवायला विलायती बाण्डगुणयांची पार्सले अजूनहि मागवावी लागतात, हा मध्यमवर्ग्या देशभक्तांचा गलधटपणा विचार करण्यासारखा नव्हे काय ?

**प्रकरण ५ वे**

**जनार्दनाचा नवावतार**

That trade's proud empire hastes to swift decay, As ocean sweeps the labored mole away; While self–dependent power can time defy, As rocks resist the billows and the sky. ( Deserted Village. ) तळमळणा-या अंत:करणात उत्पन्न झालेला विचार कधी मरत नाहीं. विरोधकांच्या डावपेचानी त्याच्या उच्चाराची गळचेपी झाली. किंवा आचारात उमटताना त्याला घायाळ जखमी केले, तरीहि तो मरत नाही. कारण तो अमर असतो. नॅशनल कॉंग्रेस, सामाजिक सुधारणांच्या परिषदा, औद्योगिक प्रदर्शने वगैरे शहरी बाण्डगुळ्यांच्या शहरी धडपडी नाटकी, बिनकाळजाच्या आणि केवळ हंगामी विरंगुळ्याच्या आहेत. त्यात मुठभर शहरी शहाण्यांशिवाय बहुजन समाजाचा (Masses) मुळीच काही संबंध येत नाही. त्याला कोणी विचारीत नाही. त्याच्या हिताहिताची कोणाला जाणीव नाही, कल्पना नाही. म्हणून सत्यशोधक समाज स्थापन करून कै. ज्योतीराव फुले यानी मागासलेल्या वर्गातील काही थोड्या अनुयायांसह मोठी चळवळ सुरू केली. आजचे भटी बाण्डगुळ्ये ज्या ज्या निरनिराळ्या चळवळी "स्वकल्पित नव्य कल्पने"च्या आत्मप्रौढीने चालवीत आहेत, त्या सर्व कल्पनांचा बाप ज्योतीराव फुलेच होय. परंतु मागासलेल्या भटेतर जनतेच्या रक्तावरच जगणा-या एकजात भटभटेतर बांडगुळ्यानी ज्योतीरावचा कोंडमारा करून त्याची चळवळ घायाळ केली. गोरगरीब रयतेच्या प्रत्यक्ष हिताची चळवळ हाती घेणा-या प्रत्येक भटेतर नवमतवाद्याचा पाणउतारा करून त्याची चळवळ ठार मारण्यासाठी भट हा प्राणी ब्रह्मदेवाच्या खास अकलेतून निर्माण झालेला आहे. भटवर्ग बुध्दीने अचकट पण संख्येने कुझकट असला, तरी त्याच्या कळकट पायतणाला खिळ्याप्रमाणे, किंवा त्याच्या पिळवट नाकाला शेवंडाप्रमाणे चिकटणा-या भटेतर बांण्डगुळ्या जाती ब-याच असल्यामुळे, भटवर्गाला हवे ते उत्पात स्वत: नामनिराळे राहून सफाईत घडवून आणता येतात.

राज्यकर्त्या गो-या नोकरशाहीकडे पहावे तो त्याना गोरगरीब मेले काय किंवा बांण्डगुळे जगले काय, याची विचारपूस करायला फुरसदच नाही. त्यांची तिजोरी भरली, इंग्रेजी व्यापा-यांच्या थैल्या फुगून त्यांच्या तागड्याच्या तंगड्या बिनअटकाव सर्वत्र पसरल्या, म्हणजे इतर कशाचेंहि सुहेर सुतक बाळगण्याचे कारण त्याना नाही. राजकारणी धोरणाची झाप व्यलस्थित पाडण्यासाठी जो ज्या वेळी त्यांच्या कामी येईल तो त्यांचा मामा. अशा परिस्थितीत शहरोशहरी वृत्तपत्रें, सभा, परिषदा इत्यादी शहरी बांण्डगुळ्यांचा लेखाळ आणि तोंडाळ धुमाकूळ बेसुमार चालला असताहि, खेड्यांतला शेतकरी अन्नाला मोताद होऊन देशोधडीला जन्मठेप चालला आहे आणि शेतकरी मेला तर राष्ट्रहि मरणारच, म्हणून त्याला वाचविला पाहिजे, या कै. ज्योतीराव फुल्यांच्या घायाल कल्पनेला उचलून धरणारे कोल्हापूरचे राजर्षी शाहू छत्रपति बहुजनसमाजाच्या आत्मोध्दाराच्या चळवळीच्या अग्रभागी स्वयंप्रेरणेनें येऊन उभे राहिले. राष्ट्राच्या स्वयंनिर्णयाची गुरूकिल्ली शेतक-याच्या नांगराच्या फाळात आहे आणि हव्या त्या भपकेबाज साम्राज्य-सत्तेच्या मृत्यू शेतक-याच्या हालात आहे, हा सनातन सिध्दांत बिनचूक ओळखणारा महाराष्ट्राचा पहिला आणि शेवटला छत्रपति फक्त करवीरकर शाहूत होय. शिवाजीनें मराठी स्वराज्य स्थापन केले म्हणून आम्ही त्याचा मोठा गौरव करतो. पण तोही भटी गोमुत्राच्या गाडग्यांत अडकून भटी ब्रम्हगांठीच्या आ खेबाज फामात डोळे उघडे ठेवून फाशी गेला. शिवाजीचा मृत्यू तोच म-हाठी साम्राज्याचा मृत्यू ! पुढचे सगळे छत्रपति म्हणजे आयत्या बिळांतले नागोबा आणि पेशवे म्हणजे छत्रपतींच्या तेराव्यांवर जगणारी भटी भुते !शिवाजीने जे केले नाहीं,ते करवीरकर शाहूने केले करवीरकर

शाहूने केले, ते जर शिवाजी करता, तर महाराष्ट्राचा नकाशा तांबड्या रंगांत कधीच रंगता ना. शाहू छत्रपतीनी आपल्या कुळधर्माला व कर्तव्यनिष्ठेला स्मरून 'ब्राम्हणेतर' चळवळीच्या पुनरुज्जीवनाचा इतक्या जोराने उठाव केला कीं गौतमबुध्दाच्या धर्माला हद्दपार करणारी भिक्षुकशाही अवघ्या सहा महिन्यांत गलितत्राण होऊन 'त्राहि माम्' चा शंखध्वनि कोकलू लागली.

कोणत्याही कामगिरीचे महत्व आणि परिणाम भटी शिव्याश्रापांवरून डोळे झाकून ठरवावे. शिव्याशाप जितक्या जोराचे असतील, तितकी जोरकस ती कामगिरी वठली असा खुशाल अंदाज वांघावा. शाहूच्या ब्राम्हणेतरी चळवळीचा व्याप, सह्याद्रीच्या वणव्याप्रमाणे खेडोपाडी इतका पसरली की जो भट देवाच्या खालोखाल अनाडी जनतकडून पूजला जात, असे, त्याला ठिकठिकाणी पैजारांचा आहेर होऊ लागाल. धार्मिक क्षेत्रांतच भटाची आळवाची भाजी पाण्यापेक्षा पातळ होऊ लागल्यावर, समाज आणि राजकारणाच्या क्षेत्रातहि च्याला नासक्या सुपारीप्रमाणे उचकून फेकून देण्याची सुरुवात झाली. भट–बहिष्काराची ही चळवळ, बांण्डगुळ्यांच्या सर्व चळवळीप्रमाणे जर शहरी चळवळ असती, तर भटशाहीचा मुर्दाडपणा किंचित् सुध्दा डगमगला नसता. पण ब्राम्हणेतर चळवळ खास खेड्यातल्या शेतक-यांपासून फैलावल्यामुळे, प्रत्येक बांण्डगुळ्या भटाच्या पोटावर मणमण बिव्याचे पलीस्तर बिनचूक थापले गेले. खेडवळांमध्ये शिक्षणाचा प्रसार मुळीच नसल्यामुळे, कोणतीहि चळवळ त्यांच्यात फैलावण्याचे काम हा वेळपावेतो एकाहि बांडगुळ्या बृहस्पतीला साधले नाही. पण शाहूने सत्यशोधकी जलशांचा उपक्रम करून, शेतक-याना आवडणा-या थाटात भाषेत आणि रंगाढंगांत, ब्राम्हणेतर चळवळीचे लोण अगदी थोड्या अवधीत सर्व मुंबई इलाखाभर एकूणएक खेड्याच्या कोनाकोप-यात नेऊन भिडविले. ब्राम्हणेतर चळवळीने सर्व शेतकरी खडबडून जागा झाला. त्याला भटांची आणि बाण्डगुळ्यांची कारस्थाने उमगू लागली, शत्रुमित्रांच्या पारखीची दृष्टी त्याला आली आणि सरकारी राज्यमंत्र्यांच्या रचनेचाहि परिचय करून घेण्याची त्याची जिज्ञासा फुरफुरू लागली. यापूर्वी केसरी इंदुप्रकाश ज्ञानप्रकाश यांसारखी भटी पत्रे 'सार्वजनिक' मताचे प्रतिनिधी म्हणून निर्लज्जपणें मिरवत असत. ( आजहि हा निर्लज्जपणा गेला आहे असे नव्हे! ) परंतु, अनेक साक्षर मराठ्यानी ब-याच ब्राम्हणेतरी वृत्तपत्रांचा पायाशुध्द उपक्रम करून, भटी पत्रांच्या टोल्याला टोला आणि जोड्याला जोडा हाणण्याचा जोरकस आणि यसवंत प्रयत्न केला. ब्राम्हणेतर चळवळीने खेड्यातल्या दक्षणांपान्तु भटाचे उच्चाटण तर केलेच केले, पण शहरी बाण्डगुळ्यांच्या कांग्रेसी धडपडीनाहि चांगलाच पायबंद लावला.

शेतक-यांचे यजमान आणि दरोबस्त खोड्यापाड्यांचे राजे आम्ही, आम्ही म्हणू ती पूर्वदिशा, लागेल तो फंड हवा तेव्हा आणू, शेतक-यांचे खरे प्रतिनिधी वकील ते आम्हीच, इत्यादि गर्वोत्कींचा भार वाहणारे सर्व भारवाहक भटलोक आता दीनवाणीने रडू लागले आहेत की, शहरांत आमच्या प्रतिष्ठेची पाचवी कशीबशी पुजली जाते, पण पूर्वी ज्या खेड्यात आम्ही वाटेल त्या वेळी, वाटेल त्या सबबीखाली, वाटेल त्याच्या ख-याखोट्या वारशाच्या घुग-या खाल्ल्या, त्याच खेड्यात आम्ही पाऊल ठेवताच आमच्या हातूनच आमचे तेरावे घालण्याचे प्रसंग आज नित्य येत आहेत. प्रत्यक्ष काळसुध्दा ज्या बाण्डगुळ्या भटांचा मुर्दाडपणा चेचताना चकला, तोच मुर्दाडपणा ब्राम्हणेतर चळवळीने शेतकरी जागा होताच, ठिकच्या ठिकाणी गारठून पडला. खेडवळ शेचकरी जनतेचे प्रबोधन ही केवढी विलक्षण शक्ती आहे, याचा प्रयोग शाहू महाराजानी प्रत्यक्ष करून, शहरी बाण्डगुळ्यांच्या सर्व चळवळींचा फोलकटपणा स्पष्ट सिध्द करून, देखविला. याची त्याना बक्षिसी काय? तर त्यानी भटी बाण्डगुळ्या देशभक्षकानी " स्वराज्यद्रोही छत्रपति " अशी कचकचित शिवी हासडली. ब्राम्हणेतर चळवळ नव्या वळणाने आणि

धोरणाने प्रयोगाच्या प्रथमावस्थेत असतानाच, एकाकी शाहू छत्रपतीचा अमत झाला ! बहुजनसमाज किंचित जागृत होऊन आपल्या आत्मशक्तीचा अंदाज घेतो न घेतो, तोंच त्याच्या भवितव्यावरचा सर्चलाईट विझाला! गोरगरीब जनतेने दु:खाने तोंडात माती घातली, पण बाण्डगुळ्या भटानी शहरोशहरी पेढ्यांच्या पराती पोटात पुरल्या शाहू छत्रपति हयात असेपर्यंत, त्यांच्या पैशाला भाळून शेकडो मराठे ब्राह्मणेतर चळवळीच्या धुरेला मान देण्यासाठी मी मी म्हणून पुढे सरसावले.

छत्रपतींचा अंत होताच, चळवळीचा मार्गदर्शक तर गेलाच, पण त्याबरोबर पैशाचा पुरवठा बंद पडून कोल्हापूर संस्थानाचेहि दरवाजे बंद झाले. गूळ गेला कीं माशी उडाली ! तव्दत केवळ पोटासाठी चळवळीची पाठ धरणारे शेकडो भटेतर वीर चळवळीचे जूं फेकून देऊन घरोघर स्वस्थ बसले. श्रीमंत भास्करराव जाधवा सारखे दोन तीन पुढारी मात्र झेंड्याला चिकटून उभे राहिले आणि चळवळीची उदात्त व्यापक आणि सर्वस्पर्शी तत्वें जरी दिवस न् दिवस भ्रष्ट होत चालली, तरी त्यानी यथाशक्ति यथामति ब्राम्हणेतर चळवळ कायम टिकवून धरली. छत्रपतिबरोबरच चळवळ मरेल हे भटांचे बविष्य या पुढा-यानी सपशेल ठेचाळले, ही गोष्ट काही लहान सहान महत्वाची नव्हे. चळवळीचा उगम आणि प्राथमिक जोर सातारा कोल्हापूर प्रांती झाला. तिकडे मराठ्यांची वसति फार. त्यामुळे चळवळीत मराठ्यांना भरणा विशेष झाला, यात नवल नाही. शाहूनंतर सर्वत्र बेबंदशाही माजली. नव्या पुढा-यांच्या पायतणांच्य आदलाबदली होऊ लागल्या. मतभिन्नतेच्या टकरा लागू लागल्या आणि जबरदस्त नेता कोणीच न राहिल्यामुळे, पुढा-यांच्या गाढवलाथाळीत 'मराठा–मराठेतर' भेद उत्पन्न झाला. निस्पृहपणाने निकाल सांगायचा तर, या भेदाची उत्पत्ति मराठा आणि मराठेतर अशा दोघाही पुढा-यांच्या क्रियानष्ठ तत्वभ्रष्टतेतूनच झालेली आहे. सत्यशोधक आणि ब्राम्हणेतर अशा जोडगोळीने जातिभेद–विध्वंसनाच्या प्रतिज्ञा करून, मागासलेल्या अखिल भटेतरांची एकजिनशी संघटना करणारे पुढारीच जेव्हा जातिस्वार्थाचे शेणमूत कालवून खाऊ लागले, तेव्हा हे असले भेद निर्माण होणारच. अंतस्थ यादवांचा हा दोष ब्राम्हणेतरी मराठ्यांचा नसून, शहरांतील भटभटेतरादि बाण्डगुळ्यांच्या सहवास-संकराचा परिणाम होय. ब्राम्हणेतर चळवळ अनेक दिव्यांतून तावून सुलाखून आज ती लोकमान्य आणि राजमान्य झालेली आहे. तिला कसलीच मान्यता मिळू नये, जोरदार धि:कारात तिचे बुरूज ढासळून जमीनदोस्त करावे, तिच्या पुढा-याना 'मवाळी दादा' किंवा 'गुंड' ठरवून लोकांच्या तिरस्काराला पात्र करावे, ( एरव्ही गो-या नोकरशाहीला कितीहि शिव्या दिल्या तरी एवढ्या 'राष्ट्रीय' कर्मासाठी ) सरकारचेहि बूट चाटून त्याना या चळवळीविरुध्द चिथावून सोडावे, वगैरे शेकडो रेगढेग शहरी बाण्डगुण्यांनी करून पाहिले, परंतु, ब्राम्हणेतरी चळवळीचे मूळच शेतक-यांच्या काळजांतून निघालेले असल्यामुळे, तिच्यात शहरी चळवळीची शिस्त किंवा बेगडी भपका मुळीच नसताहि, तिचा व्याप खेड्यापाड्यात भरंसाट फैलावला, बाण्डगुळ्यांचे श्रीयुती आकाण्डताण्डव वृत्तपत्री कालमातल्या कालमातच मुरले आणि सरकारलाही ब्राम्हणेतर पक्षासाठी कौन्सिलात एक खास दालन रिझर्व करून ठेवणे भाग पडले.

माझ्यासाठी जनता का तुझ्यासाठी जनता हा जहाल मवाळ शहरी बाण्डगुळ्यांचा वाद प्रत्यक्ष पुराव्याने पराभूत झाला आणि ब्राम्हणेतर चळवळीने खेडवळ जनतेला गदागदा हालवून जनार्दनाचा जो नवावतार निर्माण केला, त्याच्या प्रभंजनापुढे आसरकार भटभटेतरादि शहरी शाहिराना मान तुकवावीच लागली. सगळ्या हिन्दी राष्ट्राच्या प्रतिनिधित्वाची मिजास मारणा-या नॅशनल कांग्रेससारख्या शहरी संस्थेतले मोठमोठे पुढारी ब्राम्हणेतर चळवळीला, संधी सापडताच, ज्या शिव्यागाळी करतात, त्यातील रहस्य

एवढेच की ज्या कोट्यावधि जनतेच्या अज्ञानावर त्याना मनमुराद चरता येत असे आणि त्यांच्या मुक्या वृत्तीच्या मुक्या संमतीवर या शहरी बाण्डगुळ्याना अवघ्या राष्ट्राच्या नावाने हवा तो गोंधळ घालता येत असे, त्या भ्रमाचा भोपळा या ब्राम्हणेतर चळवळीने आरपार फोडला. कोणत्याहि चळवळीच्या क्षेत्रात प्रत्यक्ष काम करणा-या व्यक्तीने अथवा समाजाने, आपल्या धोरणाशी आणि हितांशी विसंगत किंवा बाधक असणा-या, दुस-या एकाद्या चळवळीला विरोध केला, तर त्यात वावगे असे काही नाही. पण ज्यांचा संबंध चुकूनसुध्दा एकाद्या चळवळीत येत नाही, चळवळीत भाग घेण्याची ज्याना मुळी लायकीच नाही, अशा शहरी खुराडयांत वंशवृध्दी करीत जन्म कंठणा-या कारकुण्ड्या बाण्डगुळ्यानी प्रत्येक चळवळीत मध्ये मध्ये तोंड खुपसले कीं, तुका म्हणे ऐशा नरा । मोजुनि माराव्या पैजारा ।। या अभंगाचे मूळ कारण तेव्हाच उमगते. या बाण्डगुळ्यांत पुष्कळ भटेतरी जाती आहेत. त्यांच्यावर भटी खेटरांचा मार धार्मिक सामाजिक आणि इतर सर्व बाबतीत नेहमी खरपूस पडत असतो. पणं उदरंभरणाची सभ्य हमाली करताना दररोज काळ्यागो-या हापसरांच्या लाथा शिव्या खाऊन खाऊन मुर्दाड बनलेल्या त्यांच्या मनोवृत्तीला भटी खेटरे पुष्पांच्या वर्षावासारखी वाटणे अगदी साहजिक आहे.

दिवसाची खर्डघाशी हमाली उरकून ही बाण्डगुळीं कबुतरे खुराडयात परतली की एक आण्याच्या वृत्तपत्रातील बातम्यावर चाललेल्या यांच्या खास पांढरपेशी निर्णयाच्या मखलाशावर मखलाशा ऐकून, बेडकानी सुध्दा चातुर्मासात हल्ली शहराला रामराम ठोकला आहे. या बाण्डगुळ्याना काळ्या गो-या भटांच्या पत्रांशिवाय इतर पत्रांच्या अस्तित्वाची दाद नसते. राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या गप्पा मारताना ही कारकुण्डी कबुतरे कितीहि तिरमिरीवर आली, तरी खुराड्यांची राखण करणा-या फाटक्या पायतणाच्या लायकीच्या भैय्या पठाणापुढे हे सारे बाजीप्रभूचे वंशज आणि बाजीराव पेशव्यांचे भाई शेपटाच्या वाकणासाठी श्र्वानाती नक्कल इतकी हुबेहूब करतात, कीं अलीकडे ‘ शेपटी मुळासकट कापाल तरच पाळीव कुत्रा बनतो ‘ अशा अटी कुत्री आपल्या मालकाना घालू लागली आहेत. शहरातल्या भांडवलबाज खुराडेवाल्यानी या कबुतराची लायकी अंदाजूनच त्यांच्यासाठी दहा दहा फुटांची दोन दोन बिळे बांधण्याचा प्रघात राजमान्य ठरवून घेतला आहे. ही बिळे त्यांचे विश्र्व. एका भिंतीच्या पलीकडे दुसरा कोणी मेला तरी त्याची हा कधी दखल करीत नाही. व्यक्तिस्वातंत्र्य मतस्वातंत्र्य आत्मप्रौढी यांच्या वल्गना मात्र मोठमोठ्या. सगळ्या शहरी सभांचे प्रेक्षक हीच बाण्डगुळी कबुतरे. परस्परविरुध्द दहा सभा असल्या तरी दहाहि ठिकाणी तेच प्रेक्षक हवे ते उलट सुलट ठराव पास करायला तयार. असल्या बाण्डगुळ्याना ब्राम्हणेतर चळवळीचे महत्व कसले कपाळाचे कळणार ? पण भटी खेटरे खाऊनहि भटांच्या डोळ्यानी पहाण-या या भटेतरी बाण्डगुळ्यांचा ब्राम्हणेतरी चळवळीवर मोठा शहरी रोष ! त्यांच्यापैकी उगाच चार दोन मंडळी ब्राम्हणेतर चळवळीत सक्रीय पुढाकार घेतात, म्हणून यांची त्यांच्यावर करडी बायकी नजर ! सायमन कनिशनपुढे एका पांढरपेशा वकीलाने ब्राम्हणेतर मागासलेल्या जनसंघातर्फे साक्ष दिली. ती दिल्यामुळे ‘ आमच्या जातीच्या प्रतिष्ठेच्या नाकाची बोंडी छाटली गेली,’ या सबबीवर हिवतापपूरच्या काही नाकाळ ब्राम्हणेतर बाण्डगुळ्यानी त्या वकील जातभाईचा निषेध केला ! इतकेच नव्हे तर ‘ आम्ही ब्राम्हणेतर नाही’ असा मोठा डंकाहि पिटला, लेकाच्याना ‘ब्राम्हण’ म्हणवून घ्यायला तोंड नाही, आणि ‘ब्राम्हणेतर’ असताना तसे म्हटलेले खपत नाही.

अर्थात या बाण्डगुळ्यांची कोटी हिन्दु समाज–रचनेतील मानवांपैकी नसून शृंगपुच्छादि अलंकराच्या दुस-याच कसल्या तरी कोटीपैकी असली पाहिजे खास ! मद्राशी बाण्डगुळ्या भटांचे काळेकुट्ट ढगार मुंबई

वगैरे शहरांवर कोसळेपर्यंत दखनी पांढरपेश्या वर मिश्या करून कारकुनी पेशाच्या घमेंडीत बराच तर्र असे. महायुध्दामुळे त्याच्या भाकरीचे काठ जरी पुष्कळ ठिकाणी करपले गेले, तरी अगदीच पोटात कोळशे कोंबण्याचा प्रसंग आला नव्हता. पण तिकडे मद्रास इलाख्यात डॉ. नायर, त्यागराज चेट्टी प्रमृति ब्राम्हणेतर वीरानी इतक्या जोराने आणि शिस्तीने आपली ब्राम्हणेतर चळवळ चालविली की तिकडील मद्राशी भटांच्या बाण्डगुळ्या जीवनाला आरपार करवतच लागली. त्याचा परिणाम असा झाला कीं मद्राशी भटांची पोरे कुल्याला लुंग्या लाऊन, उघडी बोडकी अयय्यो करीत, मद्रास इलाखा सोडून बाहेर पडली.* जिकडे भरला दरा, तोच गाव बरा. नानासाहेब पेशव्याच्या कारकीर्दीत जेव्हा चित्पावनांनी स्वत:ची शुध्दि करून, देशी ब्राम्हण वर्गात आपली संघटना करून घेतली. त्या वेळेपासून महाराष्ट्राला तेलंग्या भटाची ओळख झाली होती. + तेलंग्या म्हणजे मोठा चिकट. पण त्याचा चिकटपणा दक्षिणेचे पाणी सुटताच बुळबुळीत *महाराष्ट्रात मद्राशांची पार्सले, प्रथम १८९६ सालीं जी. आय. पी. रेल्वेच्या तारमास्तरांच्या संपाच्या प्रसंगी रेल्वे कंपवीवेच आणली. पोटापाण्याच्या काही तक्रारींसाठी जी. आय. पी. च्या सबंध लायनीवर तारमास्तर सिप्रळरानी संप केला. कंपनाने ताबडतोब मद्राशी तरुणांच्या ट्रेनीच्या ट्रेनी भरून आणल्या आणि प्रत्येक स्टेशनवर दोनदोन चारचार यंडुगेंडु भराभर सोडले. येणा-या जाणा-या गाड्यांच्या नुसत्या खुणा करून सुरवातीला काम चालविले. नंतर जागच्याजागीच त्याना कडकडकट टेलीग्राफी शिकवून कामावर कायम केले आणि संपवाल्या देशी लोकांना घरी बसविले. चालू मुंबईच्या संपातहि मद्राशी कोंगाडी मजुरानीच गर्दी करून संपाच्या टिकावाला फोडले आहे म्हणतात. मद्रास मजुरांची माताच म्हणायची ! +पेशव्यांच्या आणि त्यांच्या जातभाईच्या पंक्तिला बसून पुख्खा पाडणा-या तेलंगी भटाला, इतर भटांपेक्षा, दुप्पट दक्षिणा पेशवे देत. म्हणून हजारो तेलंग्ये पुण्यास टोळधाडीने नेहमी जमत. पेशवे तेलंग्याचे आन्नदाते म्हणून तेलंग्या भटाच्या टाळक्यावर पेशव्याचे स्मारक पगडीच्या रुपाने आझूनही झळकत असते.

पण हा मद्राशी भट म्हणजे तेलंग्याचा तेलंग्या ! चिकटणीच्या कामात सरसाचा बाप. पायाला इंगळा डसला तर मान मोडताच चावा सोडतो. पण मद्राशी भट! चिकटला की तेथल्या दगडमातीला सुध्दा वंशपरंपरा बाधल्याशिवाय राहायचा नाही. हिन्दुस्थानात असे एक शहर शिल्लक नाही की जेथे मद्राशी भटी बाण्डगूळ घुसलेले नाही ! मग्राश्यानी बापजन्मात जरी कधी राज्ये कमावली नाहीत आणि स्वा-याशिका-या केल्या नाहीत, तरी त्यांच्या पोटाच्या पापाच्या स्वारीने सारा हिन्दुस्थान आफ्रिका फिजी केन्या वगैरे देळ आज बेजार होऊन बसले आहेत. मद्राशी जात नाही कोठे ? हवा तेथे जातो. फार काय पण जेथे हवा जात नसेल तेथेहि तो घुसतो. एकदा एकाद्या ठिकाणी घुसला की मग रामेश्र्वरलिंगम् ! रावणाच्या रावणाला जागचे हालायचे नाही. सगळा मद्राशी लुंगीवाला एक जात बाण्डगुळ्या कारकुण्डा. नोक-यांच्या क्षेत्रात मद्राश्याची चुरस नेहमी ‘ मीन कॉम्पिटिशन’ची ( नीच स्पर्धेची ) असते. मुंबईवर मद्राशी बाण्डगुळाची स्वारी होताच, त्यानी निरनिराळ्या शिलेदारी नोक-यांचे भाव फटाफट खाली पाडले. हवा तो भाव पण नोकरी लाव, यापेक्षा खोल भानदडीत तो कधीच पजत नाही सारम् भातम् सुटले की सूर्योदयापासून सूर्योदयापर्यंतही नोकरीची ज्याची तयारी, त्या दिव्य महात्म्यांपुढे पोषाखी पांढरपेश्ये कचाकच कच खाऊन नामोहरम झाले, तर त्यात आश्र्चर्य कशाचे आणि कोणी करायचे? लक्षावधि दखन्ये बाण्डगुळे मद्राशी बाण्डगुळ.नी घरोघर रिकामे बसविले. “मध्यम वर्गात बेरोजगारी वाढली” म्हणून श्रीयुती कुरवूर शहरी पत्रांतून टुरटुरू लागली.

पण हे दखनी पांढरपेशे इतके पचपचीत शेळपट, कीं स्वत:च्या पोटाला मद्राशी कोळशाने आग लावली, हे सिध्द सत्य धडाडीने उघड बोलून लिहून दाखवायचीहि याना हिंमत नाही ! आणि म्हणे आम्हाला स्वराज्य पाहिजे! वर्षानुवर्षे कष्टाळू शेतकरी उपाशी मेला, गैवजोश्याच्या शिध्यापासून तो कलेक्टराच्या सरबराईच्या कोंबड्यांपर्यंत जरी वेदोक्त कायद्योक्त नागावला गेला, सावकारी चक्रवाढी व्याजात राहत्या झोपडीला आणि मळत्या शेतात मुकला, आणि अखेर कराच्या करकरीखाली भरल्या शेतापुढे पसाभर दाण्याला मोताद झाला, तरीहि त्याचा ज्या शहरी स्वराज्यवादी बाण्डगुळ्याना चुकून सुध्दा कधी घाम फुटला नाही, त्याच पांढरपेश्यांवर बेरोजगारीची नुसती झुळूक चाटून जाताच, अन् एम्प्लॉयमेण्ट, आन् एम्प्लॉयमेण्ट, म्हणून केवढी बोंबाबोंब ! पांढरपेश्या शह-यांच्या पोटालाच जेव्हा कचकचीत चिमटा बसला, तेव्हा त्यांची वृत्तपत्री वाग्वेजयंति “हिंन्दुस्थान दरिद्री झाला” आशा श्रीयुती हाका आरोळ्या मारू लागली. तेव्हाच च्यांचा स्वराज्यवाद फुरफुरूं लागला. तेव्हाच च्यांचे पूर्वीचे अन्नदाते व आश्रयदाते दयाळू सरकार ‘सैतानी वाटी लागले. त्वाहच च्याना रशियन कम्युनिढमची तत्वे वेदान्तापेक्षाहि गोड वाटू लागली. उपासमारीचा आणि दारिद्याचा वणवा खेड्यांतल्या शेतांच्या बांधावरून कोसळत कोसळत जेव्हा या पांढरपेश्या शहरी शहाण्यांच्या टीचभर पोटाच्या पाटाला येऊन विनचूक भिडला, तेव्हा याना गिरणबाबूंच्या हीनदीन स्थितीचा कळवळा फुटला. जो पांढरपेश्या उन्मत्त वर्ग कारकुनीपेक्षा इतर कष्टाळी उद्योगाला तुच्छ समजत असे. तोच आता पडेल ते काम ‘डिगनिटी ऑफ लेवर’ ( कोणतेही काम नीच नाही ) च्या वेदान्तावर करण्यास तयार झाला.

मद्राशी आणि तत्सम परप्रांतियांविरुध्द व्र काढण्याची किंवा स्पर्धा करण्याची आंगात ताकद नसल्यामुळे, तो देशबंधुत्वाच्या नाटकी सबबीवर आपल्या कमजोर मनगटाचे समर्थन करीत असतो. युनिव्हर्सिट्यांट्या पदव्यांच्या दिमाखावर दीन दुनिया खातरजमेत न धरणा-या पांढरपेश्या एमे बीएना जेव्हा चहाचा कपसुध्दा कमविण्याची लायकी नसल्याचा अनुभव पटला आणि शहरापेक्षा खेड्यातले लोक आझूनहि किंचित सुखी आहेतसे त्याना दिसले, तेव्हा शहरी सुधारणेचा दिव्य प्रकाश खेड्यापाड्यात पाडण्यासाठी विद्वान तरुणाना खेड्यात घुसण्याचे उपदेश सर्वत्र होऊ लागले. सारांश, ज्या बाण्डगुळ्यांच्या पिढ्यान् पिढ्यांच्या परिश्रमांवर शहरांची वाढ व भरभराट झाली, त्याच शपरांत त्याना उपाशी मरण्याची वेळ आली. सन १९२३ साली मुंबईत व इतर गिरणाळू ठिकाणी मोठमोठे गिरण्यांचे संप झाले आणि त्यांचे परिणाम इतर सर्व धंद्यांवर विपरीत होऊन, गोरगरीबांचे पीठ झाले आणि पांढरपेश्ये रोजच्या मीठभाकरींसाठी आचके देऊ लागले. हा वेळपावेतों खेड्यांतील शेती सोडून शहरातल्या गिरण्यांत घुसलेले गिरणबाबू पोटापाण्याच्या तक्रारीसाठी संप करीत; पण त्यांच्याच संघटना व शिस्त नसे. गेल्या सालापासून ( १९२८ ) सर्व गिरणीकामगारानी अनेक युनियने स्थापन करून शिस्तीने संप लढवायला सुरुवात केली. त्यामुळे त्यांची एवढी प्रचण्ड शक्ति आज शहराना जाणवू लागली आहे कीं, ज्या गिरणबाहूंकडे लोक एक सहा महिन्याच्या संपाने सगळ्या मुंबईच्या नख-यात गरम मसाला घालू शकतो, हे त्या संघशक्तीने भांडवाल्यांपासून तो थेट बाण्डगुळ्यापर्यंत सर्वांच्या प्रत्ययाला आणून दिले. गिरणबाबू संप करून घरी बसलाच, हाटेले बंद झाली, दारूचे पिठे पिकेटिंग शिवाय माशा मारीत बसले, दाणेवाले ‘कुरे कोकरे’ वाणी बाप मेल्यासारखे चेहरे करून स्वस्थ बसले, आणि पानपट्टीवाले दात वासून आकाशाकडे पाहू लागले. खुद्द गिरणबाबूंच्याहि विचारांत अदभूत क्रांति झाली. तत्वासाठी स्वार्थत्यागच काय, पण आत्मयज्ञहि करणारे वीर आणि पुढारी त्यांच्यात निर्माण झाले.

पूर्वी संप म्हणजे वृत्तपत्री गप्पेच्या पलीकडे फारसे कोणी विचारात घेत नसत. पण आज मजुरांच्या पोटाच्या बण्डाने एवढी जबरदस्त शिस्तीची संघटना केली आहे कीं, संप म्हटला कीं पोलीशी घोडदळ, लाठीबाज पायदळ आणि गो-या लष्कराची मोटारीची धावपळ एकदम सुरूहोते. प्रत्यक्ष महायुध्दाच्या धामधुमीत सुध्दा जे समर्थ सरकार इतका बाचकाबाचकीचा आणि आचकादचक्याचा प्रकार करीत नव्हते, ते ज्याअर्थी नुसत्या नि:शस्त्र गिरणबाबूंच्या साध्या पोटपाण्याच्या प्रश्नाला–निर्वाणींच्या संपाला–एवढे भेदरू लागले आहे, त्या अर्थी जनताजनार्दनाच्या या नवावताराचे विराट स्वरुप तसेच महासमर्थ आणि कर्दनकाळ असले पाहिजे खास. हिंदी कामगार मूळचा शेतकरीच. पोटाच्या वाढत्या पापाला तोंड देण्यासाठीच तो शहरांत येऊन तात्पुरता 'कामगार' बनतो. परंतु त्याच्या महत्वाकांक्षेचा सर्व ओघ घरच्या-खेड्याच्या-शेताकडेच लागलेला असतो. शेती हेच त्याच्या स्वावलंबनाचे मूळक्षेत्र. बाकीचे हंगामी धंदे तो अळवावरचे पाणीच समजत असतो. संप सुरू होताच, शहरातला खर्च भागे ना, म्हणून चटकन् पडशी खांद्यावर टाकून तो 'गांवीं' निघून जातो. याच्या उलट पांढरपेशे लोक पहा. शहरात नोकरीचे टिंराड वाजले तरी तेथेच पडून असतात आणी सर्व उपाय हरले की वैतागून एक दिवस आत्महत्या करतात ! हा नामर्दाचा मार्ग शेतकरी-कामगार-कधीच पत्करणार नाही. त्याचा आपल्या मनगटाच्या आणि नांगराच्या दांड्यावर भरेसा फार. त्याचा निर्वाणीचा दाता पाण्डुरंग नसून त्याच्या नांगराचा दाण्डुरंगच होय. तीच त्याची आत्मशक्ति. तिच्याच जोरावर तो लवकरच शेतक-यांचे स्वराज्य निर्माण करील. म्हणूनच गोल्ड स्मिथ आपल्या "उध्वस्त खेडे" काव्याच्या समारोपात म्हणतो ( मथळ्यावरच्या इंग्रेजी ओळी पहा ):- " आत्मशक्तीने फुरफुरलेले राष्ट्र कितीहि दरिद्री झाले तरी तेच सुखी राष्ट्र होय. ते काळाच्या काकाला दाद देणार नाही. खडकावर समुद्राच्या आणि हवेच्या लाटा कितीहि जोराने आदळल्या म्हणून काय होणार ? परंतु जे राष्ट्र नुसत्या व्यापारी तागडीच्या जोरावरच जगण्याची घडपड करते, ते, लाटेचा एकच धडका कृत्रिम बांधपाटाला जसा बोलबोलता फस्त करतो, तसे चुटकीसरसे लयाला गेल्यावाचून रहाणार नाही."

**प्रकरण ६ वे**

**ब्राम्हणेतर चळवळीचा जमाखर्च**

कॉंग्रेस, होमरूल, समाजसुधारणा, वगैरे शहरी शहाण्यांच्या चळवळी गेली ४०-५० वर्षे शहरोशहरी कितीहि मोठा गाजावाजा करीत असल्या तरी मागासलेल्या खेडवळ शेतक-याच्या आत्मप्रबोधनाची खरीखुरी टिकाऊ कामगिरी ब्राम्हणेतर चळवळीनेच केलेली आहे. ज्योतीराव फुल्याने सत्यशोधक समाज स्थापन करून, शहरी डळवळीचा एकांडेपणा शहरी शहाण्यांच्या नजरेला आणण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. पण राजकारण म्हणजे हजार रोगावर एकच औषध मानणा-या पांढरपेशा भटभटेतरानी त्याला कोपरखळ्या दिल्या. आगरकर रानडे प्रभृति समाजसुधारकांची सामाजिक सुधारणेची दृष्टी सुध्दा शहरी पांढरपेश्यांच्या क्षितिजापुढे कधीच गेली नाही. याचा परिणाम असा झाला कीं, शैक्षणिक चतुराई पासून तो 'स्वराज्य माझा जन्मसिध्द हक्क आहे' या वेदान्तापर्यंत शहरी शहाण्यांची हालचाल मुल्कमैदानी ग्रजना करू लागली, तरी शेकडा ९५ बहुजन समाज अंतर्बाहय स्थितीत मातीच्या ढेकळाप्रमाणेच हतसंज्ञ पडून राहिला. जिकडे पहावे तिकडे पुढारलेल्या पांढरपेश्या लेखाळ वाचाळ चळवळी, मागासलेल्यांची दाद कोणालाच नाही. बंगालची फाळणी, बांज प्रकरणे, महायुध्द इत्यादि अनेक क्रान्त्या घडल्या, तरी त्याचा शेंडा बुडखा सुध्दा बिचा-या खेडवळ जनतेला कधीउमगला नाही. शहरातले 'लई श्येने बामन' जसे म्हणताल तसे करावे, मागतील ते गेऊन त्यांची तुंबडी भरावी, सांगतील तसे

ओरडावे, या पलीकडे त्याना काहीच कळत नसे. शह-यांच्या शहरी चळवळी खेडवळांवर बाण्डगुळाप्रमाणे मनमुराद चरत, पण ख-या खोट्याची शत्रुमित्राची पारख करण्याची आत्मशक्ति खेडवळांमध्ये जागृत करण्याचा प्रयत्न मात्र कधीच कोणी केला नाही. तसा प्रयत्न शह-यांच्या बाण्डगुळ्या स्वार्थाला विघातक आहे, ही मुद्याची गोष्ट शहरी शहाणे जाणून होते. शेतकरी जागा झाला, त्याला हिता-हिताच्या वाटा कळू लागल्या आणि आपल्या आज्ञानावर पिढ्यानपिढ्या मोकाट चरणा-या बाण्डगुळ्यांच्या कारस्थानांची त्याला ओळख पटली, कीं शहरी शहाणा बसल्या खुर्चीत गार पडलाच. ही मख्खी ज्योतीरावच्या नंतर करवीरकर शाहू छत्रपतींनी ओळखली आणि च्यांच्या ब्राम्हणेतर चळवळीने तिचा प्रयोग यशवंत करून दाखविला. 'ब्राम्हणेतर' या नावामुळे या चळवळीविषयी शहरी भट भटेतर बाण्डगुळ्यानी सर्वत्र बराच गैरसमज फैलावला.

भटी वळणाच्या वळचणीचे पाणी पिऊन, भटी संस्कृतीचय् नकलेवर, आपल्या शहरी श्रेष्ठत्वाचा दिमाख मिरविणा-या कायस्थ प्रभूंसारख्या ज्या अनेक भटेतरी जाती आहेत, त्याना 'ब्राम्हणेतर' नावामुळे या चळवळीत आपला नाखुषीचा समावेश होत असल्याचा भास झाला; आणि ते निष्कारण तंगड्या झाडू लागले. वास्तविक ब्राम्हणेतर चळवळ मागासलेल्या बहुजन समाजाची खास चळवळ असल्यामुळे. या शहरी बाण्डगुळ्याना तिच्याशी स्वत:चा प्रत्यक्ष संबंध जोडण्याचा यत्किंचितहि अधिकार नाही. ब्राम्हणेतर चळवळीच्या पुढा-यानी तसा कधी प्रयत्न केला नाही, करण्याची त्याना जरूरच पडली नाही. बाण्डगुळ्या-मग तो काळा भट असो वा गोरा भट असो, नाहीतर भटेतर असूनहि तसे उघड कबूल करण्यास शरमणारा त्रिशंकू असो-त्याच्या गुलामगिरीतून खेडवळ शेतक-याला शक्य तितक्या लवकर मुक्त करण्याची जी चळवळ, ती कायस्थ प्रभूसारखे शहरी भटेतर बृहस्पति झाले काय, किंवा आणखी कोणी मटण मासळी खाणारे भट झाले काय, त्यांच्या आशीर्वादावर ती थोडीच अडून बसते ? या असल्या शहरी शिलेदारांच्या खुषी नाखुषीने कोड पुरविण्याचा कोडगेपणा ब्राम्हणेतर चळवळीच्या मूळ तत्वांतच नाही. खेडवळ जनतेच्या अज्ञानावर हव्या त्या बाजूने चरणारे लोक अनेक प्रकारचे आहेत. त्यात भिक्षुक भटाचा नंबर पहिला. त्याच्या धार्मिक सत्ताबाजीची पकड मुळांसकट उखडल्याखेरीज शेतक-याच्या सुधारणेचा प्रत्येक प्रयत्न फुकट जाणार, या धोरणाने भिक्षुकशाहीवर म्हणजे ब्राम्हण्याभिमानी ब्राम्हणांच्या वर्चस्वावर निर्वाणीचा हल्ला चढविणा-या चळवळीला 'ब्राम्हणेतर' असे सुटसुटीत विशेषण आपोआपच चिकटले गेले. हिन्दुस्थानातील पूर्वीची मुसलमानी साम्राज्यसत्ता झाली काय, किंवा आताची ब्रिटीश सत्ता झाली काय, देशाच्या गुलामगिरीचीं ही बाह्य व हंगामी कारणे होत. परंतु या सर्व कारणांचे मूळ महाकारण अथवा ब्रम्हगाठ म्हणजे भटाभिक्षुकांची धर्मोक्त सत्ता हेच असल्यामुळे, तेच प्रथम ठेचण्याची ब्राम्हणेतर चळवळीने दूरदृष्टी व धडाडीची लगबग केली.

आत्मोध्दाराच्या मार्गातला भयंकर भुजंग म्हणजे भिक्षुकशाही भट, हा शेकडा शतकांचा ऐतिहासिक सिध्दान्त शहरी भटेतर शहाण्यांच्या गळी उतरत नसला, तरी ब्राम्हणेतर पुढा-यानी चो बिनचुक अंदाजून, त्या सापाचे विषारी दात पाडण्यासाठी ब्राम्हणेतर चळवळीचा शिस्तीचा आणि शिकस्तीचा उपयोग केला. चळवळीच्या अग्रभागी शाहूमहाराजासारखा सर्वसमर्थ छत्रपति कंबर कसून उभा राहताच, भिक्षुकशाही वर्चस्वाला दहाहि दिशानी इतके जबरदस्त काटेरी मोर्चे लागले की, दखनचा सारा भटसमाज छत्रपतीच्या नावाने हातापायाची बोटे कडाकडा मोडू लागला. स्वत:ची बोटे मोडल्यावर भटानी अनेक भटेतरी मांजरांच्या डावल्या भाड्याने घेतल्या. शाहूमहाराजावर भाडोत्री भटेतरांकडून डमारहि करविली. पण व्यर्थ! शतकानुशतके खेडवळ जनतेच्या डोळ्यांवर बांधलेली भिक्षुका वर्चस्वावी अंधारी

एकदा उचकल्यानंतर भटांच्या वेदोक्त दमधाटणीला कोण कुत्रा जुमानणार ? अक्षरशत्रू आणि हेकट खेडवळांच्या विचारांत क्रान्ति घडवून आणण्याचे काम फार बिकट. ते ब्राम्हणेतर चळवळीपूर्वी कोणालाहि साधले नव्हते. कीर्तने पुराणे प्रवचने व्याख्याने इत्यादि शहरी थाटाची । यंत्रतंत्रे खेडवळ कधीच जुमानीत नाही. तो त्यांकडे कधी चुकून ढुंकूनसुध्दा पहाणारा नव्हे. वृत्तपत्रांची मिजास निरक्षरांपुढे काय होय ? सहीची निशाणी आंगठा न् नांगर एवढीच ज्यांच्या अकलेची कमाई, त्यांच्या अकलेत नवीन विचारांची फोडणी कशी घालावी, हा शाहू छत्रपतीपुढे मोठा कठीण प्रश्न होता. तो त्यानी सर्व परिस्थितीचा बारीक विचार करुन सत्यशोधक जलशांच्या योजनेने फार कुशलतेने सोडविला. गंधर्वी नाट्यप्रयोगात मुरलेल्या शहरी शहाण्याना तमाशे आणि जलसे हे नाक मुरडण्याइतके गलिच्छ आणि बीभत्स वाटणे सहाजिक आहे.

नित्य बासुंदी पुरी पुरणपोळ्यांच्या राशीत गडबडा लोळणा-या महात्म्याना गराब खेडवळांच्या चटणी भाकरीची लज्जत कशी कळावी ? नित्य नेकटाय कॉलर पॅण्टच्या सुटा-बुटात अंड्याप्रमाणें उबून निघणा-या महाबागाना नांग-या शेतक-याच्या घोगडीच महत्व कसे उमजणार ? तमासे, जलसे, भेदिक लावण्या, पोवाडे, कलगीतु-याच्या लढता, हे खेडवळांच्या करमणुकीचे प्रकार. त्याना शह-यांचे स्वयंवर आणि भावबंधन काय होय ? तमाशाचे कडे कडाडल्याचे कानी पडताच पुढ्यातला भाकरीचा थाळा दूर लोटून, कड्याच्या आवाजाच्या दिशेने, मुंडासे सावरीत सावरीत, धावत जाणा-या तरूण वृध्द शेतक-यांची शेकडो उदाहरणे प्रस्तुत लेखकाने स्वत: पाहिलेली आहेत. सापाला पुंगी, हरणाला गायनाची गुंगी, भट देशभक्ताला फंड, वृतपत्राला वर्गणीदार, कोल्हापूरला शर्यतीचे घोडे, पुणेकर भटाना टिळकी धोंडे, कायस्थ प्रभूना हुंड्याचे हंडे, 'बामनेतरी' मराठ्याना सरकारी नोक-या, याज्ञिक भटाना बोकडी कोहळा आणि क्षात्रजगद्‌गगुरुला लग्नाचा सोहळा, तद्‌वत शेतक-याला तमाशाचा जिव्हाळा मोठा. ब्राम्हणेतर चळवळीच्या पूर्वी खेड्यांतले तमाशे कृष्णलीला, रासक्रीडा वगैरे पौराणिक विषयावर पुष्कळ भर देऊन, त्यांत ब्राम्हणांचेहि महत्व न कळत वर्णित असत. जसे पुराण तसा तमाशा. शाहू छत्रपतींनी सत्यशोधक जलशाची सल्पना काढूम, तमाशाचा बाहेरचा नाचरंग जशाचा तशा कायम ठेवला, पण नांदीपासून भरतद वाक्यापर्यंत सर्व वाषयाची क्रांति सुचविली. विद्येचे महत्व, शेतक-याना ठकविणारांच्या उघड गुप्त लीला, मद्‌यपान निषेध, ब्राम्हणांच्या वर्चस्वाचा दांभिकपणा, फंडगुंडांचा धुडघूस, बालविवाह निषेध, विधवा केशवपनाचा राक्षसीपणा, असले जिव्हाळ्याचे सामाजिक सुधारणेचे विषय संगितमिश्र सवाल जवाबांच्या आणि संगांच्या रुपाने शतक-यांपुढे मांडण्याची सत्यशोधक डलशानी सुरुवात करताच, महाराष्ट्रातील खेडीपाडी सामाजिक सुधारणेच्या नव्या विचारांनी भारून गेली. जलशानी मद्‌यपानासारख्या एकाद्‌या व्यसनाची वाईट बाजू संगीत फार्साने नटवून नाचून दाखविली कीं, ती खेडवळांच्या हृदयाला इतकी थेट जाऊन भिडत असते कीं फार्स पुरा होताच शेकडो शेतकरी उभे राहून त्या व्यसनाची शपथ घेतात.

शहाण्या पांढरपेशा भट भटेतर समाजात अजबनहि चालू असलेला विधवाकेशवपनाचा प्रघात जलशाने हुबेहुब रंगविताच, "उद्‌यापासून जो विधवेला हात लावील तो आपल्या आई बहिणीला हात लावील" अशा शपथा एका मोठ्या शहरातल्या शे-दीडशे न्हाव्यांन घेतल्याचे दृश्य स्वत: प्रस्तृत लेखकाने पाहिलेले आहे. अर्थात् दुस-या दिवशी त्या शहरात विधवांच्या हजामती बंद पडल्या. या क्रांतीचा सरळ अर्थ लक्ष्यात न घेता, ' ब्राम्हणांवर सत्यशोधकांचा अत्याचार' झाल्याच्या भटी बोंबा सर्व भटी पत्रांत ठणाणलेल्याहि प्रस्तृत लेखकाच्या चांगल्या स्मरणात आहेत. एकट्या सातारा जिल्ह्यात गेल्या १०

वर्षांत खेडवळ विद्यार्थ्यांची आणि शाळांची जी विलक्षण वाढ झाली आहे, त्याचे मुख्य श्रेय ब्राम्हणेतर चळवळीच्या सत्यशोधक जलशानाच देणे प्राप्त आहे. शेटजी आणि भटजी शेतक-याना कसे लुबाडतात, याचे मनोरंजक फार्स पाहून सेतकरी वर्ग आता चांगला जागा झाला असून, काही खेड्यांतून शेटजी भटजींचे आता कायमचे उच्चाटन झाले आहे. धार्मिक क्षेत्रात तर सत्यशोधक जलशानी घडविलेली आचारक्रान्ति मोठमोठ्या शहरी सामाजिक परिषदाना आज गुरुस्थानी शोभण्यासारखीच झाली आहे. ज्या सुधारणा तीन डझन वर्षांच्या परिषदानी नुसत्या एकदाहि हाताळण्याची शहरी शहाण्याना अक्कल आली नाही, तसल्या सुधारणा खेडवळ शेतक-यामी सत्यशोधक जलशाच्या एका प्रयोगाच्या थापेत प्रत्यक्ष आचरणात उमटवून दाखविलेल्या आहेत. उच्च संस्कृतीचा आणि जगातल्या सा-या शहाणपणाचा मक्ता मिरविणा-या कायस्थ प्रभूसारख्या समाजात, तीव्र निषेधाची प्रत्यक्ष गाढवे नाचली तरी, हुंड्याची भाड खाणा-या गाढवांची संख्या नित्य वाढतीच आहे. भटाभिक्षुकांचा दांभिकपणा स्पष्ट उमगला असूनहि भटांच्या हातलावणीशिवाय अनेक शहरी भटेतर समाजांतील मुंजी लग्ने आणि तेरावी घसघशीत साजरी होत नाहीत. पण सत्यशोधक जलशानी मागासलेल्या खेडवळात धार्मिक स्वातंत्र्याचा इतका जोरदार पुरस्कार फैलावला कीं, मराठे आणि तत्सम जातीत गेल्या १० वर्षांत भटाकडून लागलेले लग्न हजारात एकादेच सापडेल. बालविवाह बंद पडत चालले.

हुंडा आणी देज देणा-या घेणा-यंना जमातीचा दंड आणि जाहीर नाचक्कीचे प्रयश्चित म्ळत असते. तात्पर्य, खेडवळ जनतेत कोणतीहि सुधारणा ठसठशीत वठविण्याच्या कामी सत्यशोधक जलशाचे शस्त्र बिनतोड यशवंत ठरले आहे यात मुळीच शंका नाही. परंतु या चळवळीचे ध्येयच मुळी कधी ठरले नाही. ना तिच्या घटनेचा कोण कधी विचार केला, ना तिच्या नियंत्रणाची जबाबदारी कोणी पत्करली. कॉग्रेसा झाल्या, परिषदा भरल्या, शहरी चळवळ्यांच्या रंगाढंगाच्या नकला पुष्कळ केल्या. पण ध्येयाची निश्चिती मात्र केव्हाच ठरली गेली नाहीं. सत्यशोधक चळवळ आणि ब्राम्हणेतर चळवळ यांच्या मर्यादा स्पष्ट आखल्या न गेल्यामुळे तर त्यांच्या संमिश्र गोंधळांत ब्राम्हणेतरांच्या संघटनेचे तीन तेरा खुदेद शाहू छत्रपतींच्या हयातीतच वाजण्यास सुरीवात झाली. झालेली थोडीफार जागृति शिस्तीची पुण्याई नसून, चळवळीच्या डुकरमुसंडीची नवी नवलाई होय. शेतकरी जागा झाला, त्याला आपले हिताहित कळू लागले, त्याच्या संघटनेचा जोर वाडू लागला, तर त्या अचाट शक्तिचा उपयोग कसा कोठे आणि कोणी करावयाचा, त्याचा विचार आजपर्यंत मुळीच झालेला नाही. शाहू महाराजानी तो कधी केला नाही; त्यांच्या मृत्यूनंतर सर्वच बजबजपुरी माजली. याचे कारण छत्रपतींचा लोकसंग्रह आंधळा होता. लोकसंग्रहाच्या बाबतीत टिळक आणि शाहू छत्रपति हे दोघेहि लोकोत्तर पुरुषोत्तम एकसारखे चुकले. दोघेहि मोठे बण्डखोर चळवळ्ये. अचाट क्रान्ति घडविण्याच्या कामात दोघेहि दांडगे महत्त्वाकंक्षी. दोघानाहि लोकसंग्रहाचा मोठा हव्यास. पण आपल्या प्रभावळीत जमणा-या लोकांच्या पात्रापात्रतेची कसोटी दोघांपैकी एकानेहि कधी कसाला लावली नाही. हवे ते बाजारवुणगे जमत गेले, यजमानांच्या मोकळ्या थैल्यावर बाण्डगुळा प्रमाणे चर चर चरले, आणि यजमानाचा अंत होताच त्याच्या नावाने घंटा बडवून बडवेगिरी करीत बसले. टिळकांच्या बडवेमण्डळात जसा फण्डगुण्ड्या आचारी पाणक्यांच्या भरणा जबरदस्त होऊन, शेकडो नालायक भटें देशभक्तपणाच्या कल्हईने निष्कारण चमकू लागली, तसाच थेट प्रकार शाहूच्या ब्राम्हणेतरी प्रभावळीचा झाला.

टिळकांप्रमाणेच शाहूचाहि लोकसंग्रह अखेर त्याना इतका डोईजड आणि बेताल झाला कीं, टिळकांप्रमाणेच शाहू छत्रपतीना सुध्दा आपल्या बडव्यांच्या बदकर्माबद्दल अनेक वेळा प्रायश्चिते घ्यावी

लागली. हिंदु राजा–विशेषत: मराठा राजा–म्हटला कीं त्याच्या भोवती लाळघोट्या माणशी सुरवंटांचा घट्ट गराडा पडलाच म्हणून समजावे. ही सनातन परंपराच आहे. त्यातल्या त्यात शाहू छत्रपति आपल्या छत्रपतित्वाचा संस्थानी एकलकोंडेपणा लाथाडून, अवघ्या महाराष्ट्राच्या दीन दुबळ्या रयतेच्या उध्दारासाठीं, आपली गंगाजळी सताड उघडी टाकून बसलेले ! मग काय विचारतां ? वाटेल त्या उनाडाने उठावे, महाराजांच्या दर्शनाला जावे, अमूक तमूक करतो म्हणून बढाया माकाव्या. नाना प्रकारच्या ' स्कीम्स ' त्यांच्यापुढे मांडाव्या, हजारो रुपये हबकावे, जरा उजाच इकडे तिकडे 'सत्यशोधक' किंवा 'बामनेतर' म्हणून मिरवावे, असा तुंबड्याभरुन लोकांचा मोठा उरूस चालू झाला होता. कार्यदक्ष, तत्वनिष्ठ, धोरणी आणि लायक अशा लोकांचा छत्रपतीपर्यंत रिघावच लागे ना. लागला तरी त्यांच्या सूचनांचा विपर्यास करुन दाखवणारी लांडी कुत्री जवळच असायची. याचा परिणाम असा झाला कीं, चळवळ उनाडटप्पू पैशेखावूंच्या हाती गेली, तिचे खरे महत्व बाजूला पडून कार्यक्रमाचा विचका उडाला, सत्यशोधक चळवळीचे खरे तत्व लाथाडले जाऊन, तिच्या नावाखाली गावोगाव गुंड पुडांचे उत्पात आणि अत्याचार सुरु झाले, आणि सर्वच चळवळीचा गोंधळ हुकमती बाहेर गेल्यामुळे अखेर सत्यशोधक समाजाशी माझा कसलाही सांबंध नाही असा शाहू महाराजाना जाहीरनामा प्रसिद्ध करावा लागला. या पूर्वी हाच प्रसंग रा.ब. लठ्ठे आणि जाधवराव यानाहि केसरी पत्रातून साजरा करावा लागला होता. तात्पर्य, तळवळीचे ध्येय आणि धोरण निश्चित न ठरविल्यामुळे आणि तिच्या कार्यक्रमावर शिस्तीचे बंधारण न घातल्यामुळे, ब्राम्हणेतक चळवळीसारखी शेतकरी व मागासलेल्या बहुजन हितवादाची उत्कृष्ट चळवळ, सर्वत्र फैलावूनहि, तिचा व्हावा तसा उपयोग झाला नाही आणि होतहि नाही. ब्राम्हणेतर चळवळीचे कर्णधारत्व शाहू छत्रपतीनी पत्करल्यामुळेच तिचा सर्वत्र फार लवकर प्रसार झाला.

छत्रपती नावातच अशी जादू आहे कीं, तेथे खेडवळ शेतक-यांचे आणि मावळ्यांचे माथे आपोपआप प्रमाणासाठी खाली वाकते. बहुतेक शेतकरी जातीने मराठेच. आर्थात् त्यांच्यात चळवळीचा फैलाव करण्यासाठी शाहूच्या संग्रहात मराठ्यांचाच भरणा विशेष झाल्यास त्यात नवल नाही. जातिभेद, देव-मानवातला दलाल भट आणि सामाजिक उच्च-नीच्चता, या तीन महत्वाच्या राष्ट्रीय दोषांवर कट्यार चालविणा-या सत्यशोधक समाजाचा पुरस्कार ब्राम्हणेतरी मराठ्यानी सर्रास केल्यामुळे, या चळवळीच्या संघशक्तीचा दुरूपयोग मराठे चळवळ्ये स्वजातिवर्चस्वाकडे करतील, अशी प्रथमतः कोणालाही शंका आली नाही. मराठे झाले तरी पिण्डाने जातिभेदाळू हिन्दूच ! विद्येत गदीच मागासलेले. त्यात ब्राम्हणेतर चळवळीने शेकडो वा-याचे पाग्ये बनल्यामुळे बहुतेक कार्यकर्ते मराठे चळवळ्ये मर्यादेबाहेर शेफारून गेले. आम्ही करू ती पूर्वदिशा असा भटी मद त्याना चढला. अनेक ब्राम्हणेतर शहरी समाजांच्या सहकार्याचा प्रयत्नच त्यानी न केल्यामुळे, त्यांच्या सहानुभूतीला ब्रम्हणेतर चळवळ अज्जीबात पारखी झाली. बरे, केवळ मागासलेल्या खेडवळ ब्राम्हणेतर जनतेची संघटना साधावी, तर कार्यकर्त्या मराठ्यांचे मदांध वर्तन अनेक मराठेतर समाजाना जाचक होऊ लागले होतो. फक्त शाहू महाराजांच्या मुर्वतीसाठी प्रतिकाराची भाषा ओठापर्यंत येऊन पोटात फिरत असे. इतक्यात शाहू महाराजांनी क्षात्र जगद्गुरूच्या नव्या मठाचा उपद्व्याप केला आणि क्षात्र - क्षत्रि म्हणजे मराठे अशी स्पष्ट व्याख्याहि जाहीर केली. अनेक मराठेतर क्षत्रिय समाजाना याची चीड आली. पण आतापर्यंत देव मानवातला दलाल म्हणून भिक्षुक भटांची हुर्रेवडी करण्यात दंग असलेले सर्व सत्यशोधकी मराठे, नाटकातल्या ट्रान्सफर सीनप्रमाणे, क्षात्रजगद्गुरूच्या बुटांवर माथी घासायला धावत गेले. सत्यशोधक समाज आणि त्याची कट्टर विवेकवादी तत्वे राहिली ज्योतिबा फुरबांच्या धडग्यात आणि सगळे मराठे

बीरपीर पडले क्षाध्जगद्गुरूच्या नव्या बाडग्यात. मराठ्यांचा जगद्गूरू उत्पन्न झाल्याबरोबर ब्राम्हणेतर चळवळीत दाडगी फूट पडली. या नव्या पीठाच्या समर्थनार्थ अनेक मराठा वृत्तपत्रानी विधानांच्या आणि सबजींच्या मखळाशा लढवून, शाहू महाराजांच्या या धाडशी प्रयोगाला उचलून धरण्याचा प्रयत्न केला, पण तो एकहि विवेकावाद्याला आजपर्यंत पटला नाही. उलट त्यामुळे या मराठा पत्रकारांची दुप्पटी वृत्ति तिटकारा येण्याइतकी चिळसताणी ठरली. सध्या तर बहुतेक मराठा वृत्तपत्रे एकाच तोंडाने कट्टर चातिभेदाची-मराठा वर्चस्वाची-आणि सत्यशोधकी प्रामाणिकपणाची गरम सर्द हवा सोडण्यात मोठी तरबेज झालेली दिसतात. शाहू छत्रपति हयात असेपर्यंत ब्राम्हणेतर चळवळीत पडलेल्या आणि पडत असलेल्या भेगा एकसारख्या फाटतच गेल्या. मराठा-मराठेतर भेद जोराने पुढे आला. चळवळीच्या नावापासून तो तिच्या ध्येय धोरणाच्या निश्चितीपर्यंत प्रश्नविरामांचे डोंगर उपस्थित झाले. शाहू महाराजांच्या मलीद्यावर धष्टपुष्ट झालेले बरेच बेकर्तगार मराठे गुंड चळवळीचा पुढारी मी म्हणून एकमेकांशीच चुरशीचे सामने देऊ लागले. ब्राम्हणेतर म्हणजे कोण याची व्याख्याहि स्पष्ट नसल्यामुळें, जातीचा ब्राम्हण नव्हे तो ब्राम्हणेतर अशी सोपी व्याख्या पुढे आली.

उमरावतीच्या ब्राम्हणेतर कॉंग्रेसमध्ये तर ब्राम्हण वगळून बाकीची सारी दुनिया चुटकीसरशी ब्राम्बणेतर दालनात आणून बसविली. त्यामुळे, शेतक-याच्या मुंड्या मुरगळणारे गुजर मारवाडी, देशाला दारूबाज बनविण्याचा राजरोस मक्ता घेणारे सोमयाजी पारशी, आणि कज्जेदलालीच्या घरटात त्याला पिळून त्याच्या वर्चस्वनाशाच्या पिठावर आपल्या वैभवाच्या भाक-या थापणारे कायदेबाज वकील कोंबडे, वगैरे शेतक-यांचे खास शत्रू त्यांचे पुढारी बनले. कसाईच गोरक्षणाच्या चळवळीचे सूत्रधार बनवल्यावर परिणामांची कल्पना वाटेल त्या रेम्या डोक्याने करावी. ब्राम्हणेतर चळवळीने ब्राम्हणांच्या सर्वदेशी वर्चस्वाला कायमचे गाडल्यामुळे, जातीने ब्राम्हण नसलेल्या शेटजी भटजींचें आयतेच फावले. ब्राम्हण सावकारांची कारस्थाने ब्राम्हणेतर चळवळ ठिकठिकाणी ठेचून पाडीत असे, पण ब्राम्हणेतर त्वाचा मुखवटा घालून खेडवळ शेतक-यांच्या रक्तावर जगणा-या इरसाल ब्राम्हणेतरी जळवांच्या थैमानाला पायबंद कोणी लावायचा ? मॉण्टफर्ड रिर्फार्म्सची नावे कायदे कौन्सिले सुरू होणाच्या सुमारास तर ब्राम्हणेतर पक्षात भयंकर उत्पात माजले. मराठा-मराठेतर भेदाचा पाया याच वेळी भक्कम पडला. मराठे याच वेळेपासून स्वजातिवर्चस्वाची भाषा विशेष अट्टाहासाने बोलू लागले आणि राष्ट्रवीर सारखी मराठ्यांची जबाबदार वृत्तपत्रे मराठेतर उघड उघड धमक्या देऊ लागली. ब्राम्हणेतर चळवळीची दिशा जातिभेदाच्या ठोकरीमुळे अजीबात बददली. कोणशीलदा-या, दिवाणीगि-या आणि सरकारी नोक-या आणि त्याहि लोकसंख्येच्या प्रमाणात-लायकीच्या नव्हे ! - खास मराठ्याना मिळाव्या, एवढ्याच क्षुद्र बिंदूवर ब्राम्हणेतर चळवळीची भिंगरी येऊन गरगरू लागली. मागासलेले पडले खेड्यात. बरेचसे शहरी गिरण्यांच्या वेढ्यात, शेतकरी भटभटेतर सावकारांच्या चक्रवाढी तेढ्यात, आणि ब्राम्हणेतर मराठे पुढारी कोणशीलदा-या दिवाणीच्या पटकविणा-या तिरंगी चौरंगी लढ्यात ! बिचा-या अस्पृश्यांची मात्र कोणीच दाद घेईना. चळवळीच्या सुरूवातीला अन ब्राम्हणेतर चळवळीने आपल्या मराठाशाही मदाच्या धुंदीत भावी लोकशाहीच्या- शेतक-यांच्या स्वराज्याच्या-मूळतत्वाला घातक अशा एका महापातकाला नव्यानेच जन्म दिला आहे. आजपर्यंत शेतक-याला मातीला मिळवणा-या अनेक व्यसनांच्या बाज्या उत्पन्न झाल्या. पण ही नवीन बाजी त्या सर्वांवर ताण करून शेतकरी स्वराज्याच्या योजनेची भ्रूणहत्या केल्यावाचून राहणार नाही. ही नव्या पातकाची नवी बाजी म्हणजे इलेकशनी व्होटबाजी ही होय. उमेदवार लोक पक्षाच्या आणि पार्ट्यांच्या पुण्याईवर बाह्यतः कितीहि नाचत बागडत असले, तरी एकमेकावर चुरशीची सरशी करण्यासाठी रोख रुपयांचे लांच देऊन मते विकत घेत असतात. लांच

देण्याघेण्याबाबद सरकारी कायद्याचा दिमाख कितीहि कडक असला, तरी एकादे वेळी मोंटे चोर पकडला जातो, पण खाटें जार पकडण्याचे काम फार कठीण असते. आधीच शेकरी निरक्षर आणि अडाणी. आपल्यासा नवीन सरकारी कायद्याप्रमाणे मिळालेल्या मतांचे महत्व काय आहे, हे त्याला नीटसे उमगत नाही.

राजकारणात शेतक-यांचे महत्व काय आहे, याची वास्तविक कल्पना आजपर्यंत कोणीहि-ब्राम्हणेतरी बृहस्पतीनीहि-त्याला कधी करून दिली नाही. अशा अवस्थेच पैसे घेऊन मते विकण्याचे व्यसन शेतक-यांत फैलावणे किती घातक आहे, याचा प्रत्येक राष्ट्रहितेच्छूने विवंचनेत विचार केली पाहिजे. इलेक्शनच्या हंगामात गावोगावच्या मतदारांची मते खरेदी करून ठेवणारे कित्येक एजण्ट आज मुखवस्तू म्हणून मिरवत असतात. तर मते विकणा-या खेडवळाना इलेक्शनी हंगाम किती कचकचीत फायद्याचा होच असेल, याची कल्पना केलेली बरी. एक दोन जिल्ह्यातली कौन्सिल इलेक्शने खास माझ्या नजरेखाली झडलेली आहेत. प्रत्येक उमेदवाराने चाळीस चाळीस पन्नास पन्नास हजार रुपयांची उधळपट्टी काल्याचे मी पाहिले आहे. प्रत्यक्ष पोलिंग स्टेशनच्या आसपास शेतकरी मतदारांच्या टोळ्याच्या टोळ्या, एकेका गावदादाच्या म्होरक्यापणाखाली येऊन बसतात. नंतर हे गावदादा सर्व उमेदवारांच्या एजण्टांजवळ मतांचा भाव अंदाजीत फिरतात. ज्याची बीट जास्त, त्याला त्या टोळीची मते देऊन भरल्या खिशाने परत जातात. प्रत्यक्ष मतदार मुबलक दारू पाजली कीं ते खूष होतात. मतदाराना शिंदीची दारू न् गावदादाला चांदीचा वारू मते विकण्याचे व्यसन शेतक-यांत फैलावल्यामुळे, बुद्धिमान, कर्तबगार, लायक परंतु पैशाने दुबळ्या असणा-या कोणत्याहि मनुष्याला कौन्सिलात शिरण्याचा मार्ग कायमचा बंद होऊन बसला आहे. इलेक्शने म्हणजे पाण्यासारख्या पैशाचा खेळ झाल्यामुळे, कौन्सिले म्हणजे श्रीमंत नालायकांच्या त्रैवार्षिक जहागिरदा-या कां न बनाव्या ? तात्पर्य, इलेक्शनी व्होटबाजीचे हे महापातक शेतक-यांच्या भावी उत्कर्षाला ठार मारणारे असल्यामुळे, शेतक-यांच्या हितवाद्यानी आणि विशेषतः सरकारने त्याला मुळातच छाटण्याचे पुण्य मिळवावे, अशी हात जोडून प्रार्थना आहे. सरकारने गुप्तपोलिसांच् हिन्दुस्थानाएवढा पांजरपोळा पोसलेला आहे. इलेक्शनच्या दिवशी प्रत्येक पोलींग स्टशनवर त्यातले काही पोळ सोडले, तर शेतकरी मतदाराना राजकारणी व्यभिचाराची चटक लावणारे जार खाटें पकडले जाण्याचा बराच संभव आहे. मागासलेल्या खेडवळ शेतकरी जनतेला साक्षरतेचा परीस लाऊन. तिची सुप्त आत्मशक्ती जागृत करण्यासाठी धडपडणारी ब्राम्हणेतर चळवळ सध्या इंद्रधनुष्याप्रमाणे झालेली आहे. तिचा खरा रंग कोणाता. हे खुद्द पुढा-यानाच उमगेनासे झाले आहे. या पार्टीला घटना नाही. शिस्त नाही. म्हणून प्रत्येक जबाबदार पुढारी वृत्तपत्रांत बोंब ठोंकीत आहे. पण बेशिस्तिच्या पापाचा वाटा स्वतःकडेच येतो, हो मात्र एकाहि शंखाच्या लक्ष्यात येत नाही. या चळवळीला कोणी जबाबदार कर्णधारच नसल्यामुळे हिचे रंग दरघडीला सरड्याप्रमाणे बदलत आहेत. प्रथमतः हिचा उमग भिक्षुक वर्चस्वाला हाणून यच्चावत् ब्राम्हणेतर जातींचे सामाजिक व धार्मिक स्वातंत्र्य प्रस्थापित करण्यासाठी झाला. नेतर त्यात मराठा-मराठेतर भेद उघड झाला.

मराठा-मराठेतरानी अस्पृश्यांची काहीच बूज न राखल्यामुळे ब्राम्हणतेर संघातून अस्पृश्यवर्ग दूर फटकला. या पुढची पायरी म्हणजे, एकजातीय मराठ्यांचे वर्चस्व अचानक कोणी मान्य करणार नाही, म्हणून खुद्द ब्राम्हणेतरांतच पुढारलेले आणि मागासलेले असा ठळक भेद करून, या चळवळीला शुद्ध राजकारणी रूप द्यावयाचे आणि सामाजिक धार्मिक प्रश्नाना माजी टाकावयाचे ही राजकारणातही बहुजन हितवादाची व्यापकता नाहीं. शेतक-याच्या अभ्युदयाची विवंचना नाही. त्याच्या परिस्थितीचा

अभ्यास नाही. संकटाच्या आणि अडचणीच्या तपशीलाची चिकित्सा नाही. काही नाही. मागासलेल्या वर्गांपैकी विशेष जाकरूक अशा समाजाला, त्याच्या अफाट लोसंख्येच्या प्रमाणात ( बौद्धिक लायकीच्या नव्हे ! ) सरकारी नेक-यांचे रुपेरी तोवरे मिळाले, म्युनिसिपालटीच्या, लोकल-बोर्डे, कौन्सिले, असेंब्ली वगैरे संस्थात मराठा जातीचे कच्चे पक्के भले बुरे बरेचसे प्रतिनिधी गेले, की या ब्राम्हणेतर राजकारणाची भूक शमणार. सरकारी नोक-यांची या जातीवर मनमुराद खैरात होताच, त्यांची व इतर सर्व तत्सम मागासलेल्या वर्गांची सर्वांगीण उन्नती होणार, सरकारी नोक-या हाच काय तो मोक्ष, असे ब्राम्हणेतर नावाची चळवळ करणा-या मराठा पुढा-याना वाटत आहे. उन्नतीच्या मार्गात चळवळीचे घोडे कोठे जर अडखळत असेल, तर ते येथेच. सांजिक सुधारणा, धार्मिक स्वातंत्र्य, बौद्धिक परिणति [ आर्थिक प्रश्नांची दाद अझून कोणालाच नाही.] वगैरे चट सा-या गोष्टी सरकारी नोक-यांच्या खैरातीची सक्षिणीची कांडी फिरताच चुटकी सरशा घडून सेतील, या कल्पनेत ते दंग झाल्यामुळे, त्यानी ब्राम्हणेतर चळवळीचे निशाण आता फक्त सरकारी नोक-यांच्या प्राप्तीवर रोखून धरले आहे.

सध्याच्या ब्राम्हणेतर चळवळीचे एवढेच ध्येय आहे, आणि मराठा तरुणांपुढे हेच ठेवण्यात येत आहे. नरपति हितकर्ता द्वेष्यतां याति लोके । जनपत हितकर्ता त्यज्यते पार्थिवेन ।। इति महति विरोधे विद्यमाने समाने । नृपति जनपदांना दुर्लभः कार्य़कर्ता ।। याचा अर्थ एवढाच कीं, जो इमानी सरकार-सेवक तो इमानी जनसेवक राहू शकत नाही आणि जो इमानी जनसेवक तो सरकारला प्रिय असत नाही. शासित शास्त्याना समानप्रिय असा प्राणी सशाच्या शिंगाइतकाच दुर्मिळ आतापर्यंत ब्राम्हणेतर चळवळीत पुढाकार घेणा-या मराठ्यानी जनसेवेचे तर खूपच अवसाने आणले होते. विशेषतः कै. राजर्षि शाहूछत्रपतींच्या अमदानीत सरकारी नोक-यांचे भडाभड राजीनामे देऊन ब्राम्हणेतर चळवळीची स्वयंसेवा करण्यासाठी पुष्कळ मराठे वीर मी मी म्हणून मिशांवर पीळ भरीत पुढे सरसावले. कोणी वर्तमानपत्रे सुरू केली, कोणी संघ काढले, कोणी व्याख्यानाची धुमचशक्री चालवली, कोणी ग्रंथमाना काढल्या, असा मारे एकाच घडघडात उडाला ! लोकांना वाटले कीं कोण हे देवदूत अवचित आमच्या उद्धारासाठी अवतीर्ण झाले! शाही महाराजांचा पाठिंबा जाताच मात्र हे सारे स्वयंसेवक बहाद्दर खरेखुरे स्वतःची सेवा करणारे ठरल्याचे उघडकीस आले. कोणी कोल्हापूर दरबारचे मानकरी होऊन बसले. कोणाला ३५ रूपये, कोणाला ५० रूपये असे लहान मोठे पगार मिळू लागले. कोणी तर प्रत्यक्ष नेक-याच पटकावल्या. छलवळ राहिली चळवळीच्या ठिकाणी आणि हे आपल्या स्वर्थाच्या भजनी ! फुरसदीने चार दोन व्याख्याने झोडायला मात्र केव्हाहि ना नाही. आता तर काय ? उघड उघड सरकारी नोक-या हेच या चळवळीचे ध्येय ठरले आहे. या ध्येयाच्या प्राप्तीसाठी मराठे पुढारी आज ब्राम्हणाविरूद्ध तर आदळआपट करीतच आहेत, पण खुद्द ब्राम्हणेतरातीलच पुढारलेल्या अनेक जातींच्या नावाने खडे फोडून ब्राम्हणेतर चळवळ म्हणजे फक्त जातीची चळवळ असे नवीन भाष्य प्रचलीत करीत आहेत. या साध्यासाठी ब्राम्हणेतर चळवळीच्या मूळ ध्येयाचे वाटोळे झाले तरी त्याना आता पर्वा नाही.

ब्राम्हणाना ज्या दुष्कर्मांसाठी मराठे दोष देत आले, त्याच दुष्कर्मात ते आता या चळवळीचा बळी देत आहेत. प्रश्न इतकाच उरतो की, जनसेवेची घमेंड मारणारे हे वीर महावीर सरकारी सेवावृत्तीचे पट्टेदार बनल्यावर जनसेवा व समाजसेवा कशी काय करणार ? ब्राम्हण नोकरशाही रयतेच्या हिताकडे पहात नाही. ब्राम्हण अधिका-यांकडून रयतेला त्रास होतो, न्याय मिळत नाही, जुलूनहि होतो, म्हणून बहुसंख्यांक ब्राम्हणेतर जनतेच्या कळवळ्याचे ब्राम्हणेतर अधिकारी शेकडा ५० ते ७५ प्रमाणात जर सरकारी नोक-यांचे पट्टेदार बनले असतील तर, रयतेची आवादानी होईल, हा एक मुद्दा नोक-

याभिलाषी मराठे पुढारी नेहमी पुढे आणतात. या मुद्यात मनुष्यस्वभावाचे जितके ज्ञान आहे, तितकेच वस्तूस्थितिचेहि आहे. सरकारच्या राज्यकारभाराचा गाडा त्यांच्या ठराविक धोरणाच्या कडक शिस्तीने चालवण्यासाठीच सरकारी नोकरी ही संस्था निर्माण झालेली आहे. राज्यकर्त्यांचे राजकारणी नाटक सूत्रबद्ध व ताणेबंद चालण्यासाठी सरकारी नोक-या या लहानमोठ्या निरनिराळ्या भूमिका आहेत. नाटकातली हरिश्चंद्राची भूमिका वठविताना त्याला स्वप्नात दिलेल्या वचनासाठी राज्यसंन्यास करून सहकुटुंब वनवास कोणाहि व्यक्तीला पाळणेच प्राप्त असते. तसे तो न करील तर आपोआप उखडून जाईल. आजहि ब्राम्हण आणि ब्राम्हणेतर असे दोनहि जातींचे नोकर सरकारी नोकर आहेत. पण दोघांच्या वृत्तीत फारसा फरक नाही. २०-२५ रूपड्या कमावणारा ब्राम्हण कारकून रोज संध्याकाळी कडीसरी फुगवून घरी जातो, आणि ब्राम्हणेतर कारकून दररोज दिगंबर बनतो, असे मुळीच नाही. ८०-९० चा ब्राम्हण सब रजिस्ट्रार दोन तीन वर्षात कोकणात गावी ७–८ हजारांची विष्टेक करतो, आणि कायस्थ प्रभु किंवा मराठा सब रजिस्ट्रार काय कानात तुळशी पत्रे कोंबतो ? कायस्थ किंवा मामलदार मुनसफ बिनबोभाट घरी चालत येणा-या वादी-प्रतिवादी-प्रासादिक कामधेनूच्या प्रसादाने आपल्या बायकोला पिवळी ढवळी करतो आणि मराठा मामलदार रयतेला काय आपले घरदार धुवून देतो ? ब्राम्हण अधिकारी रयतेला वस्त-याच्या धारेवर धरतात, तर ब्राम्हणेतर अधिकारी काय त्यांना बापदेव मानून देव्हा-यात पुजतात ? पाटील पटवा-यादि ब्राम्हणेतराना ब्राम्हण अधिकारी आंगणात तिष्ठत उभे करतात, तर मराठे अधिकारी त्याना झटपट क्षेमालिंगन देऊन आपल्या मांडीवर घेऊम बसतात की काय? न्यायखात्याची गोष्ट घ्या.

कायस्थ व ब्राम्हण न्यायाधिकारी ब्राम्हणेतराना नीट न्याय देत नाहीत, अशी एक बुरखेबाज कुरबूर ऐकू येते. ही कुरबूर कोणी उघड बोलून दाखवो वा न दाखवो, अमक्या तमक्या ठिकाणच्या ब्राम्हण किंवा कायस्थ मामलदाराला बदलून टाका, अशा अर्थाचे ठराव झालेले पुष्कळ लोकाना माहीत आहेत. ब्राम्हण किंवा कायस्थ सारस्वतीदी मामलदार अगर डेप्युटी कलेक्टर अधिकारी सर्वच देवमामलतदार आणि दामाजींपंत असतात असे कोणीहि म्हणणार नाही. परंतु त्यांच्या न्यायान्याय बुद्धिची छाननी च्यांच्या जातीवरून करू पहाणा-या शहाण्याना सरकारी नोकरांच्या जातीची माती कसल्या खाणीची असते हेच कळत नाही असे म्हणावे लागते. एखाद्या खटल्यात ब्राम्हण न्यायधिशाने एखाद्या ब्राम्हणेतर आरोपीला संशयाचा फायदा हि न देता कडक शिक्षा ठोठावली, तर तेथें त्या न्यायाधिशाच्या जातीकडे चटकन् बोट दाखविणा-याला कोणी झाला. करी हाच प्रश्न विचारला कीं त्या ठिकाणी ब्राम्हणाच्या ऐवजी एकदा इरसाल मराठा न्यायाधिश असता, आणि त्याने आरोपीच्या जातीचा मुद्दाच तेवढा विचारात घेउन त्याला दोषमुक्त केले, तर त्यात त्याची जातिहितबुद्धि दाखाणावयची का न्यायबुद्धीचा व्यभिचार निंदावयाचा ? सारंश, सरकारी नोकरीवाले जन्मतः कोणत्याही जातीचे असले तरी ते सरकारी इमानी अधिकारी बनताच त्यांची एक निराळीच जात बनते. एकदा रजिस्ट्रार मामलतदार किंवा डेप्युटी कलेक्टर माठाच्या भाजीच्या जुडीपासून तो थेट व्हिस्किच्या पिंपापर्यंत भक्तजनांचा प्रसाद डोळे मिटून जो मटकावतो, तो ब्राम्हण, मी कायस्थ, मी मराठा या कल्पनेने मुळींच नव्हे. अधिकारी बनला कीं या सर्व भल्याबु-या मटकावण्यांचा मटक्यांची उसळ त्यावर उसळतच येते. जन्मप्राप्त जातिहिताच्या धोरणाने सरकारी नोकरी बजावणारा माणूस नोकरीप्राप्त जातीच्या चरकात खड्यासारखा उखडून पडल्याची उदाहरणे पुष्कळ आहेत. तात्पर्य, जनहितवाद्याने सरकारहिताचे सोंग आणणे आणि सरकारी नोकराने जनहितवादाची किंवा जातिहितवादाची मिजास मारणे, या दोनहि गोष्टी अशक्य, अतएव ढोंगीपणाच्या होत.

सरकारी नोक-यात सर्व जागा भरगच्च भरून आपल्या विवक्षित समाजांचा यर्वांगीण आत्मोद्धार करण्याची शेखी मिरवणारे पुढारी लोक कसल्या शेणामेणाचे पुतळे असतात आणि नोक-यांच्या हुलकावण्या दाखवून ते आपल्या समाजबांधवांच्या जागृतीचा आपल्या स्वतःच्या हळद कुंकवासाठी कसा उपयोग करून घेतात, याची स्पष्ट जाणीव शेतक-यांना होणे शेतक-यांच्या स्वराज्याच्या चळवळीला अत्यंत जरूरीचे आहे. प्रश्न हा उरतो कीं सरकारी कुत्तेगिरीचे पट्टे गळ्यात अडकविल्यानंतर हे श्वानवृत्तीचे समाज आपला सामाजिक आत्मोद्धार करून स्वराज्याला पात्र कसे होणार ? इंग्रेजी राज्यासत्तेचे वर्म जर सेक्रेटरीयटच्या कारकुंड्या खरडेघाशीत साठविलेले असते, तर मराठ्यादि ब्राम्हणेतरांपेक्षा चाणाक्य बुद्धीत केव्हाही शतपट प्रविण असणा-या ब्राम्हण–पुत्रानी या पूर्वीच त्या वर्माचे मर्म आपल्या निसर्गजात कारकुण्या कौशल्याने हस्तगत केले असते. मारुतीचे वर्म त्याच्या शेपटात होते कीं टाळक्यात होते, हा प्रश्न आज फारसा महत्वाचा नसला, तरी इंग्रेजांच्या हिन्दुस्थानावरील राज्यसत्तेचे वर्म त्यांच्या चिटणिशी दफ्तरात मात्र खास नाही. वेळ पजली तर दिल्लीच्या कागदी वावड्यांच्या किल्ल्या इंग्रेज सरकार भर्रदिशा हिन्दी कारकुण्ड्या चळवळ्यांच्या स्वाधीन करील, आणि म्हणेल कीं घ्या हे तुमचे स्वराज्य. राजकीय वर्चस्व हे मुळी इंग्रेजी सत्तेचे साध्यच नव्हे. ते साधन आहे. उघड उघड इंग्रेज लोक म्हणजे बनिये आहेत. व्यापारी आहेत. तागडीचे उपासक आहेत. त्यांया तागडीच्या वर्चस्वासाठी तलवारीचा आणि लेखणीचा नाइलाज म्हणून त्याना पुरस्कार करावा लागतो. इंग्रेज म्हणजे तागडी आणि तागडी म्हणचे इंग्रेज, अशीहि परिभाषा अमलात यायला आता फारसा अवधी लागणार नाही. तोंडाळ व लेखाळ हिंदी लोकानी काही भयेकर सत्याग्रही अत्याचार केला तर लेखणीचे स्वराज्य त्याच्या गळ्यात डकवायला धोरणी तागडीतुकप्पा आंग्रेज बहाद्दर मुळीच मागेपुढे पाहणार नाहीत, आणि नुसते खरडेघाशीचे स्वराज्य चालवायला जर खास शिवाजीचे मराठेच पुढे येत असतील, तर ती देखिल आंग्रेजाना एक इष्टापत्तीच होईल.

केवळ लेखणीच्या टोकावर वैयक्तिक सामाजिक आणि राष्ट्रीय जीवनाची मान लटकविणारांची संख्या हिन्दुस्थानात जितकी वाढेल, तितके आंग्रेजी तागडीला फायदेशीरच आहे. लेखणीच्या कुरकुरीवर जान कुरबान करायला निघालेल्या क्षत्रिय मराठ्यादि शेतकरी समाजानी शेतकी सारखा अर्थधनोप्तादक धंदा लाथाडला, तरी तिकडे दयाळू आंग्रेज सरकारला दुर्लक्ष्य करून भागणार नाही. हिन्दुस्थानासारख्या शेतकीप्रधान महाखण्डाची शेती नापिक राहू देण्याइतके आंग्रेज बहाद्दर नापित खास नव्हत. कारकुण्डेगिरीच्या बेसुमार पैदासीमुळे, जर हिन्दी शेती ओसाड पडेल, तर विलायतेच्या भुकेबंगाल टॉमींच्या फलटणी येथे आणून त्यांच्याकडून शेतकीची निगा राखण्याचे काम त्याना नाइलाज म्हणून हाती घ्यावेच लागेल. भडोच ब-हाड खानदेशातल्या हिंदी कापूस-पिकव्यांकडून आंग्रेजी व्यापाराच्या तागडीचे पारडे मनपसंत झुकत नाही, म्हणून सक्कर धरणाचा पाया घालून, तेथे दयाळू आंग्रेजी व्यापा-याना लांब धाग्याचा कापूस पिकवण्याच्या सोयीची योजना सरकारला नाइलाजाने करून देणे भाग पडलेच ना ? सगळेच शहाणे हिनदी लोक जर ज्ञानयोगाचे ज्ञानेश्वर बनले, तर मनगट घासून धनोप्तादन धंदे करणा-या विलायती बेरोजगारी कर्मयोग्यांच्या टोळ्या हिन्दुस्थानाच्या कल्याणासाठी येथे आणणे माबाप सरकारला भागच पडेल. त्या दिशेने प्रयत्नांची सुरूवातहि झालेली आहे. शहरी बाण्डगुळ्यांच्या बेगडी वैभवाला भुलून त्यांच्या कारकुण्ड्या जीवनाची नक्कल करण्यास धाधावलेल्या शेतकरीपुत्रांना या शेतकीप्रधान देशातल्या शेतीत जरी माती दिसत असली, तरी त्या मातीचेहि सोने करून त्याने विलायतेला ढवळी पिवळी करण्याची किमिया तागडीबहाद्दर आंग्रेजांना पुरी माहित आहे. अर्थात् देशातील सर्व तरुणांची वृत्ति, विशेषतः शेतकरी समाजांतल्या तरूणांची वृत्ति, जर कारकुंडेगिरीत

रममाण झाली आणि ओसाड पडलेल्या अर्थधनोत्पादक क्षेत्रांवर जर विलायती टोळ्यांच्या टोळधाडी येऊन पडल्या, तर हिन्दी लोकांच्या अधःपाताचा पेला भरून, ते जगातील सा-या तागडीबहाद्दर राष्ट्रांच्या पखाली बहाणारे बैल बनल्याशिवाय खास राहणार नाहीत. अज्ञानी व नाक्षर दशेतून ज्ञानी व साक्षर दशेत येत असलेल्या मराठ्यादि मागासलेल्या शेतकरी समाजाना आज कारकुंडेगिरीचा डोंगर मोठा साजिरा गोजिरा दिसत आहे. ज्याच्या हाती लेखणी, त्याच्या हाती परिसाच्या खाणी, अशी त्यांची भावना झालेली दिसते. निवळ कारकुनीवर जगू पाहणा-या समाजांची स्थिती उप्पर तो और बनी है पण अंदर की बात खुदा जाने. उदाहरणार्थ महाराष्ट्रातला कायस्थ प्रभू समाजच घ्या.

गेली ३०० वर्षे हो समाज प्रामुख्याने कलमबहाद्दर म्हणून प्रसिद्ध आहे. मावळातल्या काही थोड्या घराण्यानी प्रत्यक्ष शेती केली व सध्या करत आहेत. या शेतीची उत्पत्ति त्यांच्या शिवकालीन तलवार-बहाद्दरीतून झालेली आहे. परंतु आंग्रेजी अंमदानीपासून यांची तलवारीची उपासना सुटली, शेतकीहि माजी पडली आणि जगायला फक्त लेखणीचे बोरुचे कांडरू काय ते उरले. कायस्थाची लेखणी हीच त्याचा लाईफ बोय ! अर्थधनोप्तादक दुसरे कसलेहि साधन त्याच्या हिती राहिले नसल्यामुळे, कारकुंडेगिरीच्या बदलत्या रंगाढंगाप्रमाणे विद्यार्जनाचे व पदव्यांचे बदलते रंगढंग करूनच हा समाज आजपर्यंत कसा बसा जगत आलेला आहे. जोपर्यत कारकुनी क्षेत्रात स्पर्धा नव्हती, तोपर्यंत या समाजातील पदवीधर व साधारण चाणाक्ष लोक याना पोटापाण्याची फारशी विवंचना नसे. कारकुनी पुरती अक्कल मिळविली की संसाराच्या गाड्याला चबचबीत वंगण मिळत असे आणि जीवनध्येयाचा क्षितिज-किनारहि हस्तगत होत असे. जीवनसर्वस्वाचे केंद्रीकरण कारकुनी पैशातच सामीवल्यामुळे, अर्थोप्तत्तीचें ल उद्योदधंद्याचे इतर मार्ग या लोकांना अज्जीबात पारखे झाले. पोषाखीपणा भरंसाट वाढल्यामुळे, श्रमसाहसासाठी घासायला मुळी मनगटच शिल्लक उरले नाही. कारकुनी म्हणजे कायस्थाचा जीव. त्या पलिकडे जगात आणखी काही जगण्याचे स्वतंत्र व स्वावलंबी मार्ग आहेत, याविषय़ी त्याची कल्पनाच ठार नेली. महिनाभर लेखणीची कुरकूर करावी आणि पहिल्या तारखेला आण्याचे तिकीट चोपडून मासमुरा घ्यावा व जगावे, यापेक्षा कसलीहि महत्त्वाकांक्षा या जातीत जिवंत उरलेली नाही. कायस्थाचे प्रत्येक पोर कारकुनीच्यच किंकाळ्या मारीत जन्माला येते. पिण्डी ते ब्रम्हाडी। पण ब्रम्हाडातूनच कारकुनीचे उच्चाटन झाले, किंवा कायस्थेतरानीच कारकुनीच्या ब्रम्हाण्डातून स्पर्धेच्या जोरावर कायस्थांचे पद्धतशीर उच्चाटन केले, कीं कारकुनी पिण्डाच्या कायस्थाना प्रतिष्ठित उपासमारीपलिकडे कसला मोक्ष लाभणार ? कायस्थ कारकुनीसाठीच कां धडपडतो ? तर जीवनकलहात टिकाव धरण्यासाठी कारकुनीपेक्षा दुसरी कसलीहि अक्कल त्याच्यापाशी शिल्लक नाही म्हणून. 'इस्कूल फलानेल' झाला, किंवा 'गरजू एड' झाला, तरी कारकुनीच्या कुंपणापर्यंतच या सरड्यांची धाव! जेथे पिण्डच ठेचाळला, तेथे ब्रम्हाण्डात काय आढळणार ? शिवाय, कारकुनीचे वैभव मिठागरातल्या टॅलीक्कार्कपासून कों हुजुर डेप्युटी कलेक्टरापर्यंतचे असले, तरी अर्थप्राप्तीचे प्रमाण काम तसा दाम असल्या ठराविक मानाचेच असणार. कारकुनाची कारकुनी व स्वतः कारकुन जिवंत आहे तोपर्यंत महिना गेला वर्षे गेली पगार वाजे खणाणा । नोकरि जाता, स्वतःच मरता, कुटुंब करते ठणाणा ।। अशीच परिस्थिती शेकडा ९० कुटुंबाची झालेली आहे.

शेतकी किंवा इतर स्वतंत्र उद्योगधंदा करणारे लोक दुर्गादेवी दुष्काळाच्या तुफानात सापडले तरी त्यांची कळण्या कोंड्यावर जगण्याची हिमत असते. परंतु ठराविक तनख्यावर जगणारा कारकुन वर्ग तनखा नसला तर सुबत्तेच्या दिवसातच भिकेला लागतो. कारकुनी पेशाचा दुसरा भयंकर दोष म्हणजे ठरावीक

कामाचा ठराविक दाम घेण्याची सवय किंवा सवलत हाडीमासी खिळल्यामुळे, साहस धडाडी महत्त्वाकांक्षा काटकपणा स्वार्थत्यागबुद्धी इत्यादि आत्मोन्नतिपोषक गुणांचा या वर्गात खडखडाट होतो. अर्थात् असल्या बिनसाहसी अल्पसंतुष्ट मानवपुत्रांची संख्या राष्ट्रात वाढविणे, हे अखंड गुलामगिरीचेच चिन्ह होय. असा अवस्थेत, अर्थोप्तादक स्वतंत्र उद्योगधंद्याकडे आणि विशेषतः शेतीकडे तरुणांची मने वळविण्यऐवजी त्याना कारकुनी पेशाचे व्यसन लावणारानी आपल्या आत्मघातकी चळवळीचा नीट विचार करावा. प्रकरण ७ वे. शेतकरी स्वराज्याचे नवचैतन्य. "राजकीय सुधारणा झाली म्हणजे सर्व इतर सुधारणा आपोआप होतील, या गोंडस तत्वावर प्रबोधनाचा मुळीच विश्र्वास नाही. सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रे गुलामगिरीचिया आचारविचारांनी चिडचिडलेली; बौध्दिक क्षेत्रांत जाणतेपणाचा मक्ता मूठभर सुशिक्षितांच्या हाती, बाकी सर्वत्र अज्ञानाची अमावास्येची काळीकुट्ट रात्र; औद्योगिक चतुराई ठार मेल्यामुळे आर्थिक बाबतीत सर्वत्र पसरलेले दैन्य आणि दास्य; अशा विचित्र परिस्थितीत राजकीय स्वातंत्र्याची अपेक्षा म्हणजे राजकारणी जुगार खेळणा-या जुगारुंची सट्टेबाजी होय. अर्थात् या जुगारांत येनकेन प्रकारेण हिन्दुस्थानच्या स्वराज्याचे तट्टू यदाकदाचित् जिंकलेच, तर ती स्वराज्याची लाटरी म्हणजे मूठभर मोठ्या माशांना बाकीच्या अनंत धाकटया मासोळ्यांना बिगर परवाना गिळण्याचा सनदपट्टाच होय." ---प्रबोधन ( ता १६ ऑक्टोबर १९२१ ) हिन्दुस्थान सध्या अनेक रंगांच्या चलवळी जोरजोराने चालू आहेत. निर्भेळ राष्ट्रस्वातंत्र्याच्या कल्पनेपासून तो प्रत्येक व्यक्तीला आंतर्राष्ट्रीय इभ्रतीचा दर्जा मिळण्याइतक्या आत्मशुध्दापर्यंतच्या खटपटी सर्वत्र जोराने चालल्या आहेत. जवमतवादी समाजसुधारकांचा अनिर्वाच्य छळ करणा-या जीर्णमतवाद्यांच्या छावण्या आज त्याच नवमतवादी सुधारणांचा अट्टहास करीत आहेत. पण त्या सर्वांत एक मोठा ठळक दोष दिसून येतो. सर्व चळवळी परस्परांवलंबी नसून, एकमेकांपासून सुतक्या अलग व फटकून चालतात. चळवळ उत्पन्न झाली कीं तिचा स्वतंत्र ग्रूप-एक निराळीच जात बनते. अखिल भारतीय विशेषणाच्या संघांचा व्याप आणि सहकार्याचे क्षेत्र सुध्दा त्याच्या पाच पन्नास मेंबरांपलीकडे जात नाही. प्रत्येक संघ वृत्तपत्री लेखाळपणाने आसेतुहिमाचल कार्यक्रमाची मिजास कितीहि मारीत असला, तरी त्याच्या जन्मग्रामात सुध्दा त्याच्या अस्तित्वाची कोणाला दाद लागत नाही. राष्ट्रीयत्वाची अंडी उबविणा-या नॅशनल कॉंग्रेसच्या खुराडयात हिन्दु-मुसलमान द्वैताचा धिंगाणा. हिन्दु–संघटणाच्या पत्रावळीवर ब्राम्हणी वर्चस्वाचा खरकटवाडा.

शुध्दीच्या चळवळीत नव्या नव्या जाती निर्माण करून हिन्दु चातुर्वर्ण्यांचे षोडशवर्णी भटी वरण ढवळण्याच्या कारवाया. यूथलीग पहावी तों त्यात गो-या कोहळ्यांचा उबारा आणि राळ्या कच्चा कै-यांची आढी. मुख्य लक्ष्यात ठेवण्याचा मुद्दा हाच कीं, हिन्दुस्थानातल्या चळवळीत एकसूत्रतेचा पूर्ण अभाव असल्यामुळे, दोरा तुटलेल्या माळेच्या मण्याप्रमाणे चळवळी पुष्कळ, कार्य पूज्य असा माथेफिरू प्रकार गेली ३० वर्षे हिन्दुस्थानभर चालला आहे. कोणाचा कोणाशी मेळ नाहीं. कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नाही. सर्व चळवळीना एकतंत्री शिस्तीत नियंत्रण करणारी शक्तीच मुळी जेथे न्रमाण झालेली नाही किंवा केलेली नाही, तेथे हव्या त्या भोजनभाऊने उठावे आणि आपल्या राहत्या खुराडयात ममता संघ थापावे, असा हलकट पोरकटपणा हेच सध्याचे 'राष्ट्रीय' चैतन्य आहे. सर्व चळवळींचा धुमाकूळ मुंबई–पुण्यासारख्या शहरांत. वृत्तपत्रांची पैदास आणि मागतां येइ ना भीक तर एडीटरकी शीक एवढ्याच पुण्याईच्या पुण्यश्लोक पाप्यांच्या पितरांची एडीटरी मुत्सद्देगिरी फक्त शहरात. खेडयांची आणि खेडवळांची आठवण चुकूनसुध्दा आजपर्यंत कोणाला झाली नाही. त्यांचे ज्ञानच कोणाला नाही. खेडवळ शेतकरी म्हणजे शूद्र. शूद्रासारख्या क्षुद्राची पर्वा ब्राम्हणादि पांडरपेश्या ज्ञानेश्र्वरांनी काय म्हणून बाळगावी ? वृत्तपत्री कालमांच्या खर्डेघाशीने ब्रिटीश सरकारला वंगविण्याचा चंग बांधणा-या शहरी

वृहस्पतीना नांगरगट्ट्या शेतक-यांच्या संघशक्तीच्या पाठबळाची काय म्हणून जरूर असावी ? सर्व राष्ट्राच्या प्रतिनिधित्वाच्या मळवटाने मिरविणा-या नॅशनल कॉंग्रेसला जर गेल्या ४५ वर्षांत शेतक-यांच्या सुखदु:खाचा सु ओला ढेकर आला नाही, तर कॉंग्रेसच्या नावावर हवा तो शहरी धुडगूस घालून फण्डगुण्डीच्या पुण्याईवर जगणा-या शहरी जळवांनी शेतक-यांची 'शूद्र' म्हणून होटाळणी केली, तर त्यात आश्र्चर्य मानण्याचे कारण नाही. पण आता शेतक-याच्या शेतकीला ऊर्ध्व लागल्यामुळे, आणि शहरी शहाण्यांच्या पोटापर्यंत पोटाच्या बण्डाच्या आगीची झळ पोचल्यामुळे, त्यांच्या पांढ-या डोळ्यांच्या पंढरीची यात्रा आता खेडयापाड्यांकडे वळू लागली आहे.

शूद्र किंवा क्षुद्र समजल्या गेलेल्या शेतकरी कामगार मजूर हमाल पाटीवाला, काय वाटेल ते नाव द्या, या लोकांच्या संघशक्तिने आपापली हत्यारे खाली ठेवताच त्यांच्या संपाच्या झंजावाताने शहरी शहाण्यांचे शहरी अस्तित्व कसे क्षुद्र ठरते, याचेहि दाखले आता शहरोशहरी हरहमेश प्रत्ययाला येत आहेत. शहरांच्या शहरी भपक्याचा मूळ उगम शेतक-याया नांगराच्या ऱाळात आहे, ही जाणीव कॉंग्रेसी देशभक्ताना आता थोडथोडी होऊ लागली आहे; आणि कित्येक बेरोजगारी दे भ सध्या खेडी आणि खेडवळ शेतकरी काबीज करण्यासाठी दौ-यावर सारखे फिरत असतात. ब्राम्हणेतर चळवळीने थेट खेडयांच्या मुळाला हात घालून महाराष्ट्रातला अखिल शेतकरी वर्ग गदागदा हालविल्यामुळे, पांढरपेशा भट भटेतर कॉंग्रेसी वारक-यांच्या मोहजाळात शेतकरी मुळीच सापडत नाहीत; उलट, खेडयापाडयात दे भ भटाना झाडू मिळतो, अशी स्पष्ट कबुली बापट नावाच्या एका निस्मीम टिळकभगताने नुकतीच 'केसरी'तून दिल्याचे पुष्कळांच्या स्मरणात असेल. ब्राम्हणेतर चळवळीला विरोध करण्यातच ब्राम्हण्याची शेखी मिरविणा-या इरसाल पुणेरी भटांचा हा अनुभव, भटाळलेल्या भटेतरानी–डोक्यात मेंदु शिल्लक असेल तर–विचार करण्यासारखा आहे. महाराष्ट्राच्या जागृतीसाठी ब्राम्हणेतर चलवळीचीहि आवश्यकता होती, अशा अर्थाचे उद्गार बरेच विवेकी ब्राम्हणहि आता नि:संकोच काढू लागले आहेत. ब्राम्हणेतर चलवळीत कितीहि दोष असले,-आणि कोणत्या चळवळीत दोष नसतात ?-आणि तिच्या पुढा-यांच्या हातून कितीहि चुका झालेल्या असल्या–कॉंग्रेसने 'हिमालयन ब्लण्डर्स' केलेल्या आहेत,--तरी खेडवळ शेतकरी आणि ब्राम्हणेतर चळवळ यांचा परस्पर संबंध, देह आणि आत्मा यासारखा आहे. या चळवळीनेच शेतक-याच्या महिरलेल्या आणि बावरलेल्या वृत्तीत आत्मोध्दाराचे चैतन्य खेळवून त्याला आत्मियत्वाची चटक लावली. शेतक-याला ब्राम्हणेतर चळवळीशिवाय दुसरा परमेश्र्वर नाही. या चळवळीशी बेइमान होऊन, शेटजी भटजीनी उफलेल्या दुस-या कोणत्याहि चळवळीच्या पचनी जर महाराष्ट्रातला शेतकरी पडेल, तर त्याच्या अध:पाताला परमेश्र्वर सुध्दां-जर परमेश्र्वर कोठे असेल तर-थोपवू शकणार नाही. चरख्याच्या पुण्याईवर स्वराज्य कमविणा-या महात्मा गांधीनाहि जेथे ब्राम्हणेतर चळवळीची नालिस्ती करायचा मोह आवरला नाही, तेथे त्यांचे शागीर्द वल्लभभाई पुणेरी भटांच्या गळ्यात गळा घालून "मी शेतक-यांचा 'भंगी' आहे" म्हणून लॅण्ड लीगचे कितीहि फार्स करू लागले, तरी या नाचकी लोकांच्या देगलीला महाराष्टीय शेतक-यानी बळी पडणे, म्हणजे वस्त-याने गळा कापून आपला आत्मघात करून घेण्यासारखे आहे.

महाराष्ट्र म-हाटयांचा आहे. म-हाठयांचा महाराष्ट्र, इंग्रेजांचा समगोत्री आणि समव्यवसायी जो गुजराथ, त्या गुजराथ्याचे पुढारपण केव्हाहि मान्य करणार नाहीत. प्रांतिक विभागण्या करण्यात तागडीतुकाप्पा गुजराथ्यांची शिवाजीच्या महाराष्ट्राबरोबर मोट बांधण्यांत ब्रिटीश बनिया कंपनीची झालेली चूक सुधारण्याचे महाराष्ट्राला मुळीच कारण नाही. महाराष्ट्राचा म-हाठा घीशक्करखाऊ गुजराथ्याचा अनुयायी

बनणार? शिवाजीचा मराठा शेतकरी, रण-छोड-रायजी (युध्दाचे क्षेत्र सोडून पळून जाणा-या) सारख्या आणि तुपाचा शिरा खाणा-या देवाच्या भगताचा भगत बनणार? भांडवलशाहीचा पुरस्कर्ता म्हणून गुजराथेतल्या शेतक-यानी ज्याचा खून पाडला, त्याच्या भावावर शिवाजीचा मराठा शेतकरी विश्र्वास ठेवणार ? इतका बेशरमपणा मराठा शेतकरी खास करणार नाही. शेतकरी म्हटला कीं तो एकजात; मग तो गुजराथी असो, माळवी किरसाण असो, किंवा म-हाठी घाटी कोकण्या असो, पण त्यांच्या अखिल भारतीय संघटनेचा शिस्तवार पाया घालताना, भाषावार प्रांतिक संघ केल्याशिवाय आज गत्यंतरच नाहीं. महाराष्ट्राच्या शेतक-यांच्या आत्मप्रबोधनाचे प्रयत्न करणा-या ब्राम्हणेतर चळवळीला मूठमाती देण्यासाठी आणि तिच्या पुढा-याना सरकारच्या आणि जनतेच्या अवकृपेला पात्र ठरविण्यासाठी, ज्या ज्या पांढरपेश्या भट भटेतरादि बाण्डगुळ्या समाजानी आजपर्यंत भीमप्रयत्न केले, त्यांच्या सरडेशाही रंगपालटीला म-हाठी शेतक-यानी केव्हाहि भुरळता कामा नये. पुण्याच्या ज्या टिळकी भटभटेतरानी धनवडे प्रकरणाचा पराचा कावळा करून, कोल्हापूरच्या छत्रपतीपासून तों थेट टांगेवाल्या म्हादवा पांडवा पर्यंत सर्वांना ‘सावकार’ बनविण्याचा खास डेप्युटेशनी प्रयत्न केला, त्याच केळकरांच्या निशाणाखाली लॅण्डलीगचे ‘कलीग’ ( सहकारी ) म्हणून मिरविण्यास धाधावलेल्या ब्राम्हणेतरी बृहस्पतीना जनाची नसली तरी मनाची तरी लाज किती शिल्लक असेल, याचीच शंका आहे. राष्ट्रकार्य अभेदाने करावे, हे सूत्र ब्राम्हणेतराना शिकवायला भटांच जरूर नाही. अभेद काय, भेद काय, आम्हाला सगळे समजते. स्वदेशाभिमान भटानाच काय तो ठावा, आणि भटेतर कधीच गेले नाहीत त्या गावा, असाहि प्रश्र्न नाही. पण, भटांच्या पगडीपालटाची हमी जेथे ब्रम्हदेवहि घेऊ शकत नाही, त्थे शेतक-यानी त्यांच्याशी सहकार्य करताना आणि त्यांचे कोणत्याहि ब-या वाईट कार्यात पुढारपण पत्करताना, दहाच्या ऐवजी शंभर अंक मोजावे. वाटेल तर जगाचा किंवा आपला अंत होईपर्यंत अंकच मोजीत रहावे.

निदान उजळणी तरी तोंडपाठ होईल, पण पुणेरी टायपाच्या भटांच्या सांसर्गाने अखेर तोंडफाट झाल्याशिवाय मात्र खास राहणार नाही. शेतक-यांच्या जागृतीचे विशेष अभिनंदनीय कार्य बजावलेली ‘ब्राम्हणेतर चळवळ’ आज बर्फाप्रमाणे थिजून गेलेली आहे. तिच्या पूर्वीच्या जलालपणावर शेकडो झब्बूनी आपल्या स्वार्थाचे पापड भाजले आणि आजही उरल्या सुरल्या उष्णतेवर बरेच ब्राम्हणेतर प्राणी आपल्या नकली पुढारपणाचे फाटके कपडे वाळवीत बसले आहेत. ब्राम्हणेतरी मुखपत्रे आणि पुच्छपत्रे जुन्या विधानांचीच लत्करे सध्या धीत बसलेली दिसतात. नवा विचार, नवा कार्यक्रम, नवी धडाडी, संघटणेची नवीन योजना, कोठेच काही नाही. सगळे रेम्येडोक्ये जुनी फाटकी खरडीच घोटीत बसले आहेत. शाहूकालीन् बहुतेक तरूण पदवीधर मराठे पुढारी कोल्हापूर इंदोर बडोद्यासारख्या मराठी संस्थानांच्या चांदीच्या तोबा-यात घुसले. काही मराठेतर उरलो तो ‘मराठेतर’ चळवळीच्या विवंचनेत. फक्त एखादे इलेक्शन आले कीं तेवढ्या पुरती पुढा-यांची पैदास आणि बोंबाबोंब; या पलीकडे ब्राम्हणेतर पक्षाचा सध्या काहीच कार्यक्रम किंवा चळवळ नाही. केवळ साठवणीच्या पाण्याचे शेवाळलेले डबके ! या डबक्यातील सगळी शेवाळ, चिखलांचे गळे, फत्तर मुरमाच्या कप-या, नासकी सडकी लाकडे वगैरे अडगळ साफ उचकून काढणारी आणि घाणेरडे पाणी उपसून काढून मूळ झ-याच्या स्वच्छ जिवंत पाण्याने हौद भरून टाकणारी एक नव्या कार्यक्रमाची जोरदार योजना श्रीयुत जवळकर यानी नुकतीच ब्राम्हणेतर पक्षापुढे ठेविली आहे. जवळकरांचा जोरदार पम्प एकाद्या ठिकाणी लागला म्हणजे मग तो कोणाकोणाची उचकाउचकी आणि उपसाउपशी करील, याचा नेम नाही. ही गोष्ट ब्राम्हणेतर चळवळीच्या वैरी ब्राम्हणांप्रमाणेच अनेक ब्राम्हणेतर झब्बूंच्याहि चांगली परिचयाची आहे. मायर्सच्या सुप्रसिध्द पंपाप्रमाणेच जवळकरांच्या पंपाचा एकदा झपाटा चालू झाला की शेकडो नकली दे भ वर आणि भटेतरी

झब्बूंवर “Take off your Hat” पगडी फेटा टोपू उठाव करण्याचाच प्रसंग येतो. श्रीयुत दिनकरराव जवळकर हे ब्राम्हणेतर कंपूतले लहानातले लहान आणि तरुणातले तरुण शिंगरु आहे. त्यामुळे, वयाने कामगिरीने आणि प्रसिध्दीने जरठ ऊर्फ वृध्द असलेल्या पुष्कळ पंचकल्याणी अबलक घोडयाना या शिंगराने त्यांच्यावर केलेली मात सहसा सहन होत नाही.

पांढ-या काळ्या केसांचा सवतिमत्सर जगाच्या अंतापर्यंत लोकविश्रुत आणि लोकमान्यच राहणार. मात्र या जगाच्या शिंगराने आपल्या तारुण्यप्राप्त तडफडीच्या वाग्लेखन टापानी प्रतिस्पर्ध्यांची जितकी अभिमन्यूप्रमाणे तुफानी दाणादाण उडविलेली आहे, तितकी ब्राम्हणेतर छावणीतल्या एकहि भीष्म द्रोणाने आपल्या लांबलचक आयुष्यात एकदाहि उडविल्याचा दाखला नाहीं. श्री.त जवळकर तरुण आहेत. तारुण्याचे निसर्गसिध्द सर्व गुणदोष त्यांच्या आंगी आहेत. ते विद्यावान् विद्यान् पदवीधर नसले, तरी पदवीधर विद्वानांच्या आंगी सहसा न सापडणारी बुध्दीची कुशाग्रता आणि हवा तो विषय आमूलाग्र चटकन् आकलन करण्याची ग्रहणक्षमता, हाच जवळकरांच्या प्रकृतीचा आणि प्रवृत्तीचा विशेष आहे. ते साधू संत गोसावी किंवा फकीर नाहीत; ते उघड उघड संसारी आहेत. अर्थात् संसारी वृत्तीच्या पिण्डाला चिकटणा-या सर्व स्वार्थापासून ते अलिप्त असण्याचा संभवच नाही. ज्या अर्थी ते उमलते जवान आहेत, त्या अर्थी तारुण्याला साजेशोभेशा छानछोकी डामडौल आणि उच्छृंखलपणा या गोष्टी त्यानी आताच जर आंगाळल्या तोंडाळल्या नाहीत, तर काय रावबहादुर बोल्यां इतके म्हातापण झाल्यावर त्या नुसत्या बोलाव्या ? जवळकर पिढीजात शेतकरी असून, त्यांच्या शेवटचा शेतीचा तुकडा सन १९२५ सालीच गुजर सावकाराच्या भक्ष्यस्थानी पडला. चोराच्या आळंदीचे हे मराठे पाटील. मराठशाहीच्या काळात क्रान्तीच्या तलवारीचा यांच्या पूर्वजांचा फासा जर अंदाजाप्रमाणे हुकमी पडता, तर ‘चोराची आळंदी’ आज ‘सावाची आळंदी’ बनून, जवळकर पाटिलांची जहागिरी म्हणून मिरविली असती ! सावकारी फासात मान अडकलेल्या गरीब शेतकरी पाटलाच्या पोराला कसली शाळा न् कसले शिक्षण ? जगाच्या व्यवहारशाळेतच जवळकरांचे सारं शिक्षण झाले. त्यांच्या विचार-उच्चार-आचाराची घडणी कठोर परिस्थितीच्या घणांच्या घावानीच घडविलेली असल्यामुळे, जवळकरांच्या कोणत्याहि योजनेतला हेमगर्भाचा एकच वळसा, वयोवृध्द ज्ञानवृध्द पुढा-यांच्या काढ्या निकाढयांपेक्षा, विशेष हुकमी आणि रामबाण ठरतो.

विचाराने कोणतेहि कार्य—मग तो आइस्कीमी विवेकवंतांच्या दृष्टीने विधायक असो वा विघातक असो— एकदा हाती घेतले कीं, मग त्यात तळमळत्या हृदयाची जळती कळकळ ओतून ते तडीला न्यायचे, मग असं करताना शेंडी तुटो वा पारंबी तुटे, त्याची पर्वा करायची नाही, एवढयाच भांडवलावर जवळकरांचा जवलकरपणा महाराष्ट्राला परिचित झालेला आहे. अनेक दुढ्ढाचार्य पुढा-यांच्या तागडीत जवळकर कितीहि हलके ठरत असले, तरी जवळकरी मोठेपणा भटानी वाढविला असल्यामुळे, निदान भटाळलेल्या भटेतरानी तरी जवळकर आणि त्यांच्या विवध चळवळी याना क्षुद्र लेखून, आपल्या ब्राम्हण गुरुमावलीच्या अनंत ‘धनवडी’ यातायातीना क्षुद्र ठरविण्याचा क्षुद्रपणा न दाखविण्यातच झाकल्या मुठीची किंमत सव्वालाख राहिल. जवळकरांचे आद्यकल्पनाचातुर्य (Originality) नावाजण्यासारखे आहे. पण त्याना सहकारी लायक मित्र निवडण्याची अक्कलच नेमकी कमी असल्यामुळे, त्यांच्या पुष्कळ लोकहितवादी कल्पना जन्मताच थोडया दिवसानी मरतात. हा शेरा दुस-याहि रीतीने असा मांडता येईल कीं, अनुकूल देशकालाच्या जन्मापूर्वीच जवळकरांच्या कल्पना जन्मास येतात. याचे उदाहरण म्हणजे पुणे शिवाजी मराठा मिशन हे होय. जगातल्या कोणत्याहि मनुष्याला अल्प विधीने ‘मराठा’ जातीत

समाविष्टकरून घ्यायचा, हे या मिशनचे ध्येय होये. हे मिशन पध्दशीर चालू होते, तर शुध्दी संघटणाच्या चळवळीचा प्रश्र्न फार सुटसुटीत सुटला असता. पण नवकोट नारायण तुकोजीराब होळकराच्या अमेरिकन बायडीला हळद-भंडारा चोपडून ‘शुध्द मराठीण’ बनविण्यास धाधावलेल्या मराठा पुढा-यानीच शिवाजी मिशनची मात्र भ्रूणहत्या करून, जवळकरांच्या कल्पनेला वांझोटी ठरविली. सहकारी लायक मित्रांची निवड करण्याची कसोटी जर जवळकराना कधि साधली, तर भविष्यकाळी ते शेतकरी-स्वराज्य-कल्पनेला अभिनंदनीय मूर्त स्वरुप आणतील, यात मुळीच शंका नाही. ‘शेतकरी पक्षा’ चा नुसता आवाज वातावरणात प्रसृत होताच, ‘हे विलायती डोके, हे विलायती डोके’ असा मुंबईच्या एका मटण्या भटाने पुकारा केला. त्याला कोणी झाला तरी पोरसवदाच मानतो. पण ब्राम्हणेतरांतीलच काही भीष्म द्रोणानी पुढचा मागचा काहीच विचार न करता, जवळकर लालभडक कम्युनिष्ट म्हणून आषाढातच फाल्गुन उरकुन घ्यावा, ही विवेकच्युति विचार करण्यासारखी आहे.

‘कम्युनिष्ट’ ही सरकारी शिक्क्याची नवीन दगलबाज (Diplomatic) शिवी जन्माला आली; म्हणून तिचा पहिलाच प्रयोग करून पाहण्याची ही जर निवळ हौस असेल; किंवा तीन शतके स्थानाच्या पिण्ड प्रकृतीचा चिकित्सक अभ्यास करणा-या ब्रिटीश नोकरशाहीच्या मुत्सद्देगिरीच्या ताकातले हे अभिनव नवनीत लागते तरी कसे, इतक्याच मजलीची जर ही जिज्ञासा असेल; अथवा मायबापाने केले टुर्र म्हणून पोरानी केले टुर्र, एवढी माकडी नक्कलच यात असेल, तर झालेल्या प्रकाराला ‘उंः’ या आक्षराच्या लांबीरुंदीचे थडगे पुरे आहे. ‘ब्राम्हणेतर’ चळवळ खास शेतक-यांसाठी, परंतु ‘ब्राम्हणेतर’ नावात मात्र सगळा क्षात्र घोटाळा ! या घोटाळ्यामुळेच आजपर्यंत ध्येयाची निश्र्चिति कोणालाच नीट ठरवता आली नाही आणि आज तर हवा तो लफंगा ‘ब्राम्हणेतर’ शब्दाचा हवा तो अर्थ बसवून, वाटेल तो स्वार्थसाधू धुडगूस घालीत बसलेला आहे. या बेबंदशाहीला यापूर्वीच कोणीतरी पायबंद लावणे जरूरीचे होते. पुढारी जर थंडगार पडले, तर त्याना उचकून देऊन नवीन पुढारमंडळ निवडण्याचा अधिकार अनुयायांचा असतो. परंतु आमच्या शेतक-यांची इतकी तयारी झालेली नसल्यामुळेच, शेंदूर फासून येईल तो म्हसोबा ते निमूटपणे मान्य करीत असतात. पुढा-यांच्या हलगर्जीपणामुळे चळवळीत जर राम उरला नसेल, तर पुढा-याना रामराम ठोकून चळवळीत राम तरी आणला पाहिजे, अथवा चळवळीलाच राम तरी म्हणायला लावले पाहिजे, याशिवाय अनुयायाना तिसरा मार्गच नाही. ‘ब्राम्हणेतर पक्ष सुधारा नाहीतर मरा’ (Mend or end) असा सडेतोड सवाल श्रीयुत जवळकरानी पक्षाच्या पुढा-यांपुढे टाकण्यात लक्षावधि शेतक-यांच्या वतीने वकिली केली आहे. शेतक-याना बोलता येत नाही, म्हणून शेतकरी पिण्डाचे जवळकर त्यांच्यासाठी बोलत आहेत. जवळकरी योजना निर्दोष नाही. पण तिच्यात जोम आहे, कार्यक्रमाची नवी धडाडी आहे आणि भावी शेतकरी स्वराज्याच्या कल्पनेचे अमर्त्य तत्व त्यात धमधमत आहे. योजनेचा बरावाईटपणा व्यक्तीकडे पाहून ठरविणे मूर्खपणाचे आहे.

बालादपि सुभाषितं ग्राह्यम् न्यायाने जवळकरांचे अल्पवय दृष्टीआड करून, त्यांच्या योजनेतील तत्वांचा भारदस्तपणा व दूरवर पोहचणारे परिणामच विचारात घेणे अगत्याचे आहे. मायबाप सरकार काय म्हणते; नोकरशाहीच्या डोळ्यांवर सध्या कोणत्या रंगाचा चष्मा चढला आहे; लोकमान्यता आणि राजमान्यता या दोनहि टेबलांवर माझे बस्तान नीट बसेल कीं नाही; ‘मुणशिपाल्टी’ आणि ‘कोणशीळ’ला मी मुकलो किंवा हुकलो, तर गावात माझी किंमत किती गंडे चढेल उतरेल; असल्या विचारांचा विवेकसिंधु ढवळणा-या ढवळ्या पवळ्यांची ढब्बुशाही पहिल्याच सलामीला नेस्तनाबूद करणा-या जवळकरी योजनेचे विरोधक कोण कोण आहेत, तिकडे शेतक-यानी नीट लक्ष दिल्यास, त्याना आपल्या

शत्रू मित्रांची पारख डोके न खाजवितािह लवकरच करता येईल. जवलकरांची शेतकरी पक्षाची योजना गेल्या २-३ वर्‍ात त्यांच्या विचारविनिमयाच्या आणि आंदोलनाचा परिपाक आहे. मी पुण्यास असताना या विषयावर माझ्याबरोबर त्यानी अनेक वेळा खल केलेला आहे. कोणतीहि सुधारणा घडवून आणावयाची तर तेवढयासाठी परदेशी चळवळीची किंवा तत्वांची नुसती नाटकी नक्कल न करता, हिन्दू समाजांच्या पिण्डप्रकृतीचा खोलवर विचार करून, ती त्याना सहजपणे कोणत्या रीतिरुपात उत्क्रान्त करता येईल; उत्क्रान्तीच्या मार्गातले आणि निकटचे प्रतिस्पर्धी कोण आणि अडचणी कोणत्या; आणि त्या दूर करण्याचे अथवा कायम चेचण्याचे उपाय कोणते; इत्यादि साधक बाधक गोष्टींचा दूरवर विचार करूनच जवळकर आपल्या योजनेने ब्राम्हणेतर पक्षाच्या गारठलेल्या देहात नवचैतन्याचा उबारा आणण्याचा प्रयत्न करीत आहेत. हिन्दी शेतकरी ‘भाकरी भाकरी’ करून मरत असता, इंग्रेज सरकारच्या कारकुण्ड्या ‘बामनेतरी’ शंखांच्या मूर्खपणाला पायबंद ठोकायला शेतकरी स्वत:च सर्वसमर्थ व्हावा, आणि शेतक-याचा उध्दार सामाजिक धार्मिक किंवा राजकारणी फोल ठरलेल्या बोलात नसून अर्धी भाकरी दरएकाला । नंतर श्रीमंता पोळी ।। असल्या आर्थिक क्रांतीच्या चकमकीत हे, हे अखिल भारतीय शेतक-याना सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट दिसावे, एवढीच योजनेची मुख्य विवंचना आहे. हिन्दुस्थानाचा शेतकरी आपल्या पिढीजात नांगराला पारखा होऊ नये, मातीतून सोने काढणारा हा जगप्रसिध्द हिन्दी किमयागार शेतीला मुकून मजुरीच्या मोहाने मायदेशाला मुकू नये; आणि ‘शेतकरी सुखी तर राष्ट्र सुखी’ ही गोल्डस्मिथची उक्ती प्रत्यक्ष वस्तुस्थितीत उतरून, या शेतकीप्रधान भरतखण्डाचे स्वराज्य शेतक-यांच्या खास हुकमतीनेच चालावे, यापेक्षा अन्य कसलाहि कटाक्ष जवळकरी योजनेत होत नाही.

गोम्याचे अमृत सोन्याला विष ठरत असते. हा मानवी स्वभावाचा धर्मच आहे. शेतक-याला आरपार पोखरून त्याचा खोका बनविणा-या लहान मोठ्या खास देशी जळवांची सांगड, त्याच्या चंद्रमौळी झोपडीत वित्य घुसणा-या पंचागपण्डित जोशी पाटील कुलकर्ण्यापासून तों त्याच्या भाईबंध पुरूष बायकाना गिरण्याच्या व कारखान्यांच्या मजुरीत मळणा-या भांडवल्यांपर्यंत, एकसारखी बिनतोड लागलेली आहे. त्याच्या गळ्याला लागलेल्या सावकारी फासाचे धागेदोरे उकलण्याचे एकादे कमिशन सरकारनेच नेमून पहावे, म्हणजे त्यात कोणकोणत्या वर्गाचे वीरपीर असतात, त्याचा तेव्हाच छडा लागेल. मारवाडी गुजर पठाण आणि ब्राम्हण हे तर उघडउघड सावकारीचे कर्मयोगी. हवे प्रमाणे त्यांचा संचार सर्वत्र असतोच. पण या महात्म्यांशिवाय शेकडो भट भटेतर वकील मामलतदार मुनसफ सबरजिष्ट्रार पाटील तलाठी इत्यादि बाण्डगुळ्या मध्यम वर्गाचे प्राणी सुध्दा शेतक-यांवर चरताना आढळतील. खुद्द ब्राम्हणेतर पक्षाच्या पुढा-यांच्या फलटणीतहि शेतक-यंच्या सावकारीवर जगणा-या भांडवलशाही श्रीमंत जळवा अनेक आहेत. जवळकरी योजनेच्या पम्पाच्या सोसाट्याचा पहिला सपाटा सावकारशाहीच्या उच्चाटनावरच आघात करणारा असल्यामुळे, केवळ श्रीमंताच्या उबा-यावर पुढारपणाच्या स्थानमहात्म्याला चटावलेल्या ब्राम्हणेतरी झब्बूंची दाणादाण उडाली असल्यास नवल नाही. असल्या ब-याच झब्बूंचा ऋणानुबंध आणि सार्वजनिक अस्तित्व माबाप नोकरशाहीच्या कृपाकटाक्षात, नाकातल्या नथीप्रमाणे, अडकलेले असल्याने, त्यांच्या स्वार्थावर जवळकरी योजनेचे रखरखीत निखारे पडल्याबरोबर उडणा-या त्यांच्या भांडवल्या संतापाच्या भडक्याचे भाषांतर राजद्रोह कम्युनिझम बोलशेविझम किंवा आणखी कसल्या तरी मसण्याजव-या ‘झम’मध्ये करण्याविषयी सरकारला चिथवण्याचेहि प्रयत्न होतील. असल्या प्रयत्नांत भिक्षुकशाहीचा भट पिण्डप्रविण असल्यामुळे, लताबाज भट आणि मत्ताबाज भटेतर भांडवल्या यांच्या गंगा यमुनेचा संगम केव्हा तरी कोठल्या तरी

प्रयागावर झाल्याशिवाय राहणार नाही. उध्दरेत् आत्म आत्मानम् स्वत:चा उध्दार स्वत:च करून घ्यावा लागतो, शेती जर राष्ट्राचा प्राण, तर शेतकरी त्या राष्ट्राचा स्वराज्य-सूत्रधार झालाच पाहिजे.

“तेली तांबोळी शेतक-यना कौन्सिलात जाऊन काय नांगर हाकायचे आहेत ?” अशी खेडवळ शेतक-यांची अपमानकारक टिंगल करणा-या टिळकांचे बडवे सुध्दा आज “होमरुल लीगपेक्षा लॅण्डलीग बरी” म्हणून नाटकी कबुल्या देत आहेतय सर्वसमर्थ आणि सर्वभक्षक काळाने ‘हस्तिनापूरच्या साम्राज्यसत्तेची सूत्रे खेळविणारा पटाईत खेळाडू कोण ?’ असा प्रश्न हिन्दुस्थानापुढे टाकून, अनेक प्रबुध्द हिन्दु आणि मुसलमान समाजांच्या परीक्षा घेतल्या आहेत. त्यात सगळे समाज नापास झाले. दिल्लीच्या सार्वभौमत्वाच्या किल्ल्या वैदिक हिन्दु, बौध्द हिन्दु, काबुल्ये पठाण, कंदाहारी मोगल, आणि कडवे रजपूत यांच्या हाती देऊन पाहिल्या. त्यानी आपली नालायकी सिध्द केली. दक्षिणेतल्या म-हठ्याना आणि चित्पावनांसारख्या अवचित ब्राम्हणानाहि साम्राज्य-प्राप्तीच्या वाटेवर उभे केले. त्यानीहि त्या संधीचा डुकरांपुढे मोत्यांची रास असा दुरुपयोग केला. हिन्दी समाज नापास झाल्यावर, सातासमुद्रा पलीकडच्या जंबुव्दीपस्थ गो-या महादेवांची दिल्लीच्या तक्तावर योजना झाली. गेल्या शंभर वर्षात त्यानी आपल्या कदरबाज एकसूत्री राजदण्डाचा अंमल आसेतूहिमाचल बसवून, राजकारणापुरता सबंध हिन्दुस्थान जरी साखळी-सखल केला अकला, तरी त्यांच्या नंदीच्या–नोकरशाहीच्या–मदांध वर्तनाने राजदण्डाच्या पूर्वीच्या ज़िलईला अलीकडे बराच गंज चढलेला आहे. विषेषत: प्रगमनशील काळाच्या अखंड प्रवाहात पूर्वीच्या राजेशाहीच्या (Monarchy) कल्पना आणि त्याविषयीचा जनतेचा आदर आज साफ नष्ट होऊन, त्याची जागा लोकशाहीच्या (Democracy) नव्या कल्पनेने पटकावली ईहे. हिन्दुस्थानाच्या पिण्डाला झोंबलेल्या राजेशाहीच्या व्यक्तिमहात्म्याचे बण्ड सोडून, त्या ठिकाणी समष्टीप्रधान सोकशाहीचे दणदणीत बीजारोपण करण्याचे श्रेय इंग्रेजी भाषा आणि इंग्रजी सत्ता यानाच दिले पाहिजे. हिन्दुस्थानाच्या राष्ट्रीय आत्मशुध्दीसाठी इंग्रेजी सत्तेचीच जरूर होती आणि आजला ती आहेहि. इंग्रेजांच्या निकट सांनिध्यामुळेच भरतखण्डाच्या शेकडो राष्ट्रीय पातकांवर शोधन प्रकाश पडला, स्वदेशी व परदेशी शत्रू मित्रांचा परिचय झाला आणि विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे लोकशाहीचे साध्य साधण्यासाठी समाजकारणीं राजकारणी आणि आर्थिक बण्डे पध्दतशीर कशी करावी, याचे शिस्तीचे शिक्षण हिन्दुस्थानात इंग्रेजी राजसत्तेनेच प्रथम प्रचलित केले. हिन्दुस्थानाच्या जीवनात सध्या जो क्रान्तीचा खळबळाट उडाला आहे, त्याचे मूळ ब्रिटीश गुरुमावलीच्या लोकशाही गायत्री मंत्रातच सापडणारे आहे. या मंत्राच्या पुरश्र्चरणाच्या सिध्दी विरुध्द नोकरशाही नंदीचा विरोधी थैथयाट पूर्वी कितीहि झाला आणि सध्याहि चालू असला, तरी गेल्या २० वर्षात हिन्दी लोकशाहीची बरीच सत्ता हस्तगत करून, तिच्या रावणी अरेरावीला पायबेडी ठोकली आहे. भावी हिन्दवी स्वराज्याची रुपरेषा आणि स्वरुप कसे असेल, हा भविष्य काळाचा प्रश्न भविष्य काळ सोडवील.

सध्या राज्यकारभाराच्या यंत्राची नवीन मांडणी करणा-या राजकीय सुधारणांच्या हप्त्यांची पर्वणी आलेली आहे. सध्या जेवढे राजकारणी हक्क हिन्दुस्थानाला मिळालेले आहेत, तेवढे सगळे मध्यमवर्ग्या सुशिक्षित बाण्डगुण्यांतील कज्जेदलाल वकील, भिक्षुकशाहीचे भट आणि भांडवलशाहीचे पित्ते यानी बळकावलेले आहेत. निवडणुकीच्या हंगामात शेतक-यांच्या पायांवर पगड्या लोळवून जरी हे त्यांच्या मताची याचना करतात आणि अखेर शेतक-यांच्याच मतांनी कौन्सिलर मिनिस्टर बनतात, तरी शेतक-यांच्या पक्षाची कदरबाज संघटना उभ्या हिन्दुस्थानात कोठेहि नसल्यामुळे, हातीं आलेल्या अधिकारांची अंमलबजावणी करताना, या झब्बूना शेतक-यांची कसलीच पर्वा राहात नाही; आणि त्यांचे कान

पकडण्याची शेतक-यांजवळ काही शक्तीहि नसते. मताला शेतकरी, सत्तेला झब्बू असा प्रकार बोकाळला आहे. सगळेच झब्बू शहरी, बाण्डगुळये आणि भांडवल्ये त्याना आपल्या हितापुढे कशाचीहि पर्वा नसते. आजचे येथील ब्रिटीश राजकारण म्हणजे याच शेतक-यांच्या वै-यांची इलेकशनी जहागीर होऊन बसले आहे. ‘ शेतक-यांचे कैवारी’ म्हणून काही ‘ब्राम्हणेतर’ पात्रे या मजलसीत असली, तरी त्यात एक दोन अपवाद सोडून बाकी श्रीमंत झोटिंग, बुरखेबाज भांडवल्ये आणि पढतमूर्ख यांचेच प्रमाण अधिक दिसून येते. अशात आणखी काही मराठे संस्थानीक आपापले पित्ते निवडणुकीच्या धामधुमीत खालसात पाठवून, शेतक-यांची चाळवाचाळव आणि निष्कारण भुलभुलावणी करतात, ती वेगळीच. सर्व पापे पत्करली, पण कजेदलाल वकीलाचे पाप परवडत नाही. वकीलीचा धंदा मूलत: केवढाहि थोर आणि कितीहि सर्वस्पर्शी असला, तरी हिन्दी वकिलांच्या फलटणी, शेतक-यांच्या हिताच्या दृष्टीने, राजकारणात भाग घेण्यास सर्वस्वी नालायक आहेत. जनतेने त्यांच्या पोटार्थी बाण्डगुळ्या डोक्यांवर राजकारणाची जबाबदारी टाकणे अनर्थावह आहे. पूर्वी भोळसट जनता पदव्यांच्या झकाकीला बाचकत असे व त्यांचा त्याना बाऊहि वाटत असे. पण पाश्र्चात्य बेदरकारी वृत्तीवर पोसलेले आजकालचे धंदेवाईक पोटार्थी वकील हे शुध्द कज्जेदलालअसल्यामुळे, राजकारणासारखा महत्त्वाचा, शेतक-यांच्या जगण्या मरण्याच्या जबाबदारीचा विषय त्यांच्या हाती निर्धास्त सोपवणे, बरेच धास्तीचे आहे.

इतर धंद्यांपेक्षा वकीलीच्या धंद्यात थोडी अधिक स्वतंत्रता व फुरसद असते. त्यामुळे, रिकाम्या न्हाव्याच्या भिंतीच्या तुंबड्याप्रमाणे वकील लोकांनी टेनिस बिझिकाप्रमाणेच राजकारणी लेक्चरबाजी हाती घेण्याचा धूमधडाका चालविलेला आहे. अस्सल मुत्सद्याची मुत्सदगिरी आणि या कज्जेदलालांची तोंडपाटिलकी या दोनहि गोष्टींत गो-या काळ्याचे अंतर आहे. पोट भरण्याचा ज्यांचा धंदाच मुळी बिनकाळजाचा, त्यांच्या हातून राजकारणी धकाधकीचे मामले किती काळजीने आणि सहृदयतेने चोखाळले जात असताल, याचा विचारवंतानी विचार करावा. राजकारणी क्षेत्रात, भांडवल्यांच्या बरोबरीने कज्जेदलाल वकीलांचा भरंसाट सुळसुळाट माजल्यामुळे, सध्याचे हिन्दी राजकारण नाटकी बनले आहे. त्यात हृदयाची तळमळ नाही, बहुजनसमाजाच्या–अर्थात् शेतक-यांच्या–हिताची कळकळ नाही, काही नाही. पक्षपंथभेदाची युध्दे केवळ कज्जेदलाली आचरटपणानेच सर्वत्र चालालेली आहेत. शेतक-याच्या रक्तावर जगणा-या या नानाविध शहरीं बाण्डगुळ्यांच्या धडपडी शेतक-यानी नीट लक्षात घेणे अत्यंत जरुरीचे आहे. सध्याच्या भांडवलशाही आणि कज्जेदलाली राजकारणाला पायबंद लावण्यासाठी अखिल भरतखंडाला एकजात शेतकरी संघटित झाला पाहिजे. त्याने आपली एक नव्या चैतन्याची शक्तीच निर्माण केली पाहिजे. विद्यमान असलेले कोणतेहि पंथ आणि पक्ष त्याच्या उपयोगी पडणार नाहीत. सबंध हिन्दुस्थानचा शेतकरी अभेदाने एकवटला, तर त्याच्या संघटनेचा ब्रिटीश पार्लमेण्टावर जेवढा दणक्याचा दाब बसेल, तेवढा शहरी बाण्डगुळ्यांच्या तोंडाच्या वाफा-याचा जगाच्या अंतापर्यंत बसणार नाही. दिल्लीच्या किल्ल्यांचा जुडगा खुळखुळविण्याचा या पुढचा योग भारतीय शेतक-यांचा आहे. जे ब्रिटीश पार्लमेण्ट गेली अनेक शतके भांडवलशाही आणि सरदारशाहीची जन्मप्राप्त वतनी जहागीर होऊन बसले होते, तेच कुदळ्या मजुरानी आणि नांग-या शेतक-यानी पूर्ण काबीज करून, इंग्लंडचा मजूर ब्रिटीश साम्राज्यसत्ताधारी जर बनू शकतो, तर तोच प्रयोग आमच्या हिन्दी शेतक-याना यशवंत करून दोखविता येणार नाही काय ? अलबत् आलाच पाहिजे. शिस्तीची संघटना आणि ध्येयाची तळमळ इकडची दुनिया तिकडे करील. मग ‘शेतक-यांचे स्वराज्य’ हा आजची कल्पनासृष्टीतील घटना प्रत्यक्ष सृष्टीत अवतरलेली, प्रस्तुत लेखकाला पाहण्याचा योग न आला तरी परवडला !–अलम दुनिया त्याच्या नांगर चिन्हांकित राष्ट्रध्वजाला मुजरा करील.

'शेतक-यांचे स्वराज्य!' कल्पना फार गोड. पण तिच्या साध्याचा मार्ग अनंत परिश्रमांच्या आणि प्रतिकारांच्या काट्याकुट्यांनी भरलेला आहे. शेतकरी पक्ष स्थापन करून, शेतकरी स्वराज्याचा मार्ग अखिल भरतखंडाला महाराष्ट्रातील शिवाजीच्या मावळ्यानी दाखवावा अशी मनिषा श्रीयुत जवळकरानी व्यक्त केली आहे. शेतक-यांचा कैवारी म्हणविणा-या ब्राम्हणेतर पक्षानेच या नवीन स्वराज्याचे नांगरी ध्वजारोपण करून स्वराज्यसंस्थापक शिवरायाचा हा नवावतार जगाला दाखवावा आणि ब्रिटीश-मजूर-मंत्रि-मण्डळाच्या तोडीस तोड आणि जोडीस जोड असं बिन्दवी शेतकरी मंत्रि मण्डळ हिन्दी पार्लमेण्टात बसवून, सम्राट जॉर्ज बादशहांची महत्वाकांक्षा याच देही डोळा त्याना फलवति झालेली दाखवावी, या जवळकरी योजनेची किंमत भविष्य काळानेच ठरलिलेली बरी. भरतखंडाच्या उध्दाराचा हा प्रश्न ब्राम्हणेतर पक्षाने हाताळला नाही, तर त्याने आता जगण्यापेक्षा लवकर मरण्यातच अब्रूचा बचाव आहे. अखिल भारतीय शेतकरी पक्ष जन्माला आला पाहिजे, ही वातावरणात घुमत गेलेली कल्पना आता ठार मारणे शक्य नाही. तपशीलाचे आणि कार्यक्रमाच्या पधदतीचे रंग बवे तितके बदला–आणि ते बदलणारच ! -पण तत्वाचा मत्यू काळाच्या काळाला करता येणार नाही. काळाच्या पोटी जन्मलेली कल्पना जर काळच खाऊ लागला, तर त्याला भट किंवा भाटी यापंक्षां अधिक महत्व कोण देणार ? शेतकरी पक्षाची घटना, तत्वे आणि कार्यक्रम कसा असावा, याची चिकित्सा करणे, हा या पुस्तकाचा उद्‌देश नाही. शेतक-यांच्या आधीव्याधी शेतक-यानाच उत्तम कळतात. त्या त्यानी संघशक्तीच्या सर्वसामान्य बळाने नष्ट करण्यासाठी कंबर कसली कीं पुढचे मार्ग आपोआप दिसू लागतात. शेतकरी-स्वराज्याची हिन्दुस्थान वाट पहात आहे या कल्पनारम्य भावनेने विचारांत केलेली क्रान्ति मी विचारवंत राष्ट्रकार्यकर्त्यांपुढे मोकळ्या मनानें मांडली आहे. आता फक्त हिन्दुस्थानाच्या शेतकरी स्वराज्याच्या राष्ट्रीय निशाणाबद्‌दल माझे विचार व्यक्त करून मी या सत्पप्रकरणात्मक पुस्तकाची समाप्ती करणार.

राष्टांची निशाणे व्यक्तीच्या लहरींतून निर्माण होत मसतात. त्यांच्या रंग रूप आणि चिन्हांच्या मागे अभ्युतरम्य क्राम्तीच्या झटापटींचा जाज्वल्य आणि चित्तवेधी इतिहास उभा असतो. राष्ट्रीय निशाणाप्रमाणेच राष्ट्रगीताची गोष्ट. 'गॉड सेवह अवर ग्रेशस किंग' या इंग्रेजी राष्ट्रगीताचा नुसता सूर कानी पडताच, इंग्रेज आदमी आपोआप गंभीरपणाने चटकन् टोपी काढतो; आणि आमचे 'वन्दे मातरम्' गीत मुलामुलींचा तांडा मोठमोठ्याने ओरडून गाऊ लागला तरी, "अहो, राष्ट्र गीत हे–उभे रहा" असे आम्हाला टपली मारीन कोणीतरी सांगितले म्हणजे मग आम्ही "काय शिंपी पिडा ही !" या उद्‌गारांसह उभे पाहतो. या गोन गीतांतल्या भावनेच्या भेदाचा कोणीतरी कधी विचार केला आहे काय ? भगवा झेंडा या उद्‌गारात जी जादू भरल आहे, ती गांधीप्रणित चरखांकित 'राष्ट्रीय' ब्रुव निशाणात काय आहे ? 'चरखा' म्हटला कीं महात्मा गांधीना ब्रम्हानंद होत असेल. पण व्यक्तिचा ब्रम्हानंद समष्टीत मुरण्यासारखा असा काय मोठा क्रान्तिकारक इतिहास चरख्याच्या मागे उभा आहे ? भगवा झेंडा महाराष्ट्रातल्या म-हाट्यांचा असला, तरी त्याच्या पराक्रमाचा धौशा पूर्वेस बंगाल्.पर्यंत, उत्तरेस थेट अटकेपर्यंत, आणि दक्षिणेस सेतुबंध रामेश्र्वरापर्यंत दणाणलेला आहे. म-हाठशाहीत भगव्या झेंड्याखाली मुसलमान आरब आणि रोहिल्यांच्या फलटणी सुध्दा इमाने इतबारे लढत असत. म-हाठ्यांच्या त्या भगव्या झेंड्यात हिन्दु–मुसलमान, ब्राम्हण–ब्राम्हणेतर किंवा स्पृश्यास्पृश्य असला कसलाहि भेद नव्हता. बिन्दवी स्वराज्य या व्यापक भावलेचे ते भेदळून्य खरेखुरे राष्ट्रीय प्रतिक होते. सध्याच्या गांधीच्या चरख्या निशाणात भेदांचे रंग स्पष्ट दाखविले असून, त्यांवर ऐक्याचा लटका आरोप करण्यात आलेला आहे. तांबडा आणि हिरवा रंग जरी गळ्यात गळा घालून शेजारी बसलेले दिसतात, तरी प्रत्यक्ष

व्यलहारात हिन्दु आणि मुसलमानांचे प्रेम व आदर केवढा पाघळत आहे, ते यहाणाराना खास दिसत आहे. विशेषत: प्रस्तुत निशाणावर काढलेले चरख्याचे चित्र अनाकर्षक आणि आक्षेपार्ह आहे.

चरखा हे गांधी भगवंताचे सुदर्शन चक्र असले, तरी हिन्दुस्थानाच्या गुलामगिरीवर तेच एक रामबाण औषध आहे, या शामाळू तत्वावर खुद्द मोठमोठ्या पुढारीब्रुवातच जेथे मतभेद व अविश्र्वास, तेथे चरख्याचे माहात्म्य अखिल हिंदी जनतेला पूर्ण मान्य आहे, असे म्हणणे शुध्द दांभिकपणाचे होईल. चरख्याची घरघर गांधी-भक्तांच्या चर्पटपंजरीत जरी मनमुराद बोकाळली होती, तरी चरख्याच्या वेदान्ताला कोणीहि मान्यता दिलेली नाही. प्रतिकचिन्हांची प्रणप्रतिष्ठा जनतेच्या आत्मयज्ञाने सिध्द व्हावी लागते. ते चिन्ह पाहताच, किंवा त्याचे नुसते स्मरण होताच, जनतेच्या आत्म्याला कळवळ्याचा पिळवट तरी पडला पाहिजे एक, अथवा चित्तवृत्ति एकदम खळबळून सोडणारा एकादा चिरस्मरणीय ऐतिहासिक क्रान्तीचा प्रसंग त्याच्या मागे उभा पाहिजे एक. असले फसले चैतन्य चरख्यात आहे की त्याची योजना 'राष्ट्रीय' झेंड्यावर होताच, जनतेच्या वृत्ति एकदम खळबळाव्या ? चरख्याच्या योजनेत फार झाले तर व्यक्तिमाहात्म्य असेल, पण ते मानसिक दास्यसूचक असल्यामुळे, राष्ट्रीय झेंड्यावरची त्याची योजना सर्वमान्य होणे शक्य नाही. निदान, शिवाजीमहाराजांच्या भदव्या झेंड्याच्या अभिमानी–कट्टा शेतकरी–महाराष्ट्र-या शामळू चरख्याचे महात्म्य केव्हाहि कबूल करणार नाही. त्याला कसलीहि मानयता देणार नाही व आज देतहि नाही. ब्रिटिशांच्या राज्यसत्तेपूर्वी एकमुखी एकसूत्री सार्वभौमसत्ता हिन्दुस्थानात कधीच नव्हती.हिन्दी लोकाना एकराष्ट्रीयत्वाची काही कल्पनाच नव्हती, तर अखिल हिन्दुस्थानाला अभेदाने मान्य असणा-या चिन्हाचा राष्ट्रध्वज कोठून येणार ?इंग्रेजांसारख्या तात्या पंतोजीच्या कडव्या दण्डनीतीमुळे एकराष्ट्रायत्वाचा जिव्हाळा सध्या थोडाथोडा पाझरू लागला आहे. आंतरराष्ट्रीयत्वाची भाषा थोडीथोडी उमटू लागली असली, तरी वाळूचे बोबडे बोल यापेक्षा तिला जास्त महत्त्व नाही. अशा वेळी हिन्दुस्थानाच्या राष्ट्रीय ध्वजावर कोणते चिन्ह ठेविले असता, ते एकजात हिन्दी जनतेला वंदनीय आणि स्वाभिमानप्रेरक होईल, याचा विचार करणे अगत्याचे आहे. असे करताना व्यक्तीत्वाला दृष्टीआड ठेवून, समष्टीच्या–बहुजनसमाजाच्या–भावनेचाच विचार केला पाहिजे. हिन्दुस्थान शेतीसाठी जगप्रसिध्द आहे. शेती हेच त्याचे जीवन, तोच त्याचा देव आणि तोच त्याचा मोक्ष. हिन्दुस्थान शेतीच्या मातीतून भरपूर सोने काढीत होता, म्हणूनच तो सुवर्णभूमि म्हणून त्रिलोकविश्रुत होता. अखिलभरतखंडातल्या सर्व समाजांच्या पूर्व इतिहासाची निर्दय छाननी केलीं, तर ब्राम्हण व पारशी समाज वगळून बाकीच्या सर्व जातीचे हिन्दी समाज अस्सल शेतकरीच असल्याचे प्रत्ययाला येईल.

परिस्थितीच्या पालटामुळे हे समाज आपल्या पिढीजात नांगराला पारखे होऊन, साधेल ते इतर व्यवसाय करीत असले, तरी प्रत्येक जण जर आपापल्या घराण्याचा वंशवृक्ष मुळाच्या दिशेने शोधीत गेला, तर ढोपरभर चिखलाच्या शेतात नांगर धरून उभा असलेला त्याचा आजा पणजा त्याला खास दिसल्याशिवाय रहाणार नाही. बोरूच्या कांड-यावर पोट बांधून जगणारा पांढरपेश्या कायस्थ प्रभू समाजच दाखल्यासाठी घेतसा. तरी शिवकालापूर्वी त्याचे बापजादे नांगरदेवाच्या भक्तियोंगातच रंगलेले आढळतील. आजसुध्दा मावळात खास शेती करणारे अस्सल कायस्थ प्रभू शेतकरी पुष्कळ आहेत. विशेष लक्ष्यात ठेवण्याची गोष्ट म्हणजे केवळ मजुरीवर जगणा-या पिढीजात मजूर जाती पूर्वी हिन्दुस्थानात नव्हत्या. कारागीर जाती अनेक असत. परंतु शेतकी सांभाळून फावल्या वेळात कारागिरीची आणि मजुरीचीहि कामे त्या करीत. अर्वाचीन गिरण्या कारखान्यानीच त्यांच्या शेतीची

माती करून, त्याना खास मजूर जाती बनविलेल्या आहेत. त्याना प्राणापेक्षा प्यार असलेला नांगर—परीस त्याना पारखा करून, त्यांच्या हाती घण कोयता कोंबण्यात आलेला आहे. आजचा मजूर भांडवलशाहीच्या चापातला बळी असला, तरी हाडरक्मासाने आणि भावनेने तो नांगरदेवाची पिढीजात उपासना करणारा शेतकरी बळीराजा आहे. गिरणी कारखान्यांतल्या घणांच्या घावानी आज तो आपल्या पोटाची खळगी भरीत असला, तरी त्याची नांगरदेवाची आठवण त्याच्या मृत्यूबरोबरहि मरत नाही. संपाच्या वणव्यात भाजून निघालेला मुंबईचा प्रत्येक गिरणबाबू ऊर्फ मजूर आपल्या कर्मप्राप्त हातोड्याच्या नावाने हातबोटे चोळीत, बाप जाद्यांच्या नांगराची आठवण करून धाय मोकलीत बसला आहे. त्याला आज गांधीच्या चरख्याची आठवण होत नाही. किंवा बाण्डगुळ्या कम्युनिष्ठांच्या पुस्तकी पापाने त्यांच्या छातीवर निष्पाप भक्ती चिकटत नाही—चिकटणे शक्य नाही. जोपर्यंत हिन्दी शेतकरी नांगरदेवाची एकनिष्ठ भक्ती करीत होता, तोपर्यंत शेकडो दुष्काळातहि तो कळणा कोंड्याला महाग झाला नाही, नांगराने उपाशी मारलेले एकह घर उभ्या हिन्दुस्थानात सापडणार नाही. पण नांगराला धि:कारून, भांडवलशाहीच्या हातोड्यावर भाळून पडलेल्या लोकांना—शेतक-यांचे 'मजूर' बनलेल्याना—खास सुबत्तेच्या दिवसातहि तोच हातोडा मारून, विळ्याने मान कापून घेण्याचा प्रसंग बिनचूक कसा येतो, हे संपांच्या वावटळीने आता चांगलेच शिकविले आहे. संपांच्या इभ्रतीसाठी पोटावर दगडी पाटा ठेवून, मुंबईस उपाशी मरत पडलेल्या गिरणी कामगारांच्या धावण्याला गांधींचा चरखा धावत नाही आणि सपाट-समाज-पटु कम्युनिष्ठांचा हातोडा कोयतादि कोरडलेल्या घशात पाण्याचे दोन घोट ढकलीत नाहीं.

उपासमरीने डोळ्यांपुढे चमकणा-या काजव्यांच्या लखाकींत आज त्या बिचा-याना आपला कुळस्वामी नांगर दिसत आहे. त्यांच्या सर्व सुख दुःखाचा , भूत वर्तमान भविष्याचा, त्यांच्या -हासाचा आणि भावी वैभवाचा सारा इतिहास सिनेमाच्या चित्रपटाप्रमाणे त्याना नांगरात हालता बोलता आज दिसू लागला आहे. नांगराची आठवण आज त्याच्या हृदयात अनंत विचारांचे समुद्रमंथन करीत आहे. 'माझ्या वाडवडलांना ज्या नांगराने पूर्वी चुकून सुद्धा कधी दगा दिला नाही, त्या नांगराने मला खास उपाशी मारले नसते.' या एकाच विचाराने तो आज तल्लीन झालेला आहे. या त्याच्या तल्लीनतेपुढे गांधींचा चरखा आणि कम्युनिष्ठांचा हातोडा कोयता. म्हणजे त्याच्या खचत्या हृदयावर अपमानाच्या डागण्यांप्रमाणे त्याला दुःख देत आहेत. बाण्डगुळ्या मध्यम वर्ग सुद्धा आता पोटाच्या बण्डापुढे नामोहरम होऊन, शेतीच्या मातीमध्ये घुसू पहात आहे. कसाहि आणि कितीहि विचार केला तरी नांगराशिवाय हिन्दुस्थानाला जगण्याचा दुसरा मार्ग नाही. अर्थात् नांगर हेच हिन्दी राष्ट्रध्वजाचे चिन्ह ठरणे निसर्गप्रप्त आहे. नांगरापुढे चरख्याची काय मातब्बरी ! नांगराने मातीतून सोनेच काढले नाही, तर चरख्याना सांदीची वाट धरुन, हातोडा-कोयत्याला मायघरच्या आपल्या खाणीच्या मातीत मिसळण्याशिवाय गत्यंतरच उरणार नाही. कापूस पिकविणा-या शेतक-याचा नांगरच जर थंड पडला, तर चरखा काय आपल्या कर्माचे सूत काढणार ? नांगर जेव्हा मातीतून सोने काढील, तेव्हा चरखा हातोड्या सारखे सुवर्णकार कसबी त्या सोन्याचे दागदागिने घडवितील. एरवी काय ? विशेष लक्ष्यात ठेवण्यासारखा मुद्दा म्हणजे, कोणत्याही राष्ट्रात पहा, नांगर पुरुषांचा आणि चरखा बायकांचा हात रिवाज सर्वत्र दिसून येतो. बायका नांगर धरीत नाहीत आ पुरुष चरखा फिरवीत नाहीत. नांगराचे काम मर्दाच्या मनगटाचे, आणि चरख्याचे नाजूक काम बायकांच्या हाताचे. सगळ्या हिन्दुस्थानच्या हातात बायकी चरखा देणे, गांधीसारख्या स्त्री-पुरुष भेदातीत महात्म्याला कितीहि शोभले, तरी मर्दपणाची मिजास मारणा-या चरखा-प्रसारकांना ' मिशा मोठमोठ्या धराव्या कशाला ?' असा सडेतोड सवाल बासकांनी विचारला पाहिजे होता. त्याचप्रमाणे, हातोडा- कोयत्याच्या तांबड्या निशाणाखाली जगांतल्या

मजुरांनो एक व्हा असा सवाल टाकणा-या कम्युनिष्ठांची निष्ठा सुद्धा मजूराला मजूर म्हणूनच टिकवण्यापलिकडे जात नाही, हे लक्षात ठेवण्यासारखे आहे.

हिन्दुस्थानता पिढिजात शेतकरी यापुढे मजूरच राहणार काय ? नाही नाही, त्रिवार, शतवार नाही. त्यांच्या बापजाद्यांचा नांगर त्याना आरोळ्या मारुन सांगत आहे, हिन्दी मजुरानो शेतकरी बना. तुम्ही जर अभेद भावाने एकवटाल, देव धर्म जातपात असल्या क्षुद्र आणि हलकट कल्पनांच्या छाताडावर लाथ मारुन एकजिनसी संघटित व्हाल, आणि तुमच्या बापजाद्यांची मातीचे सोने करणा-या शेतीच्या किमयेचे एकनिष्ठ किमयागार बनाल, तर मुत्सद्यांच्या घोरपणाला चुकवील, इतक्या थोड्या काळात नांगर चिन्हांकित राष्ट्रध्वजाखाली शेतक-यांचे स्वराज्य स्थापन करुन, या अभागी भरतखंडाला पुन्हा सभाग्य सुवर्णभूमी बनवाल, यात मुळीच शंका नाही. तथास्तु.